म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय वा.वा.
दा. क्र. १५८३५

१५८३५

IRBK-0115835
IRBK-0115835

अलेक्झांडर जित कीं जेता?

ग्रं. क्र. ६४३२

अनुक्रम ३०११८
ग्रं. ...
क्रमांक २४९८
नों. दि. ...

बंडोपंत त्यागी

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रं. क्र. ...६४३२... नों. दि. ......
...... क्र. ......

IRBK-0106432

IRBK-0106432

शस्त्रबलापेक्षां आत्मबल श्रेष्ठ आहे.

पहिली आवृत्ति
डिसेंबर १९२८
दुसरी आवृत्ति
जून १९५७

मूल्य ५० नये पैसे

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

मुद्रक
श्री. बा. ढवळे,
कर्नाटक मुद्रणालय,
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक
गो. म. नवाथे,
९ ओवेनडन रोड,
मुंबई ७

निवेदन

‘ अलेक्झांडर दी ग्रेट ’ ची स्वारी व तत्कालीन भारत ह्यांबद्दलची माहिती ह्या पुस्तिकेंत आहे. त्यावरून फार प्राचीन कालापासून भारतीय संस्कृतीचा ओघ कोणत्या विशिष्ट दिशेनें वाहात आला आहे हें वाचकांना दिसून येईल.

पुस्तिका बारा ते चौदा वयाच्या विद्यार्थांसाठीं लिहिलेली आहे. शाळांतून ऐतिहासिक विषय संवादरूपानें शिकविले जावेत अशी अपेक्षा असते. म्हणून ह्या पुस्तिकेंत विषयाचें नाट्यीकरण केलेलें आहे. त्यामुळें विषय विद्यार्थ्यांस कंटाळवाणा न होतां त्याचें त्यांना सहज आकलन होईल अशी आशा आहे.

ही पुस्तिका जरी रंगभूमीसाठीं लिहिलेली नाहीं तरी त्यांतील बराचसा भाग प्रसंगानुसार कांहीं बदल करून शाळांतून संमेलन वगैरे प्रसंगीं प्रयोगासाठीं उपयुक्त होईल.

विद्यार्थ्यांच्या ज्ञानांत भर पडावी ह्या दृष्टीनें मूळ विषयाच्या अनुषंगानें आवश्यक असलेली बरीचशी माहिती शेवटीं परिशिष्ट-रूपानें दिली आहे. ती उद्बोधक होईल.

ह्या प्रकाशनानें महाराष्ट्रीय तरुणांच्या विचारांस चालना मिळो अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

प्रकाशक.

२५ डिसेंबर, १९५४

IRBK-0106432

IRBK-0106432

मलपृष्ठावरील चित्रें
बारहुट येथील शिल्पकृतीवरून
तयार केलीं आहेत.
या शिल्पाचा काल
इ. स. पू. १५०–१०० वर्षें असावा
असें तज्ज्ञांचें मत आहे.
म्हणजे हीं चित्रें
अलेक्झांडरच्या स्वारीनंतर
सुमारें १५०–२०० वर्षांच्या
काळच्या भारताची कल्पना
करून देतील.
बारहुट ही जागा
सटणा (जबलपूर) या गांवाचे
आसपास असावी.
सध्यां बारहुट
शिल्पांचे अवशेष
कलकत्यास म्युझिअममध्यें
आहेत.

भू मि का

भारताच्या प्राचीन इतिहासाकडे हल्लीं आपलें लक्ष अधिकाधिक जाऊं लागलें आहे ही फार आनंदाची गोष्ट आहे. कारण त्यामुळें आपली संस्कृति खरोखर काय आहे ह्यावर बराचसा प्रकाश पडणार आहे.

दुर्दैवानें प्राचीन भारताचा इतिहास अत्यंत त्रोटक स्वरूपांत उपलब्ध आहे. पुराणें, महाकाव्यें आणि इतर धार्मिक ग्रंथ ह्यांतून प्राचीन काळच्या घटनांसंबंधीं बरेच उल्लेख आढळतात. परंतु कोणत्याही घटनेला इतिहासांत स्थान मिळण्यासाठीं तिचा काल व स्थल हीं दोन्हीही निश्चित स्वरूपाचीं असावीं लागतात. तशी परिस्थिति वरील उल्लेखांबाबत नसल्यामुळें त्या घटनांना इतिहासांत निश्चित स्थान देणें अवघड आहे. प्राचीन शिलालेख, ताम्रपट, वगैरे सामुग्री जसजशी अधिक प्रकाशांत येईल तसतसा आपला इतिहास अधिक संगतवार जुळविला जाईल.

हा प्राचीन इतिहास सांधण्याच्या बाबतींत प्राचीन ग्रीक वाङ्मयाची बरीच मदत झालेली आहे. पाश्चात्य देशांशीं आपलें दळणवळण फार पुरातन कालापासून चालत आलेलें आहे. ग्रीकांचा आद्य इतिहासकार हेरोडोटोस (इ. स. पू. ४८४–४३१) ह्याच्या लिखाणांत भारताचा उल्लेख आढळतो. अर्थात् तो अगदीं ओझरत्या स्वरूपाचा आहे. त्यानंतर इसवी सनाच्या तिसऱ्या शतकाच्या अखेरपर्यंतच्या ग्रीकवाङ्मयांत जे भारताबद्दलचे उल्लेख आहेत, ते सर्वस्वीं दंतकथा व व्यापाऱ्यांनीं सांगितलेल्या भाकडकथा ह्यांवर

अ. २

* *

आधारलेले असल्यामुळें त्यांनाही इतिहासांत फारसें महत्त्वाचें स्थान देतां येत नाहीं.

अलेक्झांडर दि ग्रेटच्या स्वारीपासून मात्र भारताबाबतचे निश्चित स्वरूपाचे उल्लेख ग्रीक वाङ्मयांत ठिकठिकाणीं आढळून येतात. अलेक्झांडर स्वतः सुविद्य होता व त्याच्या सरदारांतही कांहीं सुविद्य माणसें होतीं. त्यांनीं त्याच्या स्वारीची सुसंगत व खुलासेवार हकीकत लिहून ठेविलेली आहे. त्यांत तत्कालीन भारताची विविध स्वरूपाची बरीच माहितीही दिलेली आहे.

ही माहिती मनोरंजक असून शिवाय त्यापासून स्वतंत्र भारताच्या सद्यःस्थितींत तरुणांना बराच बोध घेण्यासारखा आहे. म्हणून त्या स्वारीची हकीकत ह्या पुस्तकाच्या द्वारा वाचकांना सादर करीत आहें.

वस्तुतः हें पुस्तक ऐतिहासिक स्वरूपाचें आहे. तें तरुणांसाठीं — विशेषतः विद्यार्थ्यांसाठीं – लिहिलेलें आहे. त्यांना विषय कंटाळवाणा वाटूं नये म्हणून त्याचें नाट्यीकरण करून तो सादर केला आहे. परंतु त्यांतील सर्व घटना व तत्कालीन भारताबद्दलची माहिती मुळांत इतिहासावर आधारलेली आहे. सत्याचा कोठेंही अपलाप होऊं नये म्हणून अत्यंत दक्षता घेतली गेली आहे. केवळ नाट्याच्या चौकटींत बसवितांना विषय सुसूत्रित करण्याकरितां कांहीं ठिकाणीं कल्पनाशक्तीचें अगदीं आवश्यक तेवढें साह्य घेतलें आहे एवढेंच.

अलेक्झांडर बादशाहाच्या स्वारीचें योग्य रीतीनें पण कंटाळा न येतां आकलन करण्याच्या कामीं हा प्रयत्न उपयुक्त होईल अशी आशा आहे.

प्रसांगनुसार कांहीं मुद्द्यांचें येथें स्पष्टीकरण करणें आवश्यक आहे.

अलेक्झांडरच्या स्वारीच्या वेळीं प्राच्य देशावर नंदराजा राज्य करीत होता व त्याचा जन्म हीन कुळांत झालेला होता, असा निश्चित उल्लेख ग्रीक इतिहासकारांनीं केलेला आहे. तद्वतच चंद्रगुप्तमौर्य आणि अलेक्झांडर

* *

बादशाहा ह्यांची भेट झाली होती व त्या वेळीं चंद्रगुप्त युवकावस्थेंत होता असाही उल्लेख त्यांनीं केलेला आहे. त्यांत चंद्रगुप्ताच्या कुलाबद्दल कोठेंही उल्लेख नाहीं हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

चंद्रगुप्ताला—मौर्य म्हणजे मुरा नांवाच्या दासीपासून झालेला—दासीपुत्र म्हणून हेटाळण्याचा बऱ्याचशा भारतीय इतिहासकारांनीं प्रघात पाडलेला आहे. वास्तविक मुरा ह्या स्त्रीलिंगी नामापासून मौर्य असा शब्द सिद्ध होऊं शकत नाहीं. मुरेचा मुलगा असा अर्थ अभिप्रेत असेल तर मुरा शब्दापासून मौरेय असा शब्द व्हावयास हवा. उलटपक्षीं मुर हें एका गोत्राचें नांव पाणिनींच्या गणपाठांत सापडतें व त्यापासून मुर नांवाच्या गोत्रांत उत्पन्न झालेला तो मौर्य असा शब्द निष्पन्न होतो.

परंतु ह्याचा विचार न करतां, भारताला एकछत्री बनविण्याचा अग्रमान मिळविणाऱ्या पुरुषश्रेष्ठाला दासीपुत्र बनविण्याची प्रथा कां पाडण्यांत यावी हें समजत नाहीं. मुरा दासीपासून झालेला तो मौर्य ह्या व्युत्पत्तीला इतिहासांतच काय पण पुराणांतसुद्धां कोठेंही आधार मिळत नाहीं. नाहीं म्हणायला जो कांहीं थोडासा आधार सापडतो तो फक्त 'मुद्राराक्षस' नाटक व त्याच्या टीकाकारांचें लिखाण ह्यांतच काय तो सापडतो. पण व्याकरणाचे नियम तद्वत् सर्व इतिहास-पुराणें बाजूला टाकून केवळ एका नाटकावर विसंबून, भारताला यवनांच्या दास्यांतून मुक्त करणाऱ्या वीराला दासीपुत्र बनविणें खास न्यायाचें नाहीं हें आतां तरी स्वतंत्र भारतांतील इतिहास-लेखकांच्या ध्यानीं येईल काय? ह्या बाबतींत प्रो. राधा कुमुद मुकर्जी ह्यांच्या 'Chandra Gupta Maurya and his times' ह्या ग्रंथांतील ह्या मुद्दयावरील चर्चा अवश्य वाचावी अशी नम्र सूचना आहे.

पौरस राजा आणि अलेक्झांडर बादशाहा ह्यांची लढाई व त्यानंतरची त्यांची रणांगणावरील भेट ह्यांबद्दलचा उल्लेख बऱ्याच इतिहासांतून व

* *

क्रमिक पुस्तकांतूनही आढळतो. पण त्यांत लेखकांचा सर्व भर पौरसाची शरीरयष्टि व अलेक्झांडरचें औदार्य आणि गुणग्राहकता असल्या गोष्टींवर दिलेला असतो. वास्तविक हे दोन वीरपुरुष रणांगणावर शत्रु म्हणून समोरासमोर आलेले असतात; आणि म्हणून योद्धे ह्या नात्यानेंच त्यांच्याकडे प्रामुख्यानें पाहाणें आवश्यक आहे. पण तशा दृष्टीनें त्यांच्याबद्दल लिहिण्याची तसदी प्राय: कोणी लेखकांनीं घेतलेली दिसत नाहीं. उलट पौरस आणि एकंदरीनें भारतीय सैनिक ह्यांच्याबद्दल आपल्या मनांत न्यूनगंड उत्पन्न होईल अशीच वर्णनें ह्या लढाईची हकीकत देतांना केलेलीं आढळून येतात.

प्राचीनकाळचे बहुतेक सारे पाश्चात्य इतिहासलेखक, रणांगणावरून पळ काढणारा पर्शिअन सम्राट डेरिअस व पौरस ह्या दोघांची तुलना करून पौरसाच्या शौर्याबद्दल व त्याच्या युद्धकलानैपुण्याबद्दल मुक्तकंठानें प्रशंसा करीत असतात.

क्वि. कु. रुफुस ह्या ग्रीक इतिहासकारानें तर पौरसाच्या सैन्याकडे पाहात असलेल्या खुद्द अलेक्झांडरच्या तोंडींच पुढील उद्गार घातले आहेत. "I see at last a danger that matches my courage" (माझ्या सामर्थ्याची कसोटी लागेल असें संकट अखेर माझ्यासमोर उभें आहे)

त्याप्रमाणेंच ह्याविषयीं चेसने नांवाच्या एका आधुनिक इंग्रज जनरल साहेबानें आपल्या युद्धतंत्रविषयक लेखांत नमूद केलें आहे कीं —

"The Greeks were loud in praises of the Indians. Never in all their eight years of constant warfare had they met such skilled and gallant soldiers."

(ग्रीक लोक भारतीय सैनिकांची मुक्तकंठानें प्रशंसा करीत असत. ते सतत आठ वर्षें युद्धें करीत होते परंतु भारतीय सैनिकांसारखे वाकबगार आणि शूर सैनिक त्यांना दुसरीकडे कोठेंही भेटले नव्हते.)

* *

वरील अवतरणांवरून अलेक्झांडर आणि पौरस ह्यांमध्यें झालेली लढाई दोन तुल्यबल शत्रूंमध्यें झालेला अटीतटीचा सामना होता हें अगदीं स्पष्ट आहे.

निरनिराळ्या ग्रीक इतिहासकारांनीं दिलेल्या ह्या लढाईच्या वर्णनांत बराच फरक आहे आणि खरोखर पौरसाचा पराभव होण्यास काय कारणें झालीं हें कोणाच्याच वर्णनावरून निःसंदिग्धपणानें सांगतां येत नाहीं. दुर्दैवानें कोणाही प्राचीन भारतीय इतिहासकारानें लिहिलेलें ह्या लढाईचें वर्णन आज उपलब्ध नाहीं. तसें असतें तर ह्या प्रश्नाची दुसरी बाजू समजून घेतां आली असती व सत्यान्वेषण करणें शक्य झालें असतें. पण जोंपर्यंत ही दुसरी बाजू आपल्या समोर नाहीं तोंपर्यंत ह्या लढाईचीं 'लिहिलेलीं सर्व वर्णनें ग्रीकांनींच लिहिलेलीं आहेत आणि तीं उघड उघड एकपक्षीय आहेत हें पौरस व त्याचे सैनिक ह्यांच्या शिपाईगिरीबद्दलच्या कल्पना बांधतांना विसरतां कामा नये.

अलेक्झांडरच्या स्वारीबरोबर असलेल्या इतिहासकारांनीं त्याच्या स्वारीची हकीकत लिहितांना भारताच्या लोकांची राहाणी, त्यांची राज्यव्यवस्था, त्यांचे कायदेकानू, वैभव आणि युद्धकलानैपुण्य वगैरेबद्दल प्रसंगानुसार ठिकठिकाणीं स्तुतिपर वर्णनें केलेलीं आहेत. असें असतां भारतीयांचा उल्लेख त्यांनीं नेहेमीं Barbarians म्हणजे जंगली लोक ह्या शब्दांनीं करावा ह्याचें आश्चर्य वाटतें.

तत्कालीन ग्रीक लोक स्वतःला जगांतील अत्यंत हुशार, ज्ञानी व सुधारलेले समजत असत व इतर सर्व लोकांना रानटी मानीत असत आणि म्हणून त्यांना पादाक्रांत करून त्यांच्यावर स्वामित्व गाजविण्याचा आपणास निसर्गसिद्ध हक्क आहे असें ते म्हणत असत. खुद्द ॲरिस्टॉटलचें मतही असेंच होतें. अर्थातच त्याचा शिष्य असलेला अलेक्झांडर बादशाहा ह्यानें आपली राज्यतृष्णा भागविण्यासाठीं जेव्हां पूर्वेकडील देशांवर आक्रमण

* *

सुरू केलें त्या वेळीं तेथील लोकांना ग्रीकांनीं रानटी अगर जंगली म्हणणें क्रमप्राप्तच होतें.

भारत त्या वेळीं सुधारणेच्या उच्च स्थानावर जाऊन पोचलेला होता, हें अलेक्झांडरच्या स्वारीनंतर अवघ्या २४–२५ वर्षांनींच भारतांत येऊन राहून गेलेल्या मेगास्थेनेसच्या वर्णनावरून स्पष्ट आहे. असें असतांही अलेक्झांडरच्या इतिहासकारांनीं भारतीयांना Barbarians ह्या नांवानें संबोधावें ह्याचें कारण ग्रीक लोकांच्या उपरिनिर्दिष्ट आक्रमक वृत्तींतच असलें पाहिजे. अस्तु.

ग्रीक लेखकांनीं भारतांतील लोकांचीं वर्णनें करतांना बऱ्याच बाबींवर प्रकाश पाडला आहे. पण भारतांतील वाङ्मय अगर भारताचें तत्त्वज्ञान ह्यांबद्दल केवळ नामनिर्देश आणि तोही अगदीं क्वचित ठिकाणीं केलेला आहे हें लक्षांत घेण्यासारखें आहे. भारतांतील साधूंबद्दलच्या त्यांना चमत्कारिक व वेडेपणाच्या वाटणाऱ्या कांहीं कांहीं गोष्टी त्यांनीं नमूद करून ठेविल्या आहेत. पण त्या साधूंच्या एकंदर जीवनक्रमाची पार्श्वभूमि असलेला जो वेदान्त अगर पारमार्थिक विचार ह्यांची त्या लेखकांना नुसती कल्पना-देखील आलेली दिसत नाहीं. राज्यतृष्णेचें उघड उघड समर्थन करणारी विचारसरणी अंगीं भिनलेल्या ग्रीकांना, त्यागवृत्तीवर आधारलेलें भारतीयांचें तत्त्वज्ञान दिसूं शकलें नाहीं ह्यांत आश्चर्य नाहीं.

भारताशीं आलेल्या पाश्चात्यांच्या संघर्षाला अलेक्झांडरच्या स्वारीपासून सुरुवात झाली असें मानण्यांत येतें. तेव्हांपासून चालू असलेला हा संघर्ष गेल्या तीन साडेतीनशें वर्षांत अत्यंत निकट स्वरूपाचा झाला. ह्या कालावधींतील घटनांचा चित्रपट बहुतांशीं करुणरसानें भरलेला आहे. ह्या संघर्षानें मानवजातीचा कांहीं फायदा झाला का? निदान ह्या संघर्षाच्या अनुभवानें मानवजातीच्या उत्कर्षाला ह्यापुढें तरी कांहीं साह्य होईल का? हे प्रश्न आज विचारवंतांना बेचैन करीत आहेत.

* *

अशा वेळीं पाश्चात्यांच्या तत्त्वज्ञानाच्या बुडाशीं भोगवृत्तीची विचारसरणी असून त्यांच्या राज्यतृष्णेमुळेंच त्यांचा पूर्वेशीं संबंध आला हें लक्षांत ठेविलें पाहिजे. ह्या तृष्णेपायींच सर्व पाश्चात्य राष्ट्रांमध्यें वसाहतवृत्ति बळावत गेल्या आणि त्याचें पर्यवसान दोन महायुद्धांत होऊनही आज जगांत पुन्हां तिसरें महायुद्ध होईल का ? ह्याची सर्वांस भीति वाटत आहे. अजून तरी पाश्चात्य राष्ट्रें भारताचें त्यागाच्या भूमिकेवर उभारलेलें शांततावादाचें तत्त्वज्ञान समजून घेण्याचा प्रयत्न करतील का ?

मागें वळून अगदीं दूरवर क्षितिजाकडे दृष्टि फेकली असतां अलेक्झांडरच्या स्वारीचें चित्र आपण स्पष्टपणें पाहूं शकतों. त्यावरून चित्तवृत्तिनिरोधाच्या तत्त्वज्ञानांतून निघालेला, शांतिसागराकडे अक्षय्य वाहात असलेला भारतीय संस्कृतीचा ओघ आपल्या ध्यानांत येईल आणि त्याबरोबरच त्याच्या अगदीं विरुद्ध दिशेनें जात असलेला तृष्णेचा ओघही आपल्या लक्षांत येईल.

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

ग्रंथालय स्टॅम्प

प्रस्तुत पुस्तिकेंतील घटना
इसवी सनपूर्व ३२६ ह्या वर्षी
वसंतऋतूच्या आरंभापासून
वर्षाऋतूच्या अखेरपर्यंत
घडल्या आहेत.

अंक पहिला

प्रवेश पहिला

सिंधु नदीच्या पश्चिम किनाऱ्यावरील छावणी.
अलेक्झांडर, त्याचे सेनापति व कांहीं सैनिक

अलेक्झांडर : सैनिक हो, आजचा हा दिवस आपल्या इतिहासांत फार महत्त्वाचा समजला पाहिजे. सतत आठ वर्षें अनेक संकटांशीं सामना करून आज हें मॅसिडोनियाचें यशस्वी सैन्य सिंधु नदीच्या तीरावर येऊन थडकलें आहे. सीरिया, बाबिलोनिया, इजिप्त, हिरकानिया आणि बाक्ट्रियाना हे सारे देश आज आपल्या स्वामित्वाखालीं आहेत. पार्शियाचें अफाट साम्राज्य आपण धुळीस मिळविलें आहे. मॅसिडोनियापासून थेट सिंधु नदीपर्यंतची सारी पृथ्वी मॅसिडोनियाच्या यशोदुंदुभीच्या गर्जनेनें भरून गेली आहे.

सेनापति व सैनिक : मॅसिडोनियाचा जयजयकार असो. अलेक्झांडर बादशाहाचा जयजयकार असो.

अलेक्झांडर : पण सैनिक हो, ह्या अपरिमित यशानें आपल्यामध्यें शिथिलता येतां कामा नये. ध्यानांत असूं द्या कीं पराक्रमी पुरुषाला यशोदुंदुभीच्या गर्जनेनें अधिक पराक्रम करण्यास चेव आला पाहिजे.

* *

सेनापति व सैनिक : होय महाराज.

अलेक्झांडर : आपण जिंकलेल्या ह्या प्रदेशावर पूर्वी डेरिअसनें आक्रमण केलें होतें. परंतु ह्या पलीकडील सिंधुदेशावर स्वारी करण्याचें धाडस आजपर्यंत कोणींही केलें नाहीं. सैनिक हो, सिंधु नदी पार करून त्या पलीकडल्या मुलुखावर स्वामित्व गाजविण्याची माझी महत्त्वाकांक्षा आहे, नव्हे, तो देश पादाक्रान्त करण्याचें कंकणच मीं हातीं बांधलें आहे, सैनिक हो, पराक्रमी पुरुषाची तृष्णा केव्हांही शांत होत नसते. अधिक पराक्रमास उद्युक्त होणें हें एकच भवितव्य त्याला असूं शकतें. बोला, पराक्रमी वीर हो, बोला. माझ्याबरोबर पुढें मजल मारण्यास तुम्ही तयार आहांत ना?

टोलेमी आदि सरदार : (प्रणाम करीत) बादशाहांची आज्ञा आम्हांला केव्हाही शिरसावंद्यच असणार. महाराज, सारे सैनिक आपल्या मागोमाग कुठेंही जाण्यास तयार आहेत.

अलेक्झांडर : (समाधानानें) त्याबद्दल मला पूर्ण विश्वास आहे. आणि नुकतेंच तुम्हीं अश्वकांना जिंकलेंत, त्या लढायांमुळें माझी खात्री झाली आहे कीं ह्या इथल्या जंगली लोकांजवळ उत्तम शस्त्रास्त्रें असलीं आणि ते लढण्यांत वाकबगार असले तरीसुद्धां आपले सैनिक त्यांना केव्हांही हार जाणार नाहींत.

चारेस प्रवेश करतो.

चारेस : (प्रणाम करून) महाराज, सिंधु नदी पार करण्यासाठीं पूल बांधण्याच्या कामावर नेमलेले सेनापति हेफास्टिओन आले आहेत.

अलेक्झांडर : वाः वाः! वेळेवर आला. त्याला ताबडतोब इकडे घेऊन ये.

चारेस हेफास्टिओनला घेऊन येतो आणि प्रणाम करून निघून जातो.

* *

हेफास्टिओन : (प्रणाम करून) कॉकेशससारखा दुर्गम पर्वत ओलांडून सिंधुनदीपर्यंतचा हा सारा मुलुख काबीज करणाऱ्या अद्वितीय वीराचा जयजयकार असो.

अलेक्झांडर : शाबास, हेफास्टिओन, शाबास. पुष्कलावतीच्या अष्टक राजाला तीस दिवस वेढा देऊन, तूं अखेर त्याला ठार मारलेंस व त्याचें शहर बेचिराख केलेंस हें मला समजलें आहे. आपल्याला आधींच शरण आलेल्या संजयाला तूं अष्टकाच्या गादीवर बसविलेंस आणि आपलें सैन्य तेथें ठेवून त्या काबीज केलेल्या मुलुखाची नीट व्यवस्था लावलीस तें ठीकच केलेंस. तुझ्या मर्दुमकीबद्दल व धोरणीपणाबद्दल तुला योग्य तें बक्षीस दिलें जाईल. सांग, पुलाचें काम कुठवर आलें आहे ?

हेफास्टिओन : महाराज, पूल तयार आहे. दोन मोठ्या नावा आणि लहान होड्या तर असंख्य प्रमाणांत तयार आहेत. त्यांसाठीं लागलेलें लाकूड मिळवून देण्याच्या कामीं तक्षशिलेचा राजा अंभी ह्यानें आम्हांला फार मदत केली आहे. धान्याचा भरपूर पुरवठाही त्यानेंच केला आहे. महाराज, अंभीचे सरदार आपल्या मुलाखतीसाठीं मजबरोबर आले आहेत. त्यांना आंत बोलाविण्याची आज्ञा व्हावी.

अलेक्झांडर : हं ! आपली छावणी बाक्ट्रा येथें असतांना तक्षशिलेचे जासूद मला भेटण्यासाठीं आले होते तें मला आठवतें. चारेस....

चारेस प्रवेश करतो.

चारेस : (प्रणाम करून) जी हुजूर.

अलेक्झांडर : जा, त्या सरदारांना घेऊन ये.

चारेस प्रणाम करून निघून जातो.

अलेक्झांडर : (जरा हळू आवाजांत) हेफास्टिओन, ह्या मुलुखाची सर्व माहिती गुप्त हेरांकडून काढविली आहेस ना ?

* *

हेफास्टिओन : होय महाराज, गुप्त हेर सर्वत्र पेरून ठेविले आहेत. अंभी आपणास शरण येण्यास उत्सुक आहे असें समजलें आहे.

चारेस व त्याच्या मागोमाग अंभीचे सरदार प्रवेश करतात.

चारेस : (प्रणाम करून) महाराज, तक्षशिलेचे हे सरदार आपणास प्रणाम करीत आहेत.

सर्व सरदार प्रणाम करतात. त्यांतील एकजण पुढें होऊन...

सरदार : न भूतो न भविष्यति अशा अफाट साम्राज्याचे स्वामी असलेल्या पृथ्वीपति अलेक्झांडर बादशाहाचा जयजयकार असो. तक्षशिलेचे अधिपति महाराज अंभी ह्यांचे आम्ही सर्व सरदार आपल्या चरणांचे सेवक आहोंत. (सर्वजण प्रणाम करतात.)

अलेक्झांडर : हं, काय म्हणणें आहे ? बोला.

सरदार : महाराज, आपण बाक्ट्रा येथें असतांना आमच्या महाराजांचे जासूद आपणास भेटले होते. सिंधुदेशावर आक्रमण करण्याचा आपला मानस असल्यास आपणास मदत करण्याचें अभिवचन त्या वेळीं त्यांच्या मार्फत देवविलें होतें. महाराज, आपण काबूल नदी ओलांडून आमच्या प्रांताकडे आक्रमण करण्यास सुरुवात केल्याचें समजल्यापासून आमचे अंभी महाराज आपणास भेटण्यासाठीं अत्यंत उत्सुक आहेत. आज आम्ही आपणासाठीं खंडणी व नजराणा घेऊन त्यांच्याकडून आलों आहोंत. आपण त्याचा स्वीकार करावा. नदी ओलांडून पलीकडे जाण्यासाठीं पूल तयार आहे. तो बांधण्यासाठीं लागलेलें लाकूड आम्हींच पुरविलें आहे. महाराजांनीं तक्षशिलेस यावें. महाराज अंभी आपल्या स्वागताची तयारी करीत आहेत. तक्षशिलेच्या सीमेवर ते आपणास सामोरे येतील.

अलेक्झांडर : ठीक आहे. युमेनेस....

युमेनेस प्रवेश करून प्रणाम करून उभा राहातो.

....ह्यांनीं काय खंडणी आणली आहे तें पाहा.

* *

सरदार : महाराज, दोनशें मण चांदी खंडणीसाठीं आणि शिवाय तीन हजार धष्टपुष्ट बैल व दहा हजार बकरे आपणास नजराणा म्हणून आम्हीं आणले आहेत. शिवाय आपल्या सेवेसाठीं सातशें घोडेस्वार व तीस हत्तीही आमच्याबरोबर धाडण्यांत आले आहेत.

अलेक्झांडर : वा: ! तुमचा अंभी फार उदार दिसतो. त्याला माझा निरोप द्या कीं मीं लवकरच तक्षशिलेस येत आहें. युमेनेस, ह्यांनीं आणलेल्या नजराण्याची योग्य ती व्यवस्था करा आणि त्यांना भरपूर बक्षिसें देऊन मोकळे करा.

युमेनेस व सरदार प्रणाम करून निघून जातात.

टोलेमी, तक्षशिलेचा राजा लढाई न करतां आम्हांला शरण येत आहे, हा आमच्या सिंधुदेशावरच्या स्वारीला मोठा शुभशकुनच झाला असें म्हटलें पाहिजे. फार चांगलें झालें. आपल्या स्वारीची मुहूर्तमेढ ठोका. अथेना देवीला बलिदान करा आणि सर्व सैनिकांना वाटेल तेवढी चैन करूं द्या. घोड्यांच्या शर्यती आणि कुस्त्यांचे फड झडूं द्यात. तीन दिवस सर्वत्र आनंदीआनंद होऊं द्या. नंतर आपण सिंधु ओलांडून तक्षशिलेस जाऊं.

अलेक्झांडर जातो आणि पडदा पडतो.

प्रवेश दुसरा

सिंधु नदीच्या पश्चिम किनाऱ्यावरील अलेक्झांडरचीं छावणी.

तंबूच्या बाहेर रज्जुक दोरीचें वेटोळें हातांत घेऊन उभा आहे.

रज्जुक : माझ्या मागली ही दोरी आणि हें मोजणें केव्हां सुटणार आहे कोण जाणे ! जीव अगदीं रडकुंडीला आला आहे. नको हें काम आणि नको हें जिणें ! (दोरी जमिनीवर फेकून देतो.)

इतक्यांत हातांत कागदांचें भेंडोळें असलेला लिपिकार प्रवेश करतो.

* *

लिपिकार : कां रे बाबा रज्जुका, असा जिवाला कां कंटाळला आहेस ? आणि त्या बिचाऱ्या दोरीवर रे कां तुझा राग ?

रज्जुक : अरे कंटाळूं नको तर काय करूं ? घर सोडल्याला आतां आठ वर्षें होतील, पण बादशाह आपला पुढें पुढेंच चालला आहे. पर्शियाचा सारा मुलुख काबीज केला. जक्सार्टेस नदी पार करून रानटी सिथियन लोकांना चोप दिला. इतके देशांमागून देश जिंकले. तेव्हां वाटलें होतें कीं बादशाह आतां तरी देशीं जायला मागें फिरेल आणि आपल्याला आपलें घर पुन्हा दिसेल. पण छे: बादशाहाला कोठलं समाधान ! आतां ही सिंधुदेशाची स्वारी सुरू केली आहे. कशाला ही उस्तावार चालली आहे कोणास ठाऊक !

लिपिकार : हं, आतां आलें लक्षांत तूं कां कंटाळलास तें. तुला घरची आठवण यायला लागली नाहीं का ? मग तसें म्हण कीं ! त्या बिचाऱ्या दोरीवर कां राग काढतोस ? आणि दुसरें असें पाहा, तुला कामाला कंटाळायला काय झालें आहे रें ? तुझें काम तें काय ? सैन्य पुढें गेलें कीं त्याच्या मागोमाग जायचें आणि त्यानें किती चाल केली तें दोरीनें मोजायचें. त्यांत रे कसली जिकीर ! आणि तुझे ते डिओग्नेटोस व बेटोन-साहेब तर देवमाणूस आहेत. सारा दिवस बिचारे गणित करीत बसतात !

रज्जुक : अरे माझें काम कठीण नाहीं ना ? मग करूं या का आपल्या कामांची अदलाबदल ? तुझें काम तें काय ? बादशाहाच्या स्वारीची आणि त्याच्या छोट्या मोठ्या गोष्टींची हकीकत लिहावयाची. खूप तिखट मीठ लावून लिहिलें कीं झालें !

लिपिकार : राव, पण गांठ आहे आमच्या युमेनेससाहेबांशीं ! अशी खाष्ट आहे स्वारी...

रज्जुक त्याला डोळ्यानें खुणवून गप्प राहायला सुचवितो.

* *

रज्जुक : (लिपिकाराच्या जवळ येऊन) अरे अरे, जरा हळू बोल ना ! जरा मागें पाहा ....

मागाहून युमेनेस व त्याच्या मागोमाग कांहीं शिपाई प्रवेश करतात.

युमेनेस : (जरा वरच्या आवाजांत लिपिकारास) काय रे, कोठें भटकतो आहेस तूं ? आपण कॉकेशस पर्वत ओलांडून आलों त्याचें वर्णन तुला लिहायला सांगितलें होतें. आहे का तें तयार ?

लिपिकार : (कागदांचें भेंडोळें पुढें करीत) होय साहेब, आहे तयार. पण साहेब, आपण जो पर्वत ओलांडून इथें आलों, त्या पर्वताचें नांव आहे हिंदुकूश. कॉकेशस पर्वत तर राहिला फार मागें उत्तरेस कॅस्पियन समुद्राजवळ.

युमेनेस : (लिपिकाराचा कान पकडून) मूर्खा, तुला कितीदा सांगितलं कीं आपण ज्याला ओलांडून सिंधुदेशांत आलों, त्या पर्वताचें नांव कॉकेशस आहे म्हणून ! अरे, आपल्या बादशाहांना तो ओलांडायला एवढे कष्ट पडले ! सारखे दहा दिवस आपण बर्फ आणि वादळ ह्याचा त्रास सहन करीत, जीव मुठींत घेऊन कसेबसे मार्ग काढीत आलों, इतका तो दुर्गम पहाड, तो काय हिंदुकुश असेल होय ! अरे मूर्खा, लहानपणीं शिकलेलें सारें विसरलास वाटतें ? तुला आठवत नाहीं का ? कीं दुनियेंतल्या साऱ्या पर्वतांत अत्यंत उंच व दुर्गम असा पर्वत कॉकेशस असून, आजपर्यंत तो कोणालाही ओलांडतां आला नाहीं. आतां लक्षांत ठेव, (पुन्हा कान पिरगळतो) बाक्ट्रा सोडल्यानंतर कॉकेशस पर्वत ओलांडून अलेक्झांडर बादशाहाचें सैन्य सिंधुदेशांत आलें. (पुन्हा कान पिळीत) आलें लक्षांत ? आतां पुन्हा विसरशील ?

लिपिकार : (गयावया करीत) नाहीं, पुन्हा विसरणार नाहीं. आतां आलें लक्षांत.

* *

युमेनेस : (हातांत कान धरून) आलें लक्षांत ? तर सांग बरं, बाक्ट्रा आणि सिंधुदेश ह्यांमधील पर्वताचं नांव काय ?

लिपिकार : (रडत रडत) कॉकेशस.

युमेनेस : (कान सोडून) लक्षांत ठेव, पुन्हा हिंदुकुश म्हणूं नकोस. अरे वेड्या, असेल त्याचें नांव हिंदुकुश ! आपल्याला काय करायचें आहे त्याच्या खऱ्या नांवाशीं ? बादशाहांच्या बखरी लिहिणाऱ्यांना जरा अधिक अक्कल वापरावी लागते. बादशाह खूष कशानें होईल तें पाहिलें पाहिजे.

लिपिकार : जी हुजूर, बरोबर, अगदीं बरोबर, आतां नाहीं व्हायची चूक माझ्या हातून.

एक शिपाई येतो व प्रणाम करतो.

शिपाई : हुजूर, बलिदानाची सर्व तयारी झाली आहे. बादशाहांना वर्दी द्यायला हवी ना ?

युमेनेस : होय, दिली पाहिजे तर ! ठीक, चला तर मग आपण बादशाहांकडेच जाऊं या.

युमेनेस जातो आणि मागोमाग शिपाईही जाऊं लागतात, तेव्हां एका शिपायाला लिपिकार थांबवतो.

लिपिकार : काय रे, काय आहे हा प्रकार ?

रज्जुक : का रे भय्या, कसली आहे ही घाई ? बलिदान कशासाठीं ?

शिपाई : म्हणजे ! राव, तुम्ही झोपेंत आहांत वाटतें ?

रज्जुक : अरे, मग कर कीं आम्हांला जागें.

शिपाई : तुम्हांला माहीत नाहीं का कीं ह्या सिंधु नदीपलीकडल्या अफाट आणि संपन्न अशा तक्षशिलेचा राजा अंभी, आपल्या बादशाहांना शरण आला आहे. सिंधुदेशाच्या स्वारीला हा चांगला शकुन झाला म्हणून बादशाहांनीं देवतांना बलिदान द्यावयाचें ठरविलें आहे आणि तीन

दिवस सर्वत्र आनंदोत्सव व्हावयाचा आहे. अरे, तक्षशिलेच्या राजानें फार मोठा नजराणा धाडला आहे.

रज्जुक : काय म्हणतोस काय?

लिपिकार : अरे सांग तरी काय काय धाडलें आहे तें.

शिपाई : हें पाहा, बादशाहासाठीं (हातांनीं 'एवढी एवढी' असें दर्शवितो) चांदी आणि आपल्यासाठीं धष्टपुष्ट माजलेले तीन हजार .... (डोक्यावर हात शिंगांप्रमाणें करून, वाकून त्यांच्या अंगावर घुसण्याचा अभिनय करीत) हं समजलं ना! आणखी त्याशिवाय दहा हजार....('बें बें' असें शेळीसारखें ओरडून दाखवितो.)

रज्जुक : वाः राव, तर मग सगळ्यांची चैन आहे बुवा!

शिपाई : अरे, पण मला आतां जाऊं दे. साहेब पुढें गेले आहेत. (घाईघाईनें जातो.)

लिपिकार : गड्या चल, आपणही जाऊं या मजा करायला. राहूं दे तुझी ती दोरी आणि मोजणें सध्या बाजूला.

रज्जुक : चला, जाऊं या. तूर्त तुझें पण तें भेंडोळें बाजूला राहूं दे. चल, लवकर चल. (दोघेही जातात. पडदा पडतो.)

प्रवेश तिसरा

तक्षशिलेच्या सरहद्दीजवळ अलेक्झांडर सैन्य घेऊन आलेला आहे.

अलेक्झांडर : टोलेमी, समोर पाहा. तक्षशिलेच्या सरहद्दीवर युद्धासाठीं सज्ज झालेलें सैन्य दिसत आहे. सामोरा येतों असें आपणास अंभीनें कळविलें होतें, पण आपण गैरसावध आहोंत असें पाहून आपल्यावर तुटून पडण्याचा त्याचा बेत असावा असें दिसतें. ठीक आहे. त्या बेइमान्याची चांगलीच खोड मोडूं या. आपल्या सैनिकांस युद्धास तयार होण्याचा इशारा दे.

ठाणे ... शाखा.
क्र. ६८३२

* *

टोलेमी 'जी हुजूर' म्हणून जाऊं लागतो, इतक्यांत त्याला थांबवून

अरे जरा थांब, तें पाहा, तिकडे तुला कांहीं दिसतें का? तो पाहा, त्या सैन्यांतला एक जंगली माणूस एकटाच पुढें सरसावला आहे आणि भरधाव आपल्याकडे येत आहे.

टोलेमी : होय महाराज, तो इकडेच येत आहे.

अलेक्झांडर : ह्याच्या एकंदर इतमामावरून तो त्या जंगल्यांचा राजा असावा असें वाटतें. पाहूं या हा काय प्रकार आहे तो. युद्धाचा इषारा इतक्यांत देऊं नकोस.

समोरून एकटा अंभी घोड्यावरून भरधाव येऊन पोहोचतो.

अंभी : (प्रणाम करून) मॅसेडोनियापासून थेट सिंधुनदीपर्यंतचे सारे देश वयाच्या केवळ सत्ताविसाव्या वर्षी काबीज करणाऱ्या अलेक्झांडर बादशाहांचा विजय असो. महाराज, सिंधु आणि झेलम ह्या दोन नद्यांमधल्या विस्तीर्ण प्रदेशाचा धनी, तक्षशिलेचा राजा अंभी आपणांस अभिवादन करीत आहे. महाराज, माझ्या सीमेवर आपणास सामोरें येण्याचें अभिवचन मीं अगाऊच दिलें असतां, आपल्या छावणींत असें अस्वस्थ वातावरण कां दिसत आहे? मला वाटतें कांहीं तरी गैरसमज झालेला असावा. महाराज, माझ्या ह्या सर्व सैन्यासह मी आपणांस शरण आलों आहें. आणि हें सांगण्यासाठींच मीं माझें सैन्य बरोबर आणलें आहे. ह्या तक्षशिलेच्या अफाट राज्याचे इतःपर आपणच स्वामी आहांत. मी आणि माझी ही सेना आपल्या सेवेला सदैव तत्पर राहील.

अलेक्झांडर : (खुशीनें) शाबास अंभी. तूं आपल्या वचनास जागला आहेस. सच्च्या दिलाच्या माणसाशीं अलेक्झांडर बादशाहाचे संबंध नेहमीं मित्रत्वाचेच असतात. (उजवा हात पुढें करून, अंभीशीं हस्तांदोलन करतो. इतक्यांत नजराणा घेऊन अंभीचे सरदार प्रवेश करतात.)

* *

अंभी : महाराज, मागें मीं धाडलेली खंडणी व नजराणा आपण गोड मानून घेतलात ह्याबद्दल मला कृतार्थता वाटत आहे. महाराज, माझ्या ह्या तक्षशिला नगरीला आज आपले पाय लागले म्हणून मला हर्ष होत आहे. आणि आजच्या ह्या शुभ दिवसाची आठवण म्हणून आपल्यासाठीं व आपल्या सेनापतींसाठीं मुद्दाम तयार करविलेले हे सोन्याचे मुकुट मी आपणास अर्पण करीत आहें, त्यांचा स्वीकार व्हावा. (आणलेला नजराणा अलेक्झांडरपुढें ठेवून, प्रणाम करून सरदार मागें होतात.) महाराज, ह्या मुकुटाबरोबर ही आठशें मण चांदी आणली आहे आणि पलीकडे छप्पन्न हत्ती उभे आहेत. हें सर्व आपणाला अर्पण करीत आहें.

अलेक्झांडर : अंभी, तूं फार दिलदार दिसतोस. (स्मित करून) पण अंभी, लक्षांत असूं दे, पहिल्याच भेटींत आपली मैत्री झाली असली, तरी अजून मला तुझ्याशीं सामना करावयाचा तो बाकीच आहे. तुझें औदार्य मोठें आहे. तरी पण औदार्याच्या बाबतींत मी तुझ्याशीं सामना करणार आहें. युमेनेस ....

सर्व सेनापति एकमेकांकडे प्रश्नचिन्हांकित चेहेऱ्यानें पाहातात.

युमेनेस : जी हुजूर, आज्ञा व्हावी.

अलेक्झांडर : युमेनेस, एक हजार मण चांदी आणि दोन खेंचरें भरून सोन्याचांदीचीं भांडीं, तक्षशिलेच्या भांडारांत पोचतीं कर. त्याबरोबरच दहा खेंचरें लादून पर्शियन कापडचोपडही जाऊं दे. आणि ऐक, (सर्व सेनापति आपसांत चुळबुळ करूं लागतात.) खुद्द मी वापरतों तसलीं खोगिरें घातलेले तीस उंची घोडे अंभीच्या अश्वशाळेंत धाडून दे.

टोलेमी वगैरे सर्व सरदार आपसांत कुजबुजूं लागतात. टोलेमी पुढें येऊन...

टोलेमी : (बादशाहास, एकीकडे हळू आवाजांत) महाराज, हें काय मांडलें आहे आपण? वाटेल तसल्या संकटांना तोंड देऊन शत्रूपासून

* *

लुटलेली संपत्ति ह्या जंगल्याला आपण मुक्त हस्तानें देऊन टाकण्याचे हुकूम सोडीत आहां.

सर्व सरदार : (एकमेकांस) हें काय, कां म्हणून ह्याला इतकी संपत्ति द्यायची ?

अलेक्झांडर : (त्यांना गप्प बसविण्यासाठीं, त्यांच्याकडे वळून हळू आवाजांत) कां द्यायची तें तुमच्या ध्यानांत नाहीं यायचें. पादाक्रान्त केलेल्या राजांना आपल्या ताटाखालचें मांजर बनविण्याचा हाच खात्रीचा उपाय आहे. तुम्ही गप्प बसा. (अंभीला उद्देशून) अंभी, औदार्याच्या सामन्यांतही अलेक्झांडर बादशाहा कोणाला हार जाणार नाहीं.

अंभी : महाराज, माझी धाव आपल्यापुढें कशी जाणार ? शिवाय माझें आहे तें सारें आपलेंच आहे. मीच आपला सदैव ऋणी असणार !

अलेक्झांडर : अंभी, तूं चतुर आहेस. पण काय रे अंभी, एका बाजूस तुझी ही सारी सेना आणि दुसऱ्या बाजूस थेट क्षितिजापर्यंत पसरलेलीं आणि टप्पोर दाण्यांच्या कणसांनीं ओथंबलेलीं हीं गव्हाचीं शेतें पाहून तुला विचारावेंसें वाटतें कीं, तुझ्या राज्यांत अधिक कोण आहेत ? लढाई मारणारे शिपाईगडी कीं शेती करणारे शेतकरी ?

अंभी : महाराज, माझ्या शेजारीं असलेले दोन राजे माझ्याशीं सतत युद्ध करीत असतात. त्यामुळें शेतकऱ्यांपेक्षां मला लढाई मारणारे शिपाईगडीच माझ्या पदरीं अधिक बाळगावे लागतात.

अलेक्झांडर : कोणते ते दोन राजे ?

अंभी : महाराज, एक उत्तरेकडील पहाडी मुलुखाचा राजा अभिसार व दुसरा झेलम नदीपलीकडच्या विस्तीर्ण देशाचा राजा पौरस. महाराज, पौरस राजा फार बलिष्ठ आहे.

अलेक्झांडर : (रागानें) काय ? पौरस फार बलिष्ठ आहे म्हणतोस ! ह्या अलेक्झांडर बादशाहापेक्षां दुसरा कोणता राजा बलिष्ठ असणार ?

* *

अंभी : (कावेबाजपणानें) महाराज, रागावूं नये, पण खरोखरच पौरस राजा स्वत: अत्यंत शूर व बुद्धिमान् असून, त्याची सेनाही विलक्षण पराक्रमी आहे. महाराज, त्यानें मलाच काय पण आजूबाजूच्या इतर असंख्य राजेमहाराजांनासुद्धा त्राहि भगवन् करून सोडलें आहे. महाराज, सर्वांनाच पौरस राजाचा भयंकर दरारा वाटतो.

अलेक्झांडर : (संतापानें) काय, प्रत्यक्ष डेरियसलाही रणांगणांतून पळ काढावयास लावणाऱ्या ह्या अलेक्झांडर बादशाहापुढें त्या क्षुद्र जंगली पौरसाच्या दराऱ्याच्या गोष्टी!!

अंभी : महाराज, क्षमा करा, आपल्या सीमेला कोणाचाही स्पर्श देखील होऊं देणार नाहीं, अशी पौरसाची प्रतिज्ञा आहे. ती पाळण्यासाठीं आपली पराक्रमी सेना घेऊन शत्रूची वाट पाहात तो नेहमीं आपल्या सीमेवर सज्ज असतो. महाराज, पौरसाजवळ शहाण्णव हत्ती आहेत.

अलेक्झांडर : (रागानें उसळून) बस, बस, पुरे कर! पौरसाच्या पराक्रमाची महती अलेक्झांडर बादशाहापुढें नको. टोलेमी, युमेनेस, झेलम नदीपर्यंतचा हा सारा मुलुख आपल्या ताब्यांत आहेच.

टोलेमी : होय महाराज, अंभीनें आपलें स्वामित्व कबूल केलें आहेच.

अलेक्झांडर : होय, म्हणूनच मी पुढें म्हणतों तें नीट ऐकून घे. शक्य तितक्या लौकर पुढें कूच करण्याच्या तयारीला लागा. त्या उन्मत्त पौरसाची खोड मोडलीच पाहिजे. त्याला निरोप धाडा कीं, ताबडतोब आम्हांला खंडणी धाडून दे व आम्ही लवकरच झेलम नदी ओलांडून तुझ्या प्रांताकडे येत आहोंत, तर आपल्या सीमेवर नजराणा घेऊन आम्हांला सामोरा ये. (अंभीकडे वळून) अंभी, तूं पौरसाला घाबरत आहेस. ठीक आहे. पण त्याच्यावर स्वारी करण्यासाठीं आमच्या सैन्याला जी कांहीं मदत लागेल ती तुझ्याकडून आम्हांला मिळाली पाहिजे.

* *

अंभी : (आनंदानें) महाराज, मी आणि माझी सेना आपल्या सेवेला सदैव तयार आहोंत, हें मीं आपणास आधींच सांगितलें आहे. महाराज, अंभी क्षत्रियाचा बच्चा आहे. आम्ही क्षत्रिय, शत्रूवर चाल करून जाण्याची कोणतीही संधि लाभली असतां कधीं माघार घेत नसतों.

अलेक्झांडर : शाबास ! अंभी, शाबास ! !

अंभी : महाराज, माझी ही पांच हजार सेना आपल्या सेनापतींच्या हुकमतीखालीं वाटेल त्याच्याशीं लढण्यास उत्सुक आहे आणि स्वत: मीसुद्धा आपल्या हुकमतीखालीं राहूं इच्छितों.

अलेक्झांडर : (अंभीच्या पाठीवर थाप मारून) हं, उत्तम.

अंभी : महाराज, आपण पौरसावर आक्रमण करण्याचें नक्की केलेंच आहे. तर मग गुप्त हेर आणि वाटाड्ये ताबडतोब झेलम नदीवर धाडावयास पाहिजेत. पावसाळा तोंडाशीं आला आहे. नदीनाल्यांची माहिती मिळविणें आवश्यक आहे.

अलेक्झांडर : शाबास! अंभी, शाबास! तूं चतुर आणि मुत्सद्दीही आहेस. आपल्याला पुढल्या व्यवस्थेला ताबडतोब लागलें पाहिजे. टोलेमी, युमेनेस, तक्षशिलेचें राज्य अंभीचें अंभीला मी परत देत आहें. त्याला हवा असलेला आजूबाजूचा इतर मुलूखही त्याच्या राज्यांत सामील करा. तक्षशिलेचा राजा म्हणून अंभीच सिंहासनावर बसेल. त्याची सारी सेना आपल्या हुकमतीखालीं आपल्याबरोबर पौरसावरील स्वारींत येईल. तक्षशिलेच्या संरक्षणासाठीं आपलें कांहीं सैन्य इथें ठेवा. फिलिपला येथील अधिकारी नेमा. परचक्र आणि कुटिल कारस्थानी व बंडखोर लोक ह्यांपासून आपलें सैन्य अंभीचें रक्षण करील. राज्याच्या संरक्षणाची जबाबदारी अंभीवर नको. फिलिप त्याची काळजी घेईल. अंभीचे अधिकारी दिवाणी आणि फौजदारी कामें तेवढींच पाहातील. त्यांच्यावर अधिक बोजा नको.

* *

राज्यांतील वसूल गोळा करून तो ते फिलिपच्या स्वाधीन करतील आणि त्याच्याच हुकमाप्रमाणें त्याचा विनियोग केला जाईल.

अंभीचे सरदार अस्वस्थ होतात.

अंभी, आहे ना हें तुला मान्य ?

अंभीचे सरदार अस्वस्थपणानें आपसांत कुजबुजूं लागतात.

काय अंभी, मान्य आहे ना तुला ?

अंभी : होय महाराज, आपली आज्ञा मला शिरसामान्य आहे.

अंभीच्या सरदारांत खळबळ होते. एक सरदार अंभीला बाजूला घेऊन...

सरदार : महाराज, आपण हें काय आरंभिलें आहे ?' ह्या यवनांचा पांढरा पाय आपण अशानें आपल्या जमिनींत रोवून घेत आहां ! महाराज, ह्याचा परिणाम काय होईल ह्याची कल्पना आपणाला आलेली दिसत नाहीं.

सर्व सरदार : महाराज, आपण आमच्यासह गुलामांच्याहून गुलाम बनत आहांत ! !

अंभी : (दटावणीच्या सुरांत) तुम्हांला ह्यांतलें रहस्य' समजायचें नाहीं. अरे हें राजकारण आहे. पौरसाचा कांटा आपल्या बगलेंतून समूळ काढण्याची ही सुवर्णसंधि आहे. ती वायां घालवितां कामा नये.

अलेक्झांडर : (सरदारांच्या चुळबुळीमुळें बेचैन होऊन) अंभी, ह्याचा अर्थ काय ? माझी योजना' तुझ्या ह्या सरदारांना मान्य नाहीं असा का ह्याचा अर्थ ?

अंभी :' नाहीं, महाराज, मुळींच नाहीं. आपण तिकडे लक्ष देऊं नये. महाराज, कोत्या बुद्धीच्या ह्या माणसांना आपल्या मसलती काय कळणार !

अलेक्झांडर : ठीक आहे तर. टोलेमी, जा, पुढल्या व्यवस्थेला लाग. अंभीकडून कांहीं हरकत नाहींच. काय अंभी ?

* *

अंभी : होय महाराज, मी आपल्या आज्ञेबाहेर नाहीं. पौरसाला नामोहरम केलाच पाहिजे. पृथ्वीपति अलेक्झांडर बादशाहाच तें करूं शकतील. महाराज, आपला विजय असो.

पडदा पडतो.

प्रवेश चौथा

तक्षशिला येथील अलेक्झांडरची छावणी.

रज्जुक पोटावर हात फिरवीत डुलत डुलत प्रवेश करतो.

रज्जुक : चैन आहे इथें. ह्या तक्षशिलेंत आल्यापासून यथेच्छ खावें प्यावें, वाटेल तिकडे हिंडावें आणि मौज करावी. किती समृद्ध आहे हा देश. हीं हिरवींगार शेतें, गुरांढोरांचीं खिल्लारें, हरत्‍ऱ्हेचीं फळझाडें, छाया देणारे अजस्र वृक्ष, चित्रविचित्र पशुपक्षी, खरेंच, हा सिंधुदेश म्हणजे नंदनवनच आहे असें म्हटलें पाहिजे.

समोरून लिपिकार प्रवेश करतो. खांद्यावर पोतडी असते.

लिपिकार : का राव, अगदीं डुलत डुलत चाललां आहांत! सैन्याचा तळ एका जागीं असला म्हणजे तुमच्या त्या दोरीला विश्रांति. मग काय! खावें, प्यावें आणि चैन करावी. खरें ना?

रज्जुक : अरे, खरें ना म्हणून काय विचारतोस! असें वाटतें कीं, इथें ह्या तक्षशिलेंतच बूड कायम करावें. इतकी चंगळ करायला आजपर्यंत कोठेंच मिळाली नव्हती. अरे, ह्या तक्षशिलेच्या राजाचा पाहुणचार काय वर्णावा! खरेंच, पण काय रे लिपिकारा, बरेच दिवस तूं दिसला कसा नाहींस? कोठें खास कामावर नेमणूक झाली होती कीं काय?

लिपिकार : मित्रा, काय सांगूं तुला माझी कहाणी! अरे, इथें तक्षशिलेंत तुम्हां सर्वांबरोबर मौज करायला मिळेल म्हणून आनंदांत होतों. इतक्यांत मला आमच्या युमेनेससाहेबांनीं हुकूम दिला कीं, आसपासच्या

* *

खेड्यांत जा आणि सिंधुदेशच्या लोकांचे रीतिरिवाज, पीकपाणी, वगैरे-बद्दलची सारी माहिती गोळा करून आण. करतां काय राव! जावें लागलें ही इथली सारी मौजमजा टाकून; आणि भटक भटक भटकावें लागलें खेड्यापड्यांतून.

रज्जुक : पण बेट्या, तुझा एकंदर नूर पाहून तूं हालाकष्टांत वणवण हिंडत होतास असें कांहीं वाटत नाहीं. चांगला फुगलेला दिसतो आहेस. काय, खरें ना? बरें, बसूं या बाबा जरा. (दोघे बसतात.) तुझ्या शरीरावरून असें वाटतें कीं, तुझीही तिकडे अगदीं चंगळ झाली असावी.

लिपिकार : बरोबर, अगदीं बरोबर ओळखलेंत राव. काय सांगूं रज्जुका, जिथें जिथें म्हणून गेलों तिथें तिथें अगदीं लयलूट झाली. किती आदरातिथ्य करणारे लोक आहेत ह्या देशचे! अरे, एखाद्या अगदीं साध्या झोपडींत पाऊल टाकलें तरी तिथें हवें नको विचारून खाद्यपेयांचा भडिमार करून सोडतात.

रज्जुक : वा: ! तर मग इथून जावें लागलें ह्यांत तुझें नुकसान कांहींच झालें नाहीं. पण काय रे, ह्या लोकांची राहाणी कशी आहे? स्वभावानें कसे असतात?

लिपिकार : राहाणी अगदीं साधीसुधी आहे. त्यांना चैनबाजी मुळींच ठाऊक नाहीं. अरे, ते प्रामाणिक तर पराकाष्ठेचे आहेत. नुसत्या शब्दावर त्यांचे आपसांतले सारे व्यवहार होतात. लफंगेपणाचा अभाव असल्यानें करारमदार फारसे होतच नाहींत.

रज्जुक : काय म्हणतेस तरी काय?

लिपिकार : अरे, घराला कडीकुलुपही लावावें लागत नाहीं. दुसऱ्याच्या चीजवस्तूला कोणी हातच लावणार नाहीं मुळीं. त्यांचे कायदेकानू फार सोपे आणि सरळ असल्यानें त्यांना कज्जे-दावे फारसे करावेच लागत नाहींत.

* *

आणखी तीन-चार शिपाई येतात.

एक शिपाई : काय लिपिकारराव, बरेच दिवसांनीं दिसलांत. चैन आहे ना सध्या!

रज्जुक : अरे गड्या, विचारूं नकोस अगदीं. स्वारी बाहेर खेड्या-पाड्यांतून फेरफटका मारून आली आहे, त्याचेंच वर्णन चालू आहे. ऐका तर खरें. या बसा, बसा असे जवळ. पण काय रे लिपिकार, लोक अंगापिंडानें कसे आहेत रे?

सारेजण लिपिकाराच्या भोवतीं बसतात.

लिपिकार : अरे, तुम्ही हे तक्षशिलेंतले शिपाईगडी पाहिलेत ना? अगदीं तसेच लोक आहेत खेड्यापाड्यांतूनसुद्धा. अगदीं धिप्पाड. उंची मोजून घ्यावी सातसाडेसात फुटांची. आणि हाडापेराचे बळकट. पण इतकें असूनही शिस्तीचे भोक्ते. आडदांडपणा म्हणून कुठेंही दिसायचा नाहीं.

एक शिपाई : हो, पण मला आधीं सांग, तो टेसियास का हेरोडोटोस कोण तो, त्याच्या पुस्तकांत लिहिल्या आहेत, तशा सोनें खणून काढणाऱ्या मुंग्या, आणि तो भयाण मार्टिखोरा प्राणी पाहिलास का रे तूं?

लिपिकार : नाहीं बाबा, मी कांहीं अरण्यांत नव्हतों गेलों तें पाहायला. पण जायची वेळच आली तर तुलाच बरोबर घेऊन जाईन.

दुसरा शिपाई : म्हणजे मार्टिखोरा दिसला कीं परत यायची बातच नको. स्वाहाच करायचा तो दोघांनाही.

रज्जुक : अरे उगीच नको रे मध्यें बोलूंस. हं लिपिकार, सांग बरें. पक्षी पाहिलेस का कुठें?

लिपिकार : अरे हो, एका घरांत मीं एक अगदीं हिरवागार पक्षी पाहिला. माझा पाय उंबऱ्याच्या आंत पडल्याबरोबर अगदीं हुबेहुब माणसासारख्या आवाजांत बोलायला लागला.

* *

शिपाई : काय, सांगतां काय राव!

रज्जुक : मोठीच गम्मत वाटली असेल नाहीं तुला ?

लिपिकार : अरे, आणखी एक आश्चर्याची गोष्ट पाहिली. एके ठिकाणीं झाडाला लोकर लागलेली पाहिली. हे लोक कपडे घालतात ते त्याच लोकरीचे.

दुसरा शिपाई : काय गप्पा ठोकतां राव! झाडाला कुठें लोकर लागते होय!

लिपिकार : तुम्हांला गप्पा वाटतात होय? मग ही प्रत्यक्षच पाहा लोकर (पोतडींतून कापूस काढून कांहींजणांना देतो. सर्वजण आश्चर्यचकित होतात.) आतां तरी खात्री होईल ना तुमची ?

रज्जुक : (कापसाकडे बारकाईनें पाहात) अजब आहे बुवा. आम्हांला कल्पनाच नव्हती अशा गोष्टींची.

लिपिकार : अरे, ह्याहीपेक्षां आश्चर्यकारक आणखी एक गोष्ट आहे.

सर्वजण विस्मित होतात.

रज्जुक : ती रे बुवा कोणती ?

लिपिकार : अरे एका शेतांत गेलों होतों. तिथें एका बांबूचा रस मला प्यायला दिला होता. तो किती मधुर होता म्हणून सांगूं! (मिटक्या मारीत) जन्मांतसुद्धा विसरणार नाहीं मी ती गोडी.

शिपाई : ही मात्र राव थाप आहे तुमची. बांबूतून गोड रस निघतो होय कधीं ?

लिपिकार : अरे वेड्यांनो, तुम्हांला थापच वाटणार. पण ही थाप नव्हे, अगदीं सत्य आहे. (पोतडींतून एक हातभर लांबीचें उंसाचें कांडें काढतो. कांहीं गंडेऱ्या काढतो.) हा पाहा तो रसाचा बांबू.

* *

(एकेक गंडेरी एकेकाच्या अंगावर फेकतो.) पाहा, हे त्याचे तुकडे चावून पाहा. मग मी म्हणतों त्याची खात्री पटेल.

सर्वजण गंडेरी चावतात. त्याच्या गोडीमुळें चकित होऊन, 'वा:! छान, किती रे गोड आहे हा!' असें मिटक्या मारीत म्हणतात.

रज्जुक : (मिटक्या मारीत) खरेंच गड्या, हा देश म्हणजे विचित्र गोष्टींचें भांडारच आहे.

लिपिकार : (विचारी मुद्रेनें) पण एक गोष्ट मला समजत नाहीं.

रज्जुक : ती रे कोणती ?

लिपिकार : अरे येथल्या लोकांत देवदेवता कां नसाव्यात ?

शिपाई : जर देवदेवता नाहींत तर बलि कोणाला अर्पण करतात ?

लिपिकार : (शिपायाच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत) पण एक मात्र खरें कीं, ह्या लोकांना नदीबद्दल अतिशय आदर आहे. नदींत स्नान केलें म्हणजे पवित्र झालों असें त्यांना वाटतें. नदीला ते अन्नदात्री मानतात. ह्या देशाचें नांवदेखील सिंधुनदीवरूनच पडलें आहे. ठाऊक आहे का तुम्हांला ?

रज्जुक : बरोबरच आहे. नदीमुळें डोंगरांतून रेती-माती वाहात येते. त्यामुळें मैदानें बनतात. मैदानांत शेती होते. नदीचें पाणी पिऊन पिकें फोफावतात. नदींतून वाहतुकीची सोय होते आणि जवळ-दूरच्या साऱ्या लोकांना खायला अन्न मिळतें. म्हणून नदीला अन्नदात्री म्हणणें, तिला पवित्र मानणें बरोबर आहे.

दुसरा शिपाई : बरोबर आहे. अगदीं खरें आहे.

रज्जुक : आमचे एक गुरुजी सांगत कीं जिला आपण सध्या नाइल नदी म्हणतों, तिचें पूर्वीचें नांव इलिअडमध्यें इजिप्टिऑस असें आहे. त्यावरूनच त्या देशाचें इजिप्त हें नांव पडलें.

* *

पहिला शिपाई : अस्सें! मग सिंधुनदीमुळें ह्या देशाला सिंधुदेश म्हणतात तें बरोबरच आहे. खरेंच, नदीचें माहात्म्य एवढें आहे आणि ती आपली अन्नदात्री माता आहे हें मला आत्तांपर्यंत कळलें नव्हतें.

लिपिकार : ह्या देशांतले लोक एकंदरीनें फार चांगले आहेत. सच्चे आहेत. दिलदार आहेत. शूर शिपाई असून प्राणांचीही पर्वा न करतां लढणारे खंदे वीर आहेत....

तिसरा शिपाई : काय राव, सारखीं स्तुतिस्तोत्रेंच गात बसलां आहांत.

दुसरा शिपाई : अरे बाबा, तो बांबूचा रस बोलतो आहे हा.

पहिला शिपाई : आणि तो पाहुणचार कसा विसरेल? काय लिपिकारराव, खरें आहे ना आमचें म्हणणें?

रज्जुक : अरे पण हो, जरा थांबा तुम्ही. त्याचें बोलणें पुरें तरी होऊं द्या. मग चालूं द्या तुमचें पांडित्य. मित्रा लिपिकारा, आणखी काय सांगत होतास?

लिपिकार : हं, सांगतों, ऐका. अरे, अजूनपर्यंत ह्या लोकांचें हें इतकें चांगलें वर्णन मीं केलें खरें, पण....

सर्वजण : पण काय?

लिपिकार : पण ह्या लोकांत एक फार मोठा दोष आहे.

सर्वजण : (आश्चर्यानें) दोष? तो कोणता हो?

लिपिकार : तो दोष हा कीं, हे लोक आपसांत भांडत असतात. नेहमीं झगडे आणि लढाया चालू असतात. ह्या सिंधुदेशाच्या लोकांना एकी म्हणजे काय हें ठाऊकच नाहीं.

रज्जुक : अगदीं बरोबर बोललास. इथल्या लोकांमधला हा दुर्गुण पूर्वीच माझ्या ध्यानांत आला होता. अरे, हे लोक जर एकोप्यानें वागले असते तर कुणाची माय व्यायली होती त्यांच्यावर हल्ला करण्याची!

संग्रहालय
क्रमांक २५७८
नों. दि.

* *

अश्वकांना जिंकण्यासाठीं आपल्या बादशाहाला केवढा दारुण संग्राम खेळावा लागला, तें आठवतें ना तुला? अश्वक जर एकजुटीनें लढते तर त्यांनीं आपल्या बादशाहाचा केव्हांच धुव्वा उडविला असता.

लिपिकार : अरे अरे, हळू बोल ना जरा. हें जर कोणाच्या कानीं पडलें, तर डोकें तरी जागेवर राहील का?

शिपाई : आणि आम्ही ऐकणारे म्हणून आमचीही ....

लिपिकार : अरे, गप्प बसा. एकदम गप्प. ते पाहा तिकडून आमचे युमेनेससाहेब आणि कांहीं शिपाई येत आहेत.

शिपाई : आणि बरोबर तो बेड्या घातलेला वेडा पीर कालिस्थेनेसही दिसत आहे. पाहा, संभाळ, नाहीं तर त्याच्यासारखीच तुझीही गत व्हायची रज्जुका!

लिपिकार : चला चला, आपण पलीकडे त्या झाडामागें लपून बसूं. (पळत जातात.)

युमेनेस, बेड्या घातलेला कालिस्थेनेस व कांहीं शिपाई प्रवेश करतात.

कालिस्थेनेस : (संतापानें दांत-ओठ चावीत) काय हक्क आहे ह्या अलेक्झांडरला? ह्याला न्याय म्हणतात का?

युमेनेस : गप्प बैस कालिस्थेनेस. जर तुझें हें बरळणें बादशाहांच्या कानीं गेलें, तर आतां मात्र तुझें धड धड राहाणार नाहीं. किती मूर्ख आहे हा प्राणी! ॲरिस्टॉटलगुरुजींचा हा संबंधी. त्यांनीं सांगितलें म्हणून बादशाहांनीं ह्याला स्वारीबरोबर आणलें. जर नीट राहाता तर आज हा टोलेमीच्या रांकेचा सेनापति बनला असता. पण डोक्यांत काय वेड घेऊन बसला आहे कोणास ठाऊक! म्हणे नीतीची कांस धरली पाहिजे. न्यायानें वागलें पाहिजे. बादशाहांनीं बाबिलोन जिंकल्यावर तेथल्या पुजाऱ्यांना खूष करण्याकरितां तेथील सारी संपत्ति त्यांना वांटून दिली. झाली ह्याची टीका

* *

सुरू. शत्रूला दहशत बसविण्यासाठीं बादशाहांनीं खुद्द आपल्या हातांनीं पर्सिपोलिसचा राजवाडा जाळला, झाली ह्याची बडबड सुरू. म्हणे दारूच्या नशेंत जगांतील एका सर्वोत्कृष्ट इमारतीला अलेक्झांडरनें आग लावली. बादशाहांनीं पर्सिस लोकांना आपलेसे करण्यासाठीं त्यांचे रीतिरिवाज व पोषाख मॅसेडोनियनांना स्वीकारावयास लाविले, फिरलें ह्याचें डोकें. अखेर ह्याची कटकट असह्य झाल्यावर बादशाहांनीं, आपल्या खुनाच्या एका प्रकरणांत ह्याचें अंग आहे, असा ह्याच्यावर आरोप लादून ह्याच्या पायांत बेड्या ठोकल्या आणि ह्याला अंधारकोठडींत कोंडून ठेवण्याची सजा दिली. इतके हाल होत आहेत तरी ह्याचें बरळणें अजून बंद होत नाहीं.

कालिस्थेनेस : तुम्ही माझे हाल हाल करून मला मारून टाकणार आहांत; ठीक आहे. मारा मला. पण युमेनेस, मला उत्तर दे. तूं तुझ्या बादशाहाला विचार, डेरियसनें ग्रीक देशावर आक्रमण केलें होतें म्हणून तुम्ही डेरियसवर चालून गेलांत आणि त्याचें सारें साम्राज्य खालसा केलेंत, हें ठीक. पण ह्या पौरस राजावर स्वारी करण्याचा तुम्हांला काय हक्क आहे? पौरस स्वतःच्या देशांत न्यायनीतीनें राज्य करीत आहे. त्यानें तुमचा कोठलाही अपराध केलेला नाहीं. असें असतां त्याच्यावर हल्ला करण्याची तुमची महत्त्वाकांक्षा कां? ही नीति का? ह्याला न्याय म्हणायचें का? सांग, युमेनेस, मला जाब दे. विचार तुझ्या अलेक्झांडर बादशाहाला आणि दे ह्याचें उत्तर.

युमेनेस : वेड्या पिरा, उत्तर तर नाहींच, पण बादशाहांच्या कानीं ह्याचा नुसता ध्वनि जरी गेला तरी ते ह्यापुढें तुझी मुळींच गय करणार नाहींत. आत्तांपर्यंत तुला चिरडून टाकला नाहीं तें केवळ आपल्या ॲरिस्टॉटलगुरुजींना जाब द्यावा लागेल ह्या विचारानें. पण आतां हें जें कांहीं तूं बरळतो आहेस तें जर त्यांना कळलें तर पौरसावरच्या स्वारीला हा मोठा अपशकुनच आहे असें समजून ते तुझा शिरच्छेदच करतील.

* * * * * * * * * * * * * * * * ** * * * *

आणि कालिस्थेनेस, तुला उत्तरच हवें असेल, तर ऐक. अलेक्झांडर बादशाहा कशाला, मीच देतों तुला उत्तर. कालिस्थेनेस, आम्ही मॅसेडोनियन लोक अलम दुनियेंत बुद्धिमान् व कर्तबगार असल्यामुळें, जगांतील कोणत्याही जंगली लोकांना पादाक्रान्त करून, हवें तर त्यांचीं घरें बेचिराख करून, त्यांना सुधारण्यासाठीं त्यांच्यावर स्वामित्व गाजविण्याचा आम्हांला नैसर्गिक हक्कच आहे....

पडद्यांत तुतार्‍या वाजतात.

ऐक कालिस्थेनेस, ह्या तुतार्‍या ऐक. पौरसावरच्या स्वारीची तयारी झाली आहे असें दर्शविणार्‍या ह्या तुतार्‍या ऐक. (शिपायांस) चला रे. टाका ह्या वेड्याला त्याच्या अंधारकोठडींत. ह्याला येथेंच तक्षशिलेंत खितपत पडूं दे.

पडद्यांत पुनश्च तुतार्‍या वाजतात.

युमेनेस : चला, आटपा लौकर.

सारेजण जातात. पडदा पडतो.

अंक पहिला समाप्त

अंक दुसरा

प्रवेश पहिला

झेलम नदीचा पूर्व किनारा. पौरसाची छावणी.
पौरस व इतर सरदार बोलत आहेत.

पौरस : खंडणी धाडून दे आणि आपल्या सीमेवर मला सामोरा ये असा निरोप अलेक्झांडर बादशाहानें धाडला; पण त्याला ठाऊक नाहीं कीं आजपर्यंत पौरसानें कोणालाही खंडणी दिलेली नाहीं आणि जिवंत जीव असेपर्यंत तो कोणाचेंही स्वामित्व पत्करणार नाहीं. मी अलेक्झांडरला सामोरा आलों आहें; पण तो अंभीप्रमाणें शरणागत म्हणून नव्हे, तर त्याच्याशीं सामना करण्यासाठीं.

दूत प्रवेश करतो.

दूत : (प्रणाम करून) महाराज, यवनांचें सारें लष्कर आपल्या समोर नदी ओलांडण्यासाठीं सज्ज आहे. अंभीची पांच हजार सेनाही त्यांत सामील असून स्वतः अंभी त्या यवन बादशाहाच्या सल्लामसलतींत आहे.

पौरस : अस्सें ! अंभी यवनांना शरण गेला आहे आणि तक्षशिलेंत अलेक्झांडरची छावणी पडली आहे हें समजल्यापासून असें कांहींतरी

* *

होणार हें मला वाटतच होतें. स्वतःच्या पराक्रमानें पौरसाचा पराजय करतां येत नाहीं, तेव्हां हा अंभी आतां यवनांच्या साहाय्यानें माझ्यावर स्वारी करूं पाहात आहे तर !

एक सरदार : महाराज, सिंधुनदी ओलांडून ह्या आमच्या देशाकडे वाकड्या नजरेनें पाहाण्याचीही हिंमत आजपर्यंत कोणा परकीयाला झाली नाहीं. पण आज आमच्यापैकींच एक राजा आपसांतील वैर साधण्यासाठीं ह्या यवनांचे पाय आमच्या भूमींत रोवूं पाहात आहे. स्वतः दास्य पत्करून आमच्याही पायांत दास्यशृंखला अडकवूं पाहात आहे.

पौरस : होय, सरदार हो, वेळ आणीबाणीची आहे खरी. खऱ्या क्षात्रधर्माला जागून आपण शत्रूशीं सामना केला पाहिजे. नदीकडे तोंड करून किनाऱ्यावर सैन्याची मांडणी करा. आघाडीवर शंभर शंभर फुटांवर एक अशी हत्तींची योजना करा. त्यांमध्यें पायदळ खडें करा. त्याच्या मागोमाग घोडेस्वार असूं द्यात. जेथें जेथें म्हणून शत्रुसैन्य नदी ओलांडून वर येण्याचा प्रयत्न करील तेथें तेथें त्याच्यावर लगेच तुटून पडा. मायभूमीचें स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं प्राणांचीही पर्वा करूं नका.

एक सरदार : महाराज, आपण निश्चिंत असा. जिवांत जीव असेपर्यंत आपले सारे सैनिक शत्रूशीं सामना करतील.

पौरस : माझा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे.

दुसरा सरदार : महाराज, अभिसार राजाला आपला निरोप कळला असेलच. उत्तरेकडून नदीकिनाऱ्यानें येऊन तो आपल्याला उजव्या बगलेंत साथ देईल.

पौरस : होय. तो वेळेवर येईल अशी माझी खात्री आहे. दोन्ही राजपुत्रांना नदीकिनाऱ्यावर टेहळणी करण्यासाठीं धाडून द्या. परकीयांचें

* *

आक्रमण होऊन घनघोर युद्ध होण्याची वेळ समीप असतां पौरसाचे पुत्र छावणींतच राहून सैन्याला हुकूम सोडीत आहेत असें होतां कामा नये.

एक सरदार : महाराज, आम्ही आघाडीवर राहाणार असा हट्ट घेऊन राजपुत्र आधींपासून सज्ज होऊन बसले आहेत.

पौरस : उत्तम. त्यांना उत्तरेस आघाडीवर धाडा. माझा हत्ती तयार ठेवा. त्याच्या गळ्यांत केशरी फुलांच्या माळा घाला. हातांत कंकण बांधून मग हातांत भाला घे असें माहुताला सांगा.

सर्व सरदार गर्हिवरतात.

सरदार : महाराज, महाराज, आपण असें कां बोलत आहां ?

पौरस : एकटे यवनच जर माझ्यावर चाल करून आले असते तर त्यांची मीं पर्वा केली नसती. पण त्यांच्याबरोबर अंभी आहे. अंभी कुटिल व कारस्थानी आहे. आपल्या मुलखांतील खांचखळग्यांची त्याला माहिती आहे. यवन बादशाहा बुद्धिमान् व धूर्त आहे. अंभीचा उपयोग तो कसा करून घेईल ह्याची कांहीं कल्पना करतां येत नाहीं.

एक सरदार : महाराज, कांहींतरी अनिष्ट घडणार असें आपली मनोदेवता आपणास सुचवीत असावी असें दिसतें. तर मग महाराज, आम्हांला आज्ञा द्या. सर्व सैन्य एका क्षणांत नदीपार नेऊन आम्ही शत्रूच्या छावणीवर तुटून पडूं आणि त्याची दाणादाण करून टाकूं.

पौरस : नाहीं. असें कदापि होणार नाहीं. आपली सरहद्द ओलांडून जाऊं नका. पौरसानें अंभीच्या राज्यांत घुसून त्याच्यावर हल्ला केला असा पौरसाचा बदलौकिक होऊं देऊं नका. कोणावरही आक्रमण करूं नका. कोणालाही आपल्यावर आक्रमण करूं देऊं नका. खऱ्या क्षत्रियांप्रमाणें छाती ठोकून समोरासमोर सामना करण्यासाठीं शत्रूसमोर उभे राहा. मर्दाप्रमाणें शत्रूशीं सामना करा.

* *

एक सरदार : महाराज, ती पाहा, यवनांच्या छावणींत मोठ्या प्रमाणावर सैन्याची हालचाल सुरू झाली आहे.

पौरस : (तिकडे पाहून) होय. बरोबर आहे. जा, सर्वांना सावधान राहाण्याची आज्ञा द्या. जेथें जेथें नदी ओलांडून वर येण्याचा शत्रु प्रयत्न करील तेथें तेथें त्याच्यावर ताबडतोब तुटून पडा. माझा हत्ती आणा. मीही आघाडीवरच राहातों.

पडदा पडतो.

प्रवेश दुसरा

झेलमचा पश्चिम किनारा. अलेक्झांडरची छावणी.
अलेक्झांडर, त्याचे सेनापति व अंभी बोलत आहेत.
इतक्यांत युमेनेस प्रवेश करून प्रणाम करतो.

अलेक्झांडर : काय रे युमेनेस, देवीला बलि दिलेत ना? देवीचा प्रसाद काय मिळाला?

युमेनेस : महाराज, देवीनें आज्ञा दिली. शकुन फार चांगला झाला आहे.

अलेक्झांडर : वाः! तर मग निर्धास्त राहायला हरकत नाहीं. साऱ्या छावणींत दवंडी पिटवा. सगळ्या सैन्याला कळूं द्या कीं, पौरसा-वरच्या आपल्या स्वारीला चांगला शकुन झाला आहे.

युमेनेस : जी हुजूर, आज्ञेप्रमाणें व्यवस्था करतों.

प्रणाम करून जातो.

अलेक्झांडर : (समोर पाहून) टोलेमी, पौरसाचें सैन्य आपला हल्ला छातीवर झेलून मागें परतविण्यासाठीं उत्सुकतेनें वाट पाहात किनाऱ्यावर सज्ज असलेलें दिसत आहे.

* *

टोलेमी : महाराज, पौरसाच्या सैनिकांचीं शस्त्रास्त्रें, त्यांचीं चिलखतें, शिरस्त्राणें उत्कृष्ट दर्जाचीं असावींत असें दिसतें. सैन्यही मोठ्या शिस्तीनें उभें आहे.

अलेक्झांडर : होय टोलेमी, अशा तऱ्हेची सेना आजपर्यंत सबंध आशियांत आपणांस कोठें भेटली नव्हती. आतां होणारा हा सामना आपणाशीं तुल्यबल असलेल्या शत्रूशीं होणार आहे. असाधारण शक्तीचे शिपाई आणि अक्राळविक्राळ दिसणारे हत्ती ह्यांच्याशीं आपणांस आतां एकाच वेळीं लढावें लागणार आहे. मला विशेष फिकीर वाटत आहे ती आपणाकडे तोंड करून उभ्या असलेल्या ह्या हत्तींची. येथेंच नदी ओलांडून त्यांच्यासमोर जाणें शहाणपणाचें होणार नाहीं. आपण पाण्यांतून चढून वर जातों न जातों तोंच पौरस आपणांवर तुटून पडेल. हत्तींचें तें अक्राळविक्राळ स्वरूप पाहून घोडे बुजतील व मागें नदींतच उड्या घेतील. मोठा पेंचप्रसंग आहे. कांहीं तरी क्लृप्ति काढल्याशिवाय गत्यन्तर नाहीं.

टोलेमी : होय महाराज, ह्यावेळीं फार सावधगिरीनें वागलें पाहिजे. सामर्थ्यापेक्षां डावपेंचावरच आपणांस अधिक भिस्त ठेवावयास हवी.

सर्वजण विचारांत पडतात.

अंभी : (गंभीरतेचा आव आणून) महाराज, मी सुचवितों ह्यांतून मार्ग. तिकडे पाहा. (अलेक्झांडर वगैरे तिकडे उत्सुकतेनें पाहूं लागतात.) नदीकिनाऱ्यावरून आपल्यासमोर उत्तरेस दृष्टि फेका. आपणांस एक बारकीशी टेकडी दिसते आहे ना ? नदी एकदम वाकडी वळली आहे तेथें पाहा. त्या टेकडीवर दाट व उंच उंच झाडें आहेत. दिसलीं आपल्याला ?

अलेक्झांडर : होय, होय; दिसलीं मला.

अंभी : त्याच्याच समोर नदीच्या पात्रांत पाहा. तेथें एक मध्यमसें बेट आहे. त्यावरही दाट झाडी आहे. तें निर्जन आहे. (अलेक्झांडरच्या

* *

कानांत समजावून सांगतो.) आलें ना आपल्या ध्यानांत ? आपण हीच क्लृप्ति योजा. नक्की यश आलें पाहिजे.

अलेक्झांडर : (खूष होऊन) वाः वाः ! अंभी, शाबास, तूं डोक्याचा आहेस खरा. तुझी ही युक्ति सोळा आणे यशस्वी होईल. अरे क्राटेरोस, तुम्ही असें करा, आपलें सैन्य नदी ओलांडून जाण्याच्या अगदीं तयारीला लागलें आहे, असें पौरसाला भासविण्यासाठीं सैन्याची हालचाल चालू करा. कांहीं वेळानें ती थांबवा. मग थोडया वेळानें ती पुन्हा सुरू करा. रात्रींही तोच क्रम चालू ठेवा. नेहमीं गडबड गोंगाट माजलेला असूं द्या. पौरस हल्ला परतविण्यासाठीं सज्ज आहे; त्याला तसाच गुंतवून ठेवा. यत्किंचितही कसूर करूं नका.

क्राटेरोस : (उल्हसित मुद्रेनें) होय महाराज, आलें माझ्या लक्षांत. पौरसाला आम्ही बरोबर गुंतवून ठेवतों.

अलेक्झांडर : टोलेमी, हेफास्टिओन, रात्रीच्या वेळीं अर्धे सैन्य घेऊन आपण मुकाट्यानें आपल्या छावणीच्या पिछाडीनें किनारा सोडून दूर अंतरावरून उत्तरेस कूच करून, त्या टेकडीच्या मागें जाऊं. तेथून त्या बेटावर जाऊं आणि बेटावरून सरळ नदी ओलांडून समोरच्या किनाऱ्यावर पोचूं. कळलें ना ?

टोलेमी : (हर्षानें) होय, होय महाराज, अगदीं सोळा आणे फत्ते होणार काम आपलें.

अलेक्झांडर : ऐकून घे. टेकडीवर तशीच बेटावर गर्द झाडी आहे. आपल्या हालचाली पौरसाला दिसणार नाहींतच. पलीकडल्या किनाऱ्यावर पोचतांच आपण खालीं चाल करून येऊं. क्राटेरोस,....

क्राटेरोस : जी हुजूर.

* *

अलेक्झांडर : लक्षांत ठेव, तुम्ही तेथून पौरसाला हुलकावण्या देण्याचें काम चालू ठेवा, म्हणजे त्याचें सारें लक्ष तुम्हांवर असेल. आम्ही खालीं चाल करून येऊं आणि पिछाडीनें त्याच्या बगलेवर अकस्मात् हल्ला चढवूं. पौरस बेसावध असेल. आमचा अचानक आलेला हल्ला पाहून तो उत्तरेकडे आमच्या बाजूला तोंड फिरवील. त्याच्या सैन्यानें आमच्याशीं सामना करण्यास सुरुवात केल्यावर मग तुम्ही नदी ओलांडून या व पौरसाच्या पिछाडीवर हल्ला चढवा. दोन्ही बाजूंच्या आकस्मिक हल्ल्यांमुळें पौरसाची दाणादाण उडेल. क्राटेरोस, पुन्हा सांगतों, लक्षांत ठेव....

क्राटेरोस : हुजूर, आपण काळजी करूं नका. आपल्या आज्ञेबाहेर मी तसूभरही जाणार नाहीं.

अलेक्झांडर : लक्षांत ठेव क्राटेरोस, जोंपर्यंत हत्तींचीं तोंडें नदीकडे आहेत तोंवर घोडेस्वारांना नदी ओलांडण्याचा हुकूम देऊं नकोस. मला ह्या हत्तींची फार भीति वाटते. त्या राक्षसांना पाहून घोडे मागें पाण्यांतच उड्या घेतील. म्हणून फार सावध राहा.

क्राटेरोस : जी हुजूर, मी अत्यंत सावधगिरीनें वागेन.

अलेक्झांडर : आणि हें पाहा आटलोस...

आटलोस : (पुढें येऊन) जी हुजूर.

अलेक्झांडर : तूं लांबून माझ्यासारखा दिसतोस. तेव्हां रात्रीं मी छावणी सोडून उत्तरेकडे कूच करून निघालों कीं तूं माझ्यासारखा पोशाख अंगावर घाल आणि घोड्यावर स्वार होऊन माझ्या तंबूसमोर फेऱ्या घालीत राहा. मधून मधून खोटेच हुकूम फर्मावीत जा. म्हणजे समोर पौरसाला वाटेल कीं अलेक्झांडर बादशाहा अजून छावणींतच आहे. आलें ना लक्षांत ?

* *

आटलोस : (उल्हसित मुद्रेनें) होय महाराज, नीट लक्षांत आलें. मी हुबेहूब वतावणी करतों.

अलेक्झांडर : सर्वजण नीट सांभाळून वागा. वेळ आणीबाणीची आहे. अंभी, तुला आम्ही आमच्याबरोबर स्वारींत आणलें हें फार चांगलें झालें. तुझ्यामुळेंच पौरसावर हल्ला करणें आज आम्हांला शक्य होणार आहे.

हेर घोड्यावरून भरधाव येतो.

हेर : (प्रणाम करून) महाराजांचा जयजयकार असो. महाराज, मला आत्तांच कळलें कीं पौरसानें अभिसार राजाला मदत घेऊन येण्यासाठीं निरोप धाडला आहे. अभिसार उत्तरेकडून खालीं चाल करीत येऊन आपल्या उजव्या बगलेंत शत्रूशीं लढाई खेळेल अशी पौरसाची अपेक्षा आहे.

अलेक्झांडर : वा: ! मग तर उत्तमच झालें. दुधांत साखर पडली. अभिसार येणार नाहीं ह्याची मला खात्री आहे. तर मग आपण जेव्हां त्या बेटावरून पलीकडे जाऊन खालीं नदीकिनाऱ्यानें चाल करूं लागूं तेव्हां पौरसाला वाटेल कीं अभिसाराचेंच सैन्य मदतीला येत आहे. आपल्याला त्याच्यावर तुटून पडण्याला तेवढी अधिक चांगली संधि लाभेल. (हेराला) शाबास, तूं फार महत्त्वाची बातमी आणलीस. (क्राटेरोस वगैरेंना उद्देशून) क्राटेरोस, आटलोस, तुम्ही सारेजण नीट सांभाळून अक्कलहुशारीनें वागा. पौरसाला हुलकावण्या देण्याचें काम नीट चालू ठेवा.

क्राटेरोस, आटलोस : जी हुजूर, आम्ही अगदीं दक्षतेनें वागूं.

अलेक्झांडर : जा, त्वरेनें कामाला लागा.

'जी हुजूर' म्हणून ते जातात आणि पडदा पडतो.

* *

प्रवेश तिसरा

झेलम नदीचा पूर्व किनारा. खांद्याला बाण लागल्यानें पौरस रक्तबंबाळ होऊन हत्तीवरून खालीं पडलेला असून, हत्ती सोंडेनें त्याच्या अंगांतील बाण काढीत आहे.

पौरस : (सुस्कारा टाकून) अखेर माझी फसगत झाली. शत्रूशीं सामना करण्यासाठीं छातीठोकपणें आम्ही त्याच्या समोर उभे असतां, शत्रूनें आमच्या पाठींत खंजीर खुपसला. पण शाबास माझ्या सैनिकांनो, (बाजूस असलेल्या मृत सैनिकांकडे पाहात) खऱ्या क्षात्रधर्माला जागून तुम्हीं 'आपल्या पराक्रमाची पराकाष्टा केलीत आणि हजारांनीं आपले देह धारातीर्थी ठेवलेत. तुमचें नांव अजरामर होवो.

अंभी दबत दबत त्याच्या समोर येतो.

अंभी : पौरसा ....

पौरस त्याच्याकडे तुच्छतेनें पाहून जवळच पडलेला बाण हातांत घेऊन त्याच्यावर फेकतो.

पौरस : खबरदार देशद्रोह्या !

अंभी घाबरून मागें होतो. उद्वेगामुळें पौरसाला मूर्च्छा येते, इतक्यांत एका बाजूनें ३।४ यवन शिपाई पौरसाकडे धावत येतात. दुसरीकडून अलेक्झांडर येतो. त्याच्या मागोमाग टोलेमी वगैरे सरदार येतात.

अलेक्झांडर : (शिपायांस), बाजूला व्हा. (क्षणभर दिङ्मूढ होऊन पौरसाकडे पाहातो.) काय, मीं सत्यसृष्टींत आहें ? केवढा धिप्पाड गडी हा ! घायाळ होऊन पडला तरी ह्याच्या चेहेऱ्यावर किती तेज आहे हें ! शत्रूच्या बाणांचा सतत वर्षाव होत असतांही ह्यानें केवढें शौर्य दाखविलें !

पौरस हळूहळू शुद्धीवर येतो. बसतो. नंतर उभा राहाण्याचा प्रयत्न करतो. तोल जातो आहे असें पाहून, बाजूचे दोन सेनापति त्याला आधार देऊन उभा करतात.

* *

अलेक्झांडर : पौरसा, रणांगणावर आज मीं तुला जिंकलें असलें तरी तुझें शौर्य किती अचाट आहे हें मीं प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहिलें आहे. राजा, सांग, मी तुला कसा वागवूं ?

पौरस : (बेपर्वाईच्या स्वरांत) बादशाहा, तुला हवें तसें वागव. रणांगणावर पडलेला क्षत्रिय वीर कोठल्याही भवितव्याला डरत नसतो.

अलेक्झांडर : नाहीं पौरसा, मी तुला पुन्हा विचारतों, सांग, तुला मीं कसें वागवावें अशी तुझी इच्छा आहे ?

पौरस : बादशाहा, तुझा आग्रहच असेल तर सांगतों, ऐक ! वैभवाच्या अत्युच्च शिखरावर विराजमान झालेला पुरुष क्षणार्धांत कसा धुळीस मिळून जातो हें तूं आत्तांच पाहिलें आहेस. बादशाहा, ह्या घटने-वरून जो धडा घ्यावयाचा तो लक्षांत घेऊन मला हवें तसें वागव.

अलेक्झांडर : शाबास, राजा, शाबास ! तूं शूर आहेस एवढेंच नव्हे, तर विचारी आणि विवेकीही आहेस. पौरसा, तुझें राज्य मीं तुला परत देत आहें. टोलेमी, ह्याला शुश्रूषेची अत्यंत जरूरी आहे. त्याची उत्तम व्यवस्था ठेवा. पौरसा, तुला आराम वाटल्यावर आपण पुढल्या तजविजीला लागूं.

पौरसाला दोन सरदार अदबीनें घेऊन जातात.

अलेक्झांडर : (टोलेमीस एकीकडे) टोलेमी, अंभीवर नीट नजर असूं द्या. पौरसाची असहाय अवस्था पाहून तो कदाचित् त्याला दगा देण्याचा प्रयत्न करील. आपल्या पुढल्या बेतांत आपल्याला पौरसाचें फार साह्य होईल. त्याला नीट जपा.

टोलेमी : होय महाराज, मी त्याची काळजी घेतों.

अलेक्झांडर : युमेनेस, आत्तांपर्यंतच्या आपल्या ह्या आठ वर्षांच्या साऱ्या मोहिमांत आजचा हा संग्रामच सर्वांत दारुण ठरला. आपल्या तोडीचा

* *

शत्रु आज आपल्याला भेटला. बिचारा पौरस ! आमच्या डावपेंचांची त्याला काय कल्पना? अभिसाराचें सैन्य वरून मदतीला यावयाचें त्याऐवजीं शत्रुच आपणावर अचानक हल्ला करीत आहे हें काय त्याला ठाऊक? आजच्या ह्या यशाचें सारें श्रेय अंभीला दिलें पाहिजे. (आजूबाजूला पाहून) अरे, पण अंभी कोठें दिसत नाहीं?

अंभी आनंदित चेहेऱ्यानें प्रवेश करतो.

अंभी : काय महाराज, हा अंभी आपल्या सेवेला हजर आहे.

अलेक्झांडर : शाबास अंभी ! त्या दिवशीं रातोरात उत्तरेच्या बाजूस कूच करून त्या टेकडीमागून नदी ओलांडण्याची कृति जर तूं सुचविली नसतीस तर आजचा हा दिवस आम्हांला खास लाभला नसता.

अंभी : महाराज, आपल्या उपयोगीं पडतां आलें ह्याबद्दल मला धन्यता वाटत आहे. पौरसाजवळ शक्ति असली तरी कारस्थानी डावपेंच जाणण्याची बुद्धि कमी आहे हें मला ठाऊक होतें.

अलेक्झांडर : (अंभीच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत) टोलेमी, आजच्या ह्या झेलम नदीकांठच्या संग्रामाची आठवण चिरायु करण्यासाठीं येथें ह्या ठिकाणीं एक मोठें शहर वसवा. त्याचें नांव 'निकाया' ठेवा. समोरच्या बाजूस जेथें आपली छावणी होती तेथें एक दुसरें शहर वसवा. त्याला माझ्या लाडक्या घोड्याचें (कंठ भरून येतो.) 'बुकेफाला' हें नांव द्या. उमदा प्राणी ! अखेरपर्यंत त्यानें माझी एकनिष्ठपणें सेवा केली.

टोलेमी : होय महाराज, असा घोडा पुन्हा दिसावयाचा नाहीं.

अलेक्झांडर : आपल्या सैनिकांपैकीं जे वृद्ध व पंगु झाले असतील त्यांना येथें घरेंदारें बांधून द्या. जमीन-जुमला द्या. त्यांना येथले रहिवासी होऊं द्या.

युमेनेस : जशी आज्ञा, महाराज.

* *

अलेक्झांडर : आजच्या ह्या विजयामुळें पूर्वेचें द्वार आपणास खुलें झालें आहे. सूर्यदेवतेची ही कृपा आहे, म्हणून सूर्याला खास बलि अर्पण करा. सैनिकांनीं आज फार मर्दुमकी गाजविली म्हणून त्यांना मनसोक्त मौजमजा करूं द्या. सर्वत्र आनंदोत्सव साजरा करा. महिनाभर येथेंच आपण विश्रान्ति घेऊं आणि मग पुढल्या मोहिमेचा विचार करूं.

सर्वजण निघून जातात. रज्जुक व लिपिकार असे दोघेच मागें राहातात.

रज्जुक : (डोळ्यांत पाणी आणून स्वस्थपणें बसलेल्या पौरसाच्या हत्तीकडे पाहात) आपल्या धन्याला जयश्रीनें माळ घालावी म्हणून' अक्राळ विक्राळ रूप धारण करून थोड्याच वेळापूर्वी ह्या रणभूमीवर थैमान घालीत असलेला ह्या गजश्रेष्ठ किती निमूटपणें आतां येथें पडून राहिला आहे ! आपल्या मालकाचा झालेला पराजय पाहून डोळ्यांतून अश्रु ढाळीत आहे. किती शहाणा आहे हा प्राणी !

लिपिकार : पण रज्जुका, मला हें समजत नाहीं कीं एकाएकीं हें असें काय झालें ? आपल्या सैन्यानें वरून येऊन पौरसावर अचानक हल्ला केला, पौरसानें विजेच्या चपळाईनें मोर्चा वळवून ताबडतोब हल्ला परतविण्यास सुरुवात केली. थोडक्या वेळांतच घनघोर संग्राम जुंपला. आपल्या सैन्याची दाणादाण उडाली. पौरसाच्या हत्तींनीं आपल्या शिपायांना पायांखालीं चिरडलें, तर कांहींना सोंडेंत धरून पिळवटून टाकलें. त्या क्षणीं वाटलें कीं आपली आतां धडगत नाहीं. परंतु इतक्यांत एकाएकीं काय घडलें आणि पौरसावर बाजू कशी उलटली हें कांहींच कळत नाहीं.

रज्जुक : होय लिपिकारा, माझ्याही तें बरोबर लक्षांत येत नाहीं. मी ह्या पलीकडच्या वडाच्या झाडावर लपून बसलों होतों. दोन्ही बाजूंस भीषण संग्राम चालू होता. पौरसाचे हत्ती आपल्या सैनिकांना तुडवीत होते; आपले घोडेस्वार त्यांना बाणांनीं जर्जर करीत होते.

* *

लिपिकार : होय, बरोबर आहे. आणि ह्या धुमाळींत एकदम सर्व हत्तींत उंच असलेला हा हत्ती आपल्या सैनिकांच्या लक्षांत आला. त्यावर आरूढ झालेल्या पुरुषाच्या तोंडावर विलसणारें राजतेज पाहून हा पुरुषश्रेष्ठ राजा पौरसच असला पाहिजे असें तात्काळ सर्वांनीं ओळखलें. ताबडतोब सर्व बाजूंनीं त्याच्यावर बाणांचा वर्षाव सुरू झाला; पण तो वीरश्रेष्ठ तितक्याच धैर्यानें त्या सर्वांना बेडरपणें तोंड देत होता. तें दृश्य मी डोळे भरून पाहात होतों. पण इतक्यांत मेघांच्या प्रचंड गर्जना झाल्या आणि मुसळधार पाऊस पडूं लागला. आधींच रणांगणावर चिखल झालेला. त्यांत पावसाची भर पडली. सर्व ठिकाणीं एकच गोंधळ माजला. पण पुढें काय झालें तें माझ्या लक्षांत आलें नाहीं.

रज्जुक : मी सांगतों ऐक. मी त्या वेळीं झाडावरून पाहात होतों. आपले घोडेस्वार पौरसावर सर्व बाजूंनीं बाणांचा प्रचंड वर्षाव करीत होते आणि पौरस अंगावरले बाण अचाट पराक्रमानें मागें परतवीत होता. पण इतक्यांत एक बाण त्याच्या उजव्या खांद्यांत घुसला. आधींच पौरस दमलेला, त्यांत त्या बाणामुळें तो रक्तबंबाळ झाला, त्यामुळें त्याला मूर्च्छा आली. नंतर तो आतां खालीं पडणार हें ह्या इमानी हत्तीनें ओळखलें आणि आपला धनी खालीं पडून त्याला इजा होऊं नये, त्याला सांवरून धरतां यावें म्हणून हा इमानी हत्ती खालीं बसला. पुढें काय घडलें हें मला समजलें नाहीं. पण त्यानंतर लढाईचें पारडें आपल्या बाजूस फिरलें एवढें खरें.

लिपिकार : मला वाटतें, असें झालें असेल. राजहत्ती बसला म्हणून इतर सारे हत्ती बसले असतील. त्यांना तशी शिस्त लावलेली असते. आणि मग एकदा बसल्यावर चिखलामुळें त्यांना लगेच पुन्हा वर उठतां आलें नसेल. त्याचा फायदा घेऊन आपल्या स्वरांनीं त्यांच्या माहुतांवर बाणांचा मारा करून त्यांना लोळविलें असेल आणि पायदळांनीं हत्तींच्या अंगापायांवर कुऱ्हाडीचे घाव घालून हत्तींना जर्जर केलें असेल !

* *

रज्जुक : बरोबर, अगदीं बरोबर. असेंच झालें असेल आणि मग अशा तऱ्हेनें हत्तींची दाणादाण उडाली असेल आणि विजयश्रीनें आपल्याला माळ घातली असेल.

लिपिकार : अरे, इतरांना जाऊन बराच वेळ झाला. तिकडे आतां आनंदोत्सव सुरू झाला असेल. चल, आपण जाऊं या. हजीर तो वजीर. नाहीं तर आम्ही असेच कोरडे राहायचे. चल, चल लवकर.

रज्जुकाला ओढीतच नेतो. पडदा पडतो.

प्रवेश चौथा

झेलम नदीचा पूर्व किनारा. अलेक्झांडरची छावणी. शेकोटी पेटवून कांहीं यवन शिपाई गप्पा मारीत बसले आहेत. त्यांत रज्जुकही आहे.

पहिला शिपाई : ही झेलमची लढाई होऊनं महिना झाला. अजून नुसती आठवण झाली तरी अंगांत कांपरें भरतें. आम्ही स्वतःला तगडे शिपाई समजत होतों. पण ह्या पौरसाच्या शिपायांनीं आमची चांगलीच कणिक तिंबली. त्या हत्तींची तर मला दहशतच बसली आहे.

रज्जुक : अरे, एवढें भ्यायला काय झालें! फुकट बादशहाच्या सैन्यांत भरती झालास.

पहिला शिपाई : खरें आहे रे रज्जुसाहेबा. पण लढाई म्हणजे कांहीं दोरी लावून जमीन मोजणें नव्हे, समजलास!

दुसरा शिपाई : अरे, रणांगणावर जाऊन त्या हत्तींशीं सामना करायचा म्हणजे काय तें रज्जुकाला कसें समजणार? हत्ती माणसाला सोंडेनें पिळवटून टाकून त्याच्या हाडांचा चुरा कसा करून टाकतो (अंगावर शहारे आणीत) हें जेव्हां तो डोळ्यांनीं पाहील....

तिसरा शिपाई : तेव्हां झोपेंतच काय पण जागेपणींसुद्धां दचकेल स्वारी आणि कोणीं हत्तीचें नुसतें नांव काढलें तरी धूम ठोकील!

* *

लिपिकार प्रवेश करतो.

लिपिकार : काय राव, काय चाललें आहे ? शिळोप्याच्या गप्पा चालल्या आहेत वाटतं !

रज्जुक : अरे, गप्पा रंगांत यायला तूं हवा होतास. ये, बैस, बैस. (हात धरून आपल्याजवळ बसवतो.) अरे, हें पाहा (शिपायाकडे बोट करून) ह्या स्वारीला हत्तीची इतकी दहशत बसली आहे कीं....

लिपिकार : नुसतें ह म्हटलें कीं तिरपीट उडते, असेंच ना ?

पहिला शिपाई : (जरा चिडखोरपणानें) तुला काय नुसतें बकायला ?

लिपिकार : अरे, असा चिडूं नको. माझें म्हणणें असें कीं तुम्ही लोक हत्तींना उगीच भितां. ह्या हत्तीविषयीं मीं कितीतरी गोष्टी ऐकल्या आहेत. अरे, हे हत्ती दिसायला अजस्त्र असतात आणि सोंड फिरवून अक्राळविक्राळ ओरडूं लागले कीं धाबें दणाणतें हें खरें ; पण तेच जर माणसाळले तर कसे गोगलगायीसारखे गरीब होतात, ह्याची तुम्हांला कल्पनाही नाहीं. अरे, ह्या हत्तींच्या इमानीपणाच्या एकेक गोष्टी ऐकाल तर तुम्हांला अचंबा वाटेल.

इतक्यांत समोरून दहा-बारा शिपाई कवाईत करीत येतात. आल्याबरोबर एका रांकेंत उभे राहातात. एकदम ओणवे होतात. मग डोळ्यांना कांहींतरी लावल्यासारखें करतात. चीं चीं करून ओरडतात आणि जमिनीवर गडबडा लोळूं लागतात. शेकोटीभोवतालचे शिपाई हें पाहून गडबडीनें उठतात आणि स्तंभित होऊन त्या शिपायांकडे पाहात राहातात.

रज्जुक : (पुढें होऊन) अरे अरे भय्यांनो, हें काय नाटक चालविलें आहे तुम्हीं ? काय करतां आहां तुम्ही हें ?

लोळत असलेले शिपाई पटकन् उभे राहातात. एकमेकांच्या हातांवर टाळ्या देऊन खो खो हसूं लागतात.

* *

लिपिकार : अरे, आहे काय हा प्रकार ?

रज्जुक : अरे, कळूं द्या तरी आम्हांला.

आलेल्या शिपायांपैकीं एक : रज्जुका, आज मोठी गंमत झाली. आम्ही सहज फिरायला जंगलांत गेलों होतों. वीस बावीसजण होतों आम्ही. समोर दूर एक उंच टेकडी होती. तिकडे पाहातों तों त्या टेकडीवर बरींचशीं माणसें दिसूं लागलीं. आम्ही जसे चालत होतों, तशींच तींही चालूं लागलीं. आम्हीं दौड करायला सुरुवात केली. त्यांनींही दौड सुरू केली. आम्ही थांबलों. तींही थांबलीं. आम्ही एका रांकेंत 'दक्ष' अवस्थेंत उभे राहिलों, तींही सर्व अगदीं त्याच अवस्थेंत उभीं राहिलीं. आम्हांला वाटलें हें शत्रूचें सैन्य आहे, म्हणून आम्हीं हत्यारें सावरलीं .... (सर्व शिपाई एकाग्रतेनें ऐकत असतात) इतक्यांत मागून दोन कातकरी आले आणि आमची ती परिस्थिति पाहून एकदम मोठमोठ्यानें हसूं लागले.

त्या वेळची आठवण झाल्यानें बाकीचे नवीन शिपाई हसूं लागतात आणि त्यामुळें पहिले शिपाईही हसूं लागतात.

रज्जुक : अरे, थांबा ना जरा. मध्येंच काय हसतां ! त्याचें बोलणें तरी पुरें होऊं द्या; आणि मग कांहीं हसण्यासारखें असलें तर आपण सारेजण खूप हसूं. थांबा पाहूं जरा.

सैनिक तोंडावर हात धरून हसूं आवरतात.

रज्जुक : (माहिती सांगणाऱ्या शिपायास) हं ! मग पुढें काय झालें ?

बोलत असलेला शिपाई : कातकरी एकदम हसायला लागलेले पाहून आम्ही बुचकळ्यांत पडलों. काय प्रकार आहे हेंच आम्हांला कळेना. आम्ही त्या कातकऱ्यांकडे पाहातच राहिलों. तेव्हां त्यांतला एकजण म्हणाला, 'अहो, हीं तुम्हांला समोर दिसतात तीं माणसें नाहींत.

* *

माकडें आहेत माकडें. (सर्वांच्या चेहेऱ्यांवर आश्चर्याचा भाव उत्पन्न होतो.) अहो हीं माकडें फार हुशार असतात. तीं तुमची अगदीं हुबेहूब नक्कल करतील. त्यांच्यावर चिडून कांहीं उपयोग नाहीं. तीं अत्यंत चपळ आणि ताकदवान असल्यानें माणसाच्या हातीं कधीं लागत नाहींत.'

रज्जुक : वा राव, काय थापा मारतां! तूं म्हणतोस तें खरं असेल तर लोक त्यांना पकडून पाळतात रे कसे?

शिपाई : मीं हा प्रश्न कातकऱ्याला विचारला तेव्हां तो म्हणाला, 'पारधी लोक त्या माकडांच्या नकली स्वभावाचाच फायदा घेऊन त्यांना पकडतात.

रज्जुक आणि **लिपिकार :** (दोघेही एकदम) म्हणजे कसें?

नव्या शिपायांपैकीं दुसरा शिपाई : अरे मघां आम्हीं नाटक करून दाखविलें ना, तसें.

रज्जुक : नाहीं समजलें बुवा. येथें पाहावें तें नवलच. सांग बुवा, समजावून सांग.

दुसरा शिपाई : ऐक, नीट ऐक. माकडें आजूबाजूला पुष्कळ आहेत अशी एखादी सोयीस्कर जागा पाहून पारधी तेथें जातात. भांड्यांत साधें पाणी घेतात आणि त्या पाण्यानें आपले डोळे धुतात. मग पाण्याचीं तीं भांडीं तशींच तिथें टाकून ते दूर आपल्या ठराविक जागीं निघून जातात.

रज्जुक : पाण्यानें डोळे धुण्याचा आणि माकडांचा काय संबंध?

लिपिकार : मध्यें नको रे बोलूंस. (शिपायास) हं, सांग रे पुढें.

दुसरा शिपाई : पारधी दूर निघून गेलेले दिसल्याबरोबर तीं माकडें झाडावरून खालीं उतरतात आणि पारध्यांनीं डोळे धुतले तसे हुबेहुब तीं

* *

आपले डोळे धुतात. पण डोळ्यांत पाणी गेल्याबरोबर चीं चीं करून कोकलायला लागतात.

रज्जुक : तें रे कां ?

दुसरा शिपाई : कारण पारध्यांनीं जाण्यापूर्वी भांड्यांतल्या पाण्यांत चुन्याची निवळी टाकलेली असते. तें निवळीचें पाणी माकडांनीं आपल्या डोळ्यांना लावतांच त्यांचे डोळे भाजतात आणि तीं तात्पुरतीं आंधळीं होतात. त्यांचें ओरडणें ऐकल्याबरोबर, दडून बसलेले पारधी धावत येऊन त्या माकडांच्या भोवतीं फास टाकून त्यांना पकडतात.

रज्जुक : खाशी युक्ति ! ऐकावें तें नवलच. पण गड्यांनो, तुमची मात्र गंमत केली त्या माकडांनीं. (हसतो.)

> इतरही हसतात. इतक्यांत शेकोटीच्या कडेस बसलेला एक शिपाई किंचाळी फोडून जमिनीवर पडतो आणि गडबडा लोळूं लागतो. सर्वजण ' काय झालें, काय झालें ' म्हणत त्याच्याकडे धावतात.

पहिला शिपाई : अरे तो पाहा, तो पाहा, तो साप ह्याला चावून पळाला.

दुसरा शिपाई : (त्याच्याकडे पाहात) हिरवें निळें केवढें लांबलचक जनावर आहे हें !

तिसरा शिपाई : (लोळणाऱ्या शिपायाकडे पाहात) अरे ह्याच्या तोंडांतून फेस यायला लागला. ह्याला कांहीं उपाय नाहीं का ?

पहिला शिपाई : हे साप भयंकर विषारी असतात. वेळेवर इलाज झाला तर ठीक. नाहींतर आपला हा गडी मेला म्हणून समजा. काय करावें आतां ?

> सर्वजण चिंतातुर होतात. इतक्यांत एका बाजूनें एक जटिल येतो. साप चावलेल्या माणसाला पाहून थांबतो व त्याच्याकडे निरखून पाहूं लागतो.

* *

दुसरा शिपाई : (जटिलास उद्देशून अगदीं अजीजीनें) साधुमहाराज, ह्या विषावर तुम्हांला एखादें औषध ठाऊक आहे का ? बघा कांहीं करतां आलें तर.

जटिल : त्याचाच मी विचार करीत आहें. किती वेळ झाला ह्याला साप चावून ?

पहिला शिपाई : अहो हा आत्तांच, तुमच्या समोरूनच पळाला नव्हे का ? (साप गेला तिकडे भीत भीत हात दाखवतो.)

जटिल : हो. पण तो साप कसा होता ? कोतत्या रंगाचा होता ? त्याची लांबी किती होती ? अंगावर आयाळ होती का ? त्यानें वळून दंश केला कीं समोरूनच केला ?

दुसरा शिपाई : माणूस मरायला टेकला आहे. औषध लवकर सांगा ना ! नसत्या चौकशा कशाला ?

जटिल : शिपाईदादा, असे उगीच रागावूं नका. अहो निरनिराळ्या जातींच्या सापांना निरनिराळीं औषधें द्यावीं लागतात. सापाची जात समजून औषध दिलें कीं तें हटकून लागू पडतें. पण थांबा, तो पाहा त्या खडका-मागून पळत जात आहे. तोच साप का ह्याला चावला आहे ?

पहिला शिपाई : (तिकडे पाहात) होय, होय, तोच हो तोच !

जटिल एकदम निघून जातो. शिपाई एकमेकांकडे पाहूं लागतात. दंश झालेला शिपाई विव्हळतच असतो. एवढ्यांत जटिल, हातांत झाडाचा पाला घेऊन येतो. त्याचा रस काढून त्या शिपायाच्या तोंडांत घालतो. शिपाई हळूहळू सावध होतो.

लिपिकार : काय हा चमत्कार ! ह्या लोकांजवळ कांहीं तरी जादू आहे खास ! आतां हा माणूस येथें न येता तर आमचा हा गडी खासच मेला असता.

ग्रं. दि.

* *

दुसरा शिपाई : अहो जटिलमहाराज, (नम्रतेनें) क्षमा करा आम्हांला. आम्ही उगीच तुमच्यावर रागावलों. आज तुमच्यामुळेंच आमचा हा सोबती वांचला. तुम्हीं त्याला जीवदान दिलें आहे. तुमचे उपकार आम्ही कसे फेडूं ?

जटिल : शिपाईदादा, ह्यांत माझे कसले आले आहेत उपकार ! माणसाच्या उपयोगीं पडणें हा माझा धर्मच आहे. देव ह्याला शतायु करो.

चौथा शिपाई : (सोन्याचें कडें काढून पुढें करीत) हें घ्या, ह्याला वांचविल्याबद्दल हें घ्या तुम्हांला बक्षीस.

जटिल : (तें न घेतां) बक्षीस ? मला कां म्हणून बक्षीस ? मीं तर काय केलें, माझें कामच केलें. पण काय हो, तुम्हांला माहीत नाहीं वाटतें ? औषध देऊन कोणाला बरें केल्याबद्दल जर मीं बक्षीस घेतलें तर माझी ही विद्या मला सोडून जाईल आणि मग त्यापुढें माझ्या हाताला गुणच येणार नाहीं. अहो, रोगांवर उपाय करण्यासाठीं योग्य तो झाडपाला मला दिसायचासुद्धा नाहीं. मला तें तुमचें सोनें नको: त्यानें मला कावीळ होईल.

असे म्हणून मागें न पाहातां झटकन् निघून जातो. सर्वजण त्याच्याकडे आश्चर्यानें पाहात राहातात. अंकाचा पडदा पडतो.

दुसरा अंक समाप्त

अंक तिसरा

प्रवेश पहिला

चिनाब नदीच्या पश्चिम किनाऱ्यावरील अलेक्झांडरची छावणी. तंबूबाहेर विचार करीत अलेक्झांडर येरझारा घालीत आहे. बाजूस युमेनेस व ओनेसिक्रिटोस उभे आहेत.

अलेक्झांडर : (मध्येंच थांबून) युमेनेस, पौरसाचीच एक मोठी धोंड आपल्या मार्गांत होती. ती आपण दूर केली आहे. आतां हीं आसपासचीं बारीकसारीक राज्यें राहिलीं आहेत तीं चुटकीसरशीं आपल्या ताब्यांत येतील.

युमेनेस : शंकाच नको महाराज. हीं राज्यें एकामागून एक आपल्याला शरण येत आहेत. मुकाबला करणाऱ्याची आपण काय अवस्था करतां हें समजल्यापासून सहसा कोणी राजा सामना करण्यास धजतच नाहीं.

टोलेमी आनंदी मुद्रेनें प्रवेश करतो.

टोलेमी : (प्रणाम करून) ह्या आजूबाजूच्या प्रदेशांतील सदतीस शहरें आपल्या सैन्यानें आतांपर्यंत काबीज केलीं आहेत. खेड्यांची तर गणतिच नाहीं.

* *

अलेक्झांडर : माझी खात्रीच होती. हा सर्व प्रांत पौरसाच्या राज्यांत सामील करा. मध्यें मध्यें आपलें सैन्य ठेवा म्हणजे काळजीचें कारण राहाणार नाहीं. आतां ही चिनाब नदी ओलांडून जाऊन आपण पलीकडले देश जिंकूं आणि लौकरच पूर्वेस महासमुद्राला जाऊन भिडूं.

चारेस प्रवेश करतो.

चारेस : (प्रणाम करून) महाराज, तक्षशिलेंत असतांना तेथल्या साधूंना पाहाण्याची आपली इच्छा होती. आज अंभीनें एका साधूचें मन वळवून आपल्या भेटीसाठीं त्याला येथें धाडून दिलें आहे. साधूला आपल्यासमोर आणण्याची आज्ञा आहे का ?

अलेक्झांडर : हो, हो, मीं ह्या साधुलोकांबद्दल बऱ्याच गोष्टी ऐकल्या आहेत.

ओनेसिक्रिटोस : महाराज, अंगाला चटके बसतील अशा कडक उन्हांत सूर्याकडे तोंड करून, एका पायावर सबंध दिवस उघडेबंब ध्यान करीत उभे असलेले कांहीं साधु मीं तक्षशिलेंत असतांना पाहिले होते.

युमेनेस : हे साधु युक्तिवादांत अत्यंत चतुर असून त्यांचें तत्त्वज्ञान फार अगम्य आहे असें मीं ऐकिलें आहे.

ओनेसिक्रिटोस : आणि कांहींजण भविष्यकथनाच्या विद्येंत पारंगत असतात म्हणे.

अलेक्झांडर : अस्सें. तर मग त्या साधूला इकडे आणाच.

चारेस प्रणाम करून जातो आणि साधूला घेऊन येतो.
चारेस बादशाहाला पुन्हा प्रणाम करतो. साधु हात वर
करून सर्वांना ‘ कल्याण, कल्याण ’ असा आशीर्वाद देतो.

अलेक्झांडर : चारेस, ह्याचें नांव काय ?

साधु पुन्हा सर्वांस ‘ कल्याण, कल्याण ’ असा आशीर्वाद देतो.

अलेक्झांडर : (कल्याण शब्दावरून त्याचें नांव कालानोस असावें असें समजून) हं, ह्याचें नांव कालानोस आहे तर !

साधु पुन्हा ‘ कल्याण, कल्याण ’ असें म्हणतो.

ओनेसिक्रिटोस : काय रे कालानोस, तक्षशिलेंत असतांना तुम्हां साधूंना बादशाहाच्या दरबारीं आणावें म्हणून मीं जंग जंग पछाडले. पण कोणीही येण्यास तयार झाला नाहीं. आतां तूं रे कसा आलास ?

साधु : केवळ अंभी राजानें मला अतिशय गळ घातली म्हणून आमच्या समस्त साधुबांधवांना नाखूष करून मी येथें आलों आहें.

अलेक्झांडर : कालानोस, मीं ऐकलें आहे कीं तुम्ही साधु लोक भविष्य सांगूं शकतां.

साधु : होय राजा. ग्रह, नक्षत्र, तारे आदींचा विचार करून गणिताच्या साह्यानें आम्ही भावी कालांतील घटनांबद्दल भविष्य वर्तवूं शकतों हें खरें आहे. ती विद्या कष्टसाध्य असून ती प्राप्त करून घेण्यासाठीं अत्यंत प्रखर तपश्चर्या करावी लागते.

अलेक्झांडर : ठीक आहे. तर मग मीं महासमुद्रापर्यंतचे पूर्वेंचे सारे देश काबीज करून, माझ्या मायदेशीं जाण्यास कधीं परत फिरेन तें सांग.

साधु गप्पच असतो.

ओनेसिक्रिटोस : (साधूकडे पाहात) गप्प कां बसला आहेस ? गणित करण्यासाठीं कांहीं साधनसामुग्री पाहिजे आहे काय ?

तरीही साधु गप्पच असतो.

अलेक्झांडर : काय रे कालानोस, तूं बोलत कां बरें नाहींस ? माझें भविष्य सांगण्याबद्दल मीं तुला शंभर मण सोनें देईन. अलेक्झांडर बादशाहाचें दातृत्व महशूर आहे.

* *

साधु : राजा, मला तुझ्या बक्षिसाची अपेक्षा नाहीं. मला भविष्य-विद्या अवगत आहे हें खरें आहे. पण राजा, ह्या विद्येबाबत एक दंडक आम्हांला फार कडक रीतीनें पाळावा लागतो.

आलेक्झांडर : कोणता तो दंडक?

साधु : राजा, ज्यांत लोकहिताचे प्रश्न निगडित आहेत, अशाच बाबींचें तेवढें भविष्य सांगावयाचें असा आम्हांवर निर्बंध आहे. कोणत्या व्यक्तीच्या खासगी फायद्यासाठीं भविष्य सांगण्याची आम्हांला परवानगी नाहीं. (सर्वजण ह्या उत्तरानें चकीत होतात. बादशहाच्या चेहऱ्यावर असंतुष्टता दिसते.) राजा, तूं मायदेशीं परत जाण्यास केव्हां निघशील हें सांगण्यानें कोणतें सामुदायिक हित मी साधणार आहें? राजा, पाऊस पाणी केव्हां पडेल? पिकें कशीं निघतील? रोगराईचें भय आहे काय? अशा तऱ्हेचे प्रश्न विचार हवे तर. त्यांचीं उत्तरें मी अचूक देऊं शकेन. पण कोणाही व्यक्तीच्या खाजगी व मतलबी कामासाठीं माझी भविष्यविद्या मला कामीं आणतां येणार नाहीं.

सर्वजण स्तंभित होतात. अलेक्झांडर मात्र क्रुद्ध होतो.

ओनेसिक्रिटोस : कालानोस, अखेर तूं आपल्या जातीवर गेलासच. तुम्ही साधुलोक किती हट्टी आणि एककल्ली असतां हें मी आधींच बादशहांना सांगत होतों. आमच्या बादशहांची तुला भीति वाटत नाहीं का?

साधु : माझा ह्या बाबतींत नाइलाज आहे.

अलेक्झांडर : (रागानें) मग तुम्ही साधुलोक चतुर असतां, बुद्धिमान् असतां, असे जे सगळीकडे तुमचे गोडवे गाईले जातात, त्याचें प्रत्यंतर दाखीव .... नाहींतर ....

* *

साधु : बेटा, क्रोधायमान होऊ नकोस. समस्त साधुवृंदास नाखूष करून जो मी येथें आलों तो तुला क्रोध आणावा म्हणून नव्हे. राजा, तुझा आग्रहच असेल तर तुला एक मौज दाखवितों. एक कच्चें चामडें आणव.

राजा चामडें आणविण्यास चारेसला मानेनें सुचवितो. त्याप्रमाणें चारेस जातो व नोकरांकरवीं चामडें पाठवितो. नोकर चामडें साधूपुढें ठेवून, बादशाहाला प्रणाम करून निघून जातात. नंतर तें चामडें साधु बादशाहापुढें पसरतो. अर्थातच तें चामडें बाजूंनीं गोळा होतें. त्यानंतर साधु त्या चामड्याच्या एका टोंकाला त्यावर पाय देऊन उभा राहातो. तेव्हां तेवढा भाग जमिनीवर नीट सपाट राहातो, पण दुसरा भाग वर उचलला जातो. तेव्हां साधु इकडून निघून त्या भागावर उभा राहातो. तेव्हांही पूर्वीप्रमाणेंच अवस्था होते. अशा तऱ्हेनें चारी कोपऱ्यांवर उभें राहून दाखवितो. तेव्हां सर्वजण तिकडे विस्मयानें पाहात असतात. अलेक्झांडरचा क्रोधही कमी होतो. तोही साधूच्या त्या कृतीकडे विचारपूर्वक पाहात असतो. इतक्यांत साधु त्या चामड्याच्या मध्यभागीं पाय ठेवून उभा राहातो. त्याबरोबर तें चामडें जमिनीवर सर्व बाजूंनीं सपाट चिकटून बसतें. तेव्हां तेथेंच उभा राहून

साधु : राजा, पाहिलीस ना ह्या चामड्याची गत ? तूं भराभर देशामागून देश जिंकीत पुढें पुढें दूरवर चालला आहेस. पण त्या जिंकलेल्या देशांचीही अशीच गत व्हावयाची आहे, हें लक्षांत असूं दे.

अलेक्झांडर : (क्रुद्ध होऊन) बस कर गोसावड्या. हा तुझा खेळ बंद कर. बोल, तुला ही विद्या कोणीं शिकविली ?

साधु : राजा, येथें जवळच मंदनिस नांवाचे एक महान् साधु आहेत. त्यांना मी आपले गुरु मानतों.

अलेक्झांडर : ठीक आहे. ओनेसिक्रिटोस, जा आणि ह्याच्या त्या गुरूलाच माझ्यापुढें उभा कर. जा.

ओनेसिक्रिटोस प्रणाम करून मुकाट्यानें निघून जातो. त्याच्या मागोमाग साधुही निर्विकारपणें शांततेनें निघून जातो. दुसऱ्या बाजूनें चारेस प्रवेश करतो.

* *

चारेस : (प्रणाम करून) चिनाब नदीच्या पलीकडील मुलुखाचा राजा, पौरसाचा पुतण्या आपल्याला शरण येईल असें वाटत होतें; पण आत्तांच खबर आली आहे कीं तो निवडक फौज घेऊन शेजारच्या राज्यांत पळून गेला आहे.

अलेक्झांडर : हरकत नाहीं. त्याचा पाठलाग करण्यासाठीं मीच पुढें जातों. हेफास्टिओन, तूं मागें राहून त्याचें सर्व राज्य आणि बाजूचा प्रदेश खालसा कर. शरण येणारांना अभय दे. पण सामना करतील त्यांनी मुळींच गय करूं नको. काबीज केलेल्या सर्व मुलुखांत ठिकठिकाणी आपलें सैन्य ठेवीत माझ्या मागोमाग ये. युमेनेस, सैन्याला तयार होण्याचा इषारा दे. पूर्वेचा राहिलेला प्रदेश जिंकून थेट महासमुद्रापर्यंत माझें साम्राज्य स्थापन करीपर्यंत आतां मी स्वस्थ बसणार नाहीं. (जोरानें निघून जातो.)

इतर सर्वजण मागोमाग जाऊं लागतात. पडदा पडतो.

प्रवेश दुसरा

मंदनिस ऋषींचा आश्रम. मंदनिस व्यासपीठावर बसले असून छात्रांस निरोप देत आहेत. समोर छात्र बसून शांततेनें उपदेश ऐकत आहेत. क्षात्रविद्येच्या छात्रांजवळ अर्थात्च धनुष्यबाण वगैरे असतात.

छात्र : ॐ सहनाववतु । सहनौ भुनक्तु । सहवीर्यं करवावहै ।
तेजस्विनावधीतमस्तु । ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

मंदनिस : छात्रगण हो, तुमचें येथील अध्ययन आतां संपलें आहे. लवकरच तुम्ही स्वगृहीं परत जाल आणि गृहस्थाश्रमांत पदार्पण करून आपल्या जीवनाच्या पुढल्या मार्गाला लागाल. परमेश्वरी कृपेनें तुमची जीवननौका आपल्या सर्व आप्तेष्टांसह सुखानें आणि निर्वेधपणानें ह्या संसारसागराच्या पैलतीराला लागो. छात्र हो, वेदपुरुषाचा तुम्हांला

* *

' सर्वेऽत्र सुखिनः सन्तु ' असा आशीर्वाद आहे. आयुष्यांत सुखी व्हावयाचें असेल तर त्यासाठीं सुखोपभोगांचीं साधनें मिळविण्याच्या लालसेला आपल्या काबूंत ठेवणें अत्यंत आवश्यक आहे. आपली तृष्णा जर मर्यादेबाहेर वाढत गेली तर ती शमविण्यासाठीं आपण दुसऱ्याच्या सुखसाधनांतील हिस्सा छिनून घेण्याच्या प्रयत्नाला लागूं. अर्थातच त्यामुळें सभोंवार अशांति निर्माण होईल आणि समाजांत अशांतीचा प्रादुर्भाव झाला म्हणजे मग कोणालाच सुख मिळणार नाहीं. म्हणून छात्र हो, तृष्णेच्या आहारीं जाऊं नका. ह्या तृष्णेमुळें विश्वांत केवढाले अनर्थ ओढवले आहेत तें इतिहासांतील असंख्य उदाहरणांवरून ....

इतक्यांत दोन तीन छात्र घाईघाईनें प्रवेश करतात.
त्यांच्या चर्येवरून ते क्षुब्ध झालेले दिसतात.

छात्र : (गडबडीनें) गुरुजी, गुरुजी, आपल्या आश्रमांत कांहीं सशस्त्र यवन घोडेस्वार घुसले आहेत. मंदनिस गुरूंचा आश्रम हाच ना, असें ते दरडावून विचारीत आहेत. आम्ही घाईघाईनें तुम्हांला हें सांगण्यासाठीं पुढें धावत आलों. (मागें पाहून) ते पाहा, त्यांतले कांहीं यवन आमच्या मागोमाग इकडेच येत आहेत. आडदांडपणावरून त्यांचें लक्षण कांहीं ठीक दिसत नाहीं.

मंदनिस : (अगदीं निर्विकारपणें) शांत व्हा. भिण्याचें कांहीं कारण नाहीं. परमेश्वर आपला पाठिराखा आहे. सत्याचें कवच आपल्या शरीरावर आहे.

ओनेसिक्रिटोस व इतर ३-४ यवन शिपाई प्रवेश
करतात. त्यांचें वर्तन आडदांडपणाचें असतें.

ओनेसिक्रिटोस : (पुढें होऊन, तोऱ्यांत) मंदनिस गुरूंचा आश्रम हाच ना ? कोठें आहे मंदनिस ?

* *

मंदनिस व्यासपीठावर शांतपणें बसलेले असतात.
त्यांच्या मनाची मुळींच चलबिचल झालेली दिसत नाहीं.

एक छात्र : (पुढें होऊन, धीटपणानें) होय यवना, मंदनिस-गुरुजींचाच हा आश्रम आहे. समोर व्यासपीठावर विराजमान झालेले गुरुजी, तेच आमचे कुलगुरु मंदनिसमहाराज.

ओनेसिक्रिटोस : ठीक. (मंदनिसांच्या निर्भय आणि शांत आकृतीकडे पाहून जरा वरमतो. पण लगेच धीटपणानें मंदनिसांना उद्देशून बोलूं लागतो.) मॅसेडोनियापासून थेट ह्या तुमच्या झेलम नदीपर्यंतचा सारा प्रांत पादाक्रान्त करणाऱ्या पृथ्वीपति अलेक्झांडर बादशाहांकडून मी आलों आहें. माझें नांव ओनेसिक्रिटोस. झूसपुत्र अलेक्झांडर बादशाहांनीं तुम्हा साधूंबद्दल बऱ्याचशा गोष्टी ऐकल्या आहेत. तुम्हीं त्यांना भेटावें अशी त्यांची इच्छा आहे.

मंदनिस : वा: ! फार चांगलें. पण काय हो, तुमचा अलेक्झांडर बादशाह झूसपुत्र म्हणजे देवाचा पुत्र आहे असें आतां तुम्ही म्हणालां, म्हणून तुम्हांला विचारतों, तुमच्या अलेक्झांडर बादशाहाला मरण येणार आहे कीं नाहीं ?

ओनेसिक्रिटोस : (विस्मयानें) हें काय विचारतां ! मरण कोणाला चुकलें आहे का ?

मंदनिस : हें खरें ना ? म्हणजे तुमचा अलेक्झांडर बादशाहाही एक दिवस मरणाच्या आधीन होणार आहे तर ! मग तो देवाचा पुत्र कसा ? देव तर अमर आहे. (ओनेसिक्रिटोसच्या चेहेऱ्यावर नाखुषी दिसते.) बरें, तें राहूं द्या. तुम्ही म्हणालां कीं तुमचा बादशाहा पृथ्वीपति आहे. पण का हो, ह्या समोरच्या नदीपलीकडे काय आहे हें तुमच्या बादशाहानें नुसतें पाहिलें तरी आहे का ? त्याला त्याची कांहीं कल्पना तरी आहे का ? (ओनेसिक्रिटोस नकारार्थी मान हालवितो.) नाहीं ना ? मग तो पृथ्वीपति कसा ?

* *

ओनेसिक्रिटोस : (रागावून अधीरतेनें) मंदनिस, तुम्ही विनाकारण कालाचा अपव्यय करीत आहां. मी तुम्हांला बादशाहाकडे घेऊन जाण्यासाठीं आलों आहें. बादशाहाचें औदार्य अमर्याद आहे हें तुम्हांला माहीत आहे ना? बादशाह खूष झाला तर तुम्हांला तो सोन्यानें मढवून काढील.

मंदनिस : सेनापति, मी तुमच्या बादशाहाचें सोनें घेऊन काय करूं? (व्यासपीठावरून उतरून) ही पाहा माझी पर्णकुटी. ही लतापल्लवांच्या साह्यानें बनविलेली आहे. वाऱ्यापावसापासून ती माझें रक्षण करिते. ह्या पाहा भोवतालच्या वृक्षवनस्पति, त्यांचीं कंदमुळें आणि फळें माझी क्षुधा शांत करतात आणि तो पर्णकुटीच्या मागून अक्षय वाहात असलेला पाण्याचा प्रवाह पाहा. हिमवंताच्या शिखरांतून उगम पावलेलें हें स्फटिका-सारखें शुभ्र पाणी माझी तहान भागवितें. सेनापति, सांगा, निवाऱ्याची जागा आणि तहान-भूक भागविणारी ही निसर्गाची देणगी जवळ असतांना मला अधिक कशाची गरज असणार? मजजवळ सोनें-रुपें नसल्यानें मला चोराचें भय नाहीं आणि म्हणून मी निर्धास्तपणें अध्ययन-अध्यापन करून इतर वेळीं परमेश्वरचिंतनांत निमग्न राहूं शकतों. सेनापति, मी तुमच्या बादशाहाजवळ कशासाठीं येऊं?

ओनेसिक्रिटोस : (रागानें) गुरुजी, तुम्ही मजबरोबर न आल्यास बादशाहांचा अत्यंत क्रोध होईल.

मंदनिस : (शांतपणें) ओनेसिक्रिटोस, मला तुमच्या बादशाहाचा क्रोध आणि लोभ हीं दोन्ही समान आहेत.

ओनेसिक्रिटोस : मंदनिस, बादशाहाच्या कानीं हे तुमचे शब्द पडले तर तो तुमचा शिरच्छेदच करवील.

* *

सर्व छात्रांत खळबळ उडते. कांहीं जण आपल्या तलवारींना व बाणांना हात घालतात. दुसरे त्यांचे गुरुबंधु त्यांना गोंजारून शांत करण्याचा प्रयत्न करतात.

मंदनिस : (शांतपणें) माझा शिरच्छेद केल्यानें माझें कोणतें नुकसान होणार आहे ? मृत्तिकेसमान असलेलें हें शरीर मृत्तिकेंत मिसळलें जाईल. पण अमर असलेला माझा आत्मा देहाच्या बंधनांतून सुटून परमात्मस्वरूपांत विलीन होईल. आम्ही सिंधुदेशचे आश्रमनिवासी साधु मरणाला भीत नसतों. जा, ओनेसिक्रिटोस, जा आणि तुझ्या बादशाहाला माझा निरोप सांग. आपली स्वत: मायभूमि सोडून शेकडों मैल दूरवर तुझा बादशाहा आपल्या तृष्णेपायीं वणवण हिंडत आहे. हजारों लोक त्याच्यापायीं धारातीर्थीं पडले आहेत. हजारों, लाखों लोकांची त्यानें कत्तल केली आहे. शेकडों गांवें आणि असंख्य खेडीं त्यानें उध्वस्त केलीं आहेत. स्वत:चें स्थान अढळ करण्यासाठीं प्रत्यक्ष आपल्या मित्रांवर आणि एकनिष्ठ सैनिकांवर कटाचे खोटे आरोप लादून त्यांना तुझ्या बादशाहानें हालहाल करून ठार मारलें आहे. (ओनेसिक्रिटोस चमकून गंभीर होतो) असंख्य देश पादाक्रान्त करूनही अजून तुझ्या बादशाहाची तृष्णा शमलेली दिसत नाहीं. तर ओनेसिक्रिटोस, जा आणि तुझ्या बादशाहाला माझ्या आश्रमांत धाडून दे. त्याची तृष्णा शमवून त्याच्या अतृप्त जीवाला शांतिसुखाचा अनुभव करून देण्याचें सामर्थ्य ह्या आश्रमांत आहे. ओनेसिक्रिटोस, ज्याची स्वत:ची हाव भागलेली नाहीं तो तुझा बादशाहा दुसऱ्याला काय देऊं शकणार ?

ओनेसिक्रिटोस व इतर सर्व यवन शिपाई माना खालीं घालून मुकाट्यानें जातात. सर्व छात्र संतोषानें आणि अभिमानानें गुरुजींकडे पाहून वंदन करतात. मंदनिस दोन्ही हात वर करतात. पडद्यांत 'ॐ शांतिः शांतिः शांतिः' असा घोष होतो.

पडदा पडतो.

* *

प्रवेश तिसरा

बीस नदीचा पश्चिमकांठ. अलेक्झांडर व सौभूति
इतर सरदारांसह नदीकांठचा प्रदेश पाहात आहेत.

सौभूति : महाराज, माझ्या आमंत्रणाला मान देऊन आपण आपल्या सैन्यासह माझ्या राजधानींत तीन दिवस राहून माझा पाहुणचार स्वीकारलांत त्याबद्दल मला अत्यंत धन्यता वाटत आहे. महाराज, रावी आणि बीस नद्यांमधल्या माझ्या ह्या प्रांताचे सार्वभौम राजे आतां आपणच आहांत.

अलेक्झांडर : सौभूति, तुझ्या राज्यांतील शिस्त आणि कायदेकानू पाहून मी खूष झालों आहें.

चारेस प्रवेश करतो.

चारेस : (प्रणाम करून) महाराज, सेनापति हेफास्टिओन येत आहेत.

अलेक्झांडर : ठीक. (हेफास्टिओन प्रवेश करतो.)

हेफास्टिओन : (प्रणाम करून) महाराजांचा जयजयकार असो. महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणें चिनाब आणि रावी ह्या नद्यांमधला सर्व प्रांत काबीज करून तूर्त तो पौरसाच्या स्वाधीन केला आहे. ठिकठिकाणीं आपलें सैन्यही ठेविलें आहे.

अलेक्झांडर : ठीक केलेंस. आतां ह्या भागल राजाचा तेवढा प्रश्न राहिला. सौभूति, अजून भागलाकडून कांहीं खबर कशी आली नाहीं ? का त्याची खबर घ्यायला आम्हाला गेलें पाहिजे ?

टोलेमी : महाराज, येथें सौभूतीच्या राज्यांत आल्याबरोबर 'शरण ये नाहींतर युद्धाला तयार हो' असा निरोप भागलाला धाडला आहे. गुप्त हेरांकडून बातमी आहे कीं भागल आपल्याला शरण येणार आहे.

* *

सौभूति : होय महाराज, आपणाशीं सामना करण्याचें धाडस भागल करील असें मला वाटत नाहीं. अलेक्झांडर बादशाहांशीं सामना करण्याचें प्रायश्चित्त काय मिळतें हें कट लोकांच्या दुर्दशेवरून सर्वांना चांगलेंच कळून चुकलें आहे. आपण कठांची कशी कत्तल केली व अखेर त्यांचें साकल शहर कसें बेचिराग केलेंत हें भागलाला ठाऊक आहे.

चारेस येतो.

चारेस : (प्रणाम करून) महाराज, राजा भागल आपल्याला शरण आला आहे.

अलेक्झांडर : ठीक आहे. येऊं दे त्याला.

चारेस प्रणाम करून जातो. भागल प्रवेश करतो.

भागल : (प्रणाम करून) दिग्विजय करण्याचें कंकण बांधलेल्या अलेक्झांडर बादशाहांचा जयजयकार असो. महाराज, आपलें स्वामित्व मला मान्य आहे.

अलेक्झांडर : ठीक. तुला यायला फार वेळ लागला तेव्हां आम्हांला वाटलें कीं तूं सैन्याची जमवाजमव करण्यात गुंतला असावास.

भागल : नाहीं महाराज, माझे सारे लोक नेहमींप्रमाणें शेतांत काम करण्यासाठीं मी धाडून दिले आहेत आपल्या सेवेला मी येथें हजर आहें.

अलेक्झांडर : भागल, तुझें राज्य ह्या बीस नदीला लागूनच आहे. तेव्हां तुला पलीकडच्या मुलुखाची चांगली माहिती असली पाहिजे. काय रे, नदी फार रुंद आणि खाल आहे का ?

भागल : महाराज, पात्राची रुंदी अंदाजें पाऊण मैल व खोली छत्तीस फूट आहे. पण पाण्याला ओढ फार आहे आणि नदींत खडक असल्यानें ती ओलांडून जाणें फार धोक्याचें आहे.

अलेक्झांडर : (बेफिकिरी दाखवीत) पुढचा मुलुख कसा आहे ?

* *

भागल : महाराज, नदीला लागूनच मोठमोठीं वाळवंटें आहेत. तीं ओलांडून जायला दहा-बारा दिवस लागतील. त्यापलीकडे मग गंगा. आमच्या देशांतील सर्वांत मोठी नदी. गंगेचें पात्र तीन साडेतीन मैल रुंद आहे. खोलीचा तर ठावच नाहीं. गंगेच्या पलीकडे प्राच्य व गांग अशीं दोन फार मोठीं राज्यें आहेत. जमीन अत्यंत सुपीक असून शेती फार उत्कृष्ट होते. लोक शूर आणि लढवय्ये आहेत. सध्या तेथें नंदराजा राज्य करीत आहे. नंदाजवळ वीस हजार घोडेस्वार, दोन लाख पायदळ व दोन हजार रथ इतकें खडें सैन्य आहे.

अलेक्झांडर : (मध्येंच) तूं अतिशयोक्ति करीत आहेस.

सौभूति : नाहीं महाराज, भागल सांगत आहे तें बरोबर आहे.

भागल : महाराज, त्याशिवाय नंदाजवळ तीन हजार लढवय्ये हत्ती आहेत.

अलेक्झांडर : (मत्सरानें) अस्सें काय? मग तर त्याची हजेरी मला घेतलीच पाहिजे.

भागल : (हळू आवाजांत) महाराज, नंदाचा जन्म हीन कुळांतला आहे; आणि जुलमी व क्रूर म्हणून त्याची प्रसिद्धि आहे.

अलेक्झांडर : बस, बस. गंगानदीपलीकडे जाऊन मी नंदावर स्वारी करणार! टोलेमी, बीस नदी ओलांडून ताबडतोब पुढें कूच करण्याच्या व्यवस्थेला लागा. सौभूति, भागल, आमच्या सैन्यासाठीं दाणागोटा आणि इतर सामुग्री मिळवून द्या. जा, वेळ गमावूं नका.

सौभूति व भागल सरदारांसह जातात. इतक्यांत इतका वेळपर्यंत त्या सरदारांच्या मागें राहून अलेक्झांडरकडे टक लावून पाहाणारा चंद्रगुप्त अलेक्झांडरच्या नजरेस पडतो.

अलेक्झांडर : काय रे, कोण तूं? येथें उभा कां?

* *

चंद्रगुप्त : (निर्भयपणें रुबाबांत) बुद्धाला जन्म देणाऱ्या शाक्य जातींतील मौर्य घराण्यांत माझा जन्म झाला आहे. माझें नांव चंद्रगुप्त. तक्षशिलेंत आर्य चाणक्यांच्या छत्राखालीं मी क्षात्रविद्या व इतर शास्त्रांचें अध्ययन करीत आहें.

अलेक्झांडर : बरें बरें. पण येथें उभा कां ?

चंद्रगुप्त : परमेश्वरानें अचाट शौर्य व लोकोत्तर बुद्धिमत्ता दिली असतां त्यांचा उपयोग केवळ स्वतःची राज्यतृष्णा शमविण्यासाठीं करीत असलेला बादशाहा कसा दिसतो तें पाहाण्यासाठीं.

अलेक्झांडर : (संतापानें बेभान होऊन) खबरदार एक अक्षर पुढें काढशील तर! (शिपायांस) ह्याची जीभच छाटून टाका. प्रत्यक्ष अलेक्झांडर बादशाहाच्या समोर त्याचा अपमान करणाऱ्या ह्या पोरट्याला ठेचून मारा. पकडा त्याला.

चंद्रगुप्त : (तलवार उपसून) मला पकडणें इतकें सोपें नाहीं. क्षत्रियाचा छावा आहें मी. या हिम्मत असेल तर. (तलवार फिरवीत विजेसारखा निघून जातो.)

अलेक्झांडर : काय रे, पाहातां काय तुम्ही ? पकडा त्या बेरडाला. (दोन तीन शिपाई त्याच्यामागें धावतात.)

चारेस प्रवेश करतो.

चारेस : (प्रणाम करून) महाराज, शशिगुप्ताकडून समाचार आला आहे कीं अश्वकांनीं आपल्या सत्रापाचा खून केला असून त्यांनीं महाराजां-विरुद्ध बंड उभारलें आहे. ताबडतोब कुमक धाडून द्यावी अशी शशिगुप्ताची निकडीची विनंती आहे.

अलेक्झांडर : (बेचैन होऊन) हं, माझी पाठ फिरल्याबरोबर त्या जंगली अश्वकांना बंड करायला फावलें तर! युमेनेस, तक्षशिलेहून सैन्य

* *

घेऊन फिलिपला ताबडतोब शशिगुप्ताच्या मदतीला धाडून दे. शशिगुप्तामागें गुप्त हेर ठेवण्याची फिलिपला ताकीद दे. कदाचित् ही शशिगुप्ताचीसुद्धा बेइमानी असेल. जा, ताबडतोब मदत धाडून दे.

चारेस व युमेनेस प्रणाम करून निघून जातात.

टोलेमी, क्राटेरोस, नंदावर स्वारी करण्याचा माझा निश्चय कायम आहे. देवतांना बलिदान द्या. सैन्याला वर्दी द्या. आपण उद्यांच बीस नदी ओलांडायला प्रारंभ करूं. जा, आपल्या कामाला लागा. (ते स्तब्ध उभे आहेत असें पाहून) अरे, तुम्हांला ऐकूं आलें नाहीं का? तुम्ही असे स्तब्ध उभे कां? (ते माना खालीं घालतात.) अरे, आज तुमच्या माना खालीं कां?

टोलेमी : महाराज, आपण रागावूं नये! पण साकलाच्या लढाईपासून सैन्यांत चलबिचल सुरू आहे. ह्यापुढें चाल करून जाण्यास सैनिक आतां नाकबूल आहेत.

अलेक्झांडर : (चरफडून) मग आधींच कां नाहीं बोललांत? कांहीं नाहीं. मी पुढें चाल करून जाणारच. माझा निश्चय ढळणार नाहीं. प्राच्यदेश काबीज करीपर्यंत माझ्या जिवाला शांति लाभणार नाहीं. जा, सैनिकांना माझ्यासमोर बोलवा. मीच त्यांना नीट समज देतों. जा, लौकर जा. (सरदार प्रणाम करून जाऊं लागतात.)

पडदा पडतो.

प्रवेश चौथा

बीस नदीच्या पश्चिम किनाऱ्यावरील अलेक्झांडरची छावणी. सैन्य जमा झालें आहे. कांहीं सैनिक आपसांत कुजबुजत आहेत. कांहीं जोरजोरानें एकमेकांशीं बोलत आहेत. कांहीं गंभीरपणें मुग्ध बसले आहेत. एकंदरींत वातावरण क्षुब्ध आहे.

* *

एक शिपाई : (दुसऱ्या शिपायास) नाहीं, नाहीं. आम्ही आतां पुढें जाणार नाहीं.

तिसरा शिपाई : (चौथ्या शिपायास) ह्या बघा माझ्या जखमा. अजून जुने घाव भरलेले नाहींत तों नवे घ्यायची माझी तयारी नाहीं.

पांचवा शिपाई : (सहाव्या शिपायास) अरे, पण बादशाहा आपलें ऐकतील का ? आपला हट्ट सोडतील का ?

सातवा शिपाई : (आठव्या शिपायास) त्यांच्यापुढें बोलण्याची कोणाची हिंमत आहे !

इतक्यांत अलेक्झांडर गंभीरपणानें झपाझप पावलें टाकीत प्रवेश करून उभा राहातो. त्याला पाहिल्यावर शांतता प्रस्थापित होते.

अलेक्झांडर : सैनिक हो, (सर्वत्र एकदम शांतता) तुम्ही पुढें जायचें नाहीं म्हणतां ! काय, झालें आहे काय तुम्हांला ? प्राच्यांच्या सेनेचें वर्णन ऐकून तुम्ही घाबरलांत काय ? नाहीं. डेरियससारख्या सम्राटाच्या असंख्य सेनेलाही ज्यांनीं धूळ चारली ते माझे शूर सैनिक शत्रुसेनेच्या नुसत्या आंकड्यांनीं घाबरून जाणार नाहींत. तर मग शत्रूच्या हत्तींची तुम्हांला भीति वाटते का ? (तिरस्कारानें) हूं, झेलमच्या लढाईत तुम्हीं पाहिलें आहेच कीं ह्या हत्तींपैकीं एक-दोघांना जरी जखमा झाल्या तरी ते सारे सैरावैरा पळायला लागतात आणि स्वतःच्या लोकांनाच पायाखालीं तुडवून टाकतात. नाहीं. खास नाहीं. हत्तींना घाबरण्यासारखें कांहींच नाहीं. मग काय, तुम्ही ह्या बीस नदीला घाबरतां ? (तुच्छतेनें) अरे, सिंधु आणि झेलमसारखे नद तुम्हीं अगदीं लीलेनें ओलांडलेत ; त्यापुढें ह्या क्षुद्र नाल्याची काय कथा ? वीर हो, असंख्य देश जिंकून तुम्ही येथपर्यंत आलां आहां. आजपर्यंत कोणाच्याही दास्यांत न गेलेल्या

* *

ह्या सिंधुदेशावरही आज तुमचें स्वामित्व गाजत आहे. न भूतो न भविष्यति असे पराक्रम करून आज तुम्ही वैभवाच्या शिखरावर जाऊन पोचलां आहां. आतां हा उरलेला एकमेव प्राच्य देश जिंकून त्या शिखरावर कळस चढविण्याचें तेवढेंच बाकी आहे. पराक्रमी वीर हो, पूर्वेच्या महासमुद्राला जाऊन भिडण्याची ही सुवर्णसंधि तुम्ही हातची दवडणार का? (सर्वत्र स्तब्धता असते. कोणी हूं चूं देखील करीत नाहीं.) वीर हो, तुम्हीं असे स्तब्ध कां? तुमचा आतां माझ्यावर विश्वास नाहीं असा का ह्याचा अर्थ? सांगा, आतांपर्यंत मीं तुम्हांला नुसते कष्टच तेवढे करायला लावले आहेत का? मीही तुमच्या बरोबरीनें खांद्याला खांदा भिडवून लढलों नाहीं का? तुमच्या कष्टानें साध्य झालेलें वैभवही तुमच्याच पदरीं पडत आलें आहे. आपण जिंकलेली ही सारी पृथ्वी तुमच्याच मालकीची आहे. त्यांतल्या अपरंपार धनधान्याचे धनीही तुम्हीच आहांत. तुम्हांला पेलणार नाहीं, एवढी लूट तुम्हांपैकीं प्रत्येकाला मिळालेली आहे ना? मग आतां आणखी पुढें जाऊन त्या लुटींत भर घालण्याची संधि आली असतां तुम्ही असे गप्प कां? सैनिक हो, आजपर्यंत माझा शब्द तुम्हीं केव्हांही खालीं पडूं दिला नाहीं. मग आत्तांच तुम्हांला काय झालें आहे? बोला, बोला, मॅसेडोनियन वीरांनो, बोला. होऊं द्या तुमची ती नेहमींची गर्जना.

तरीही सर्व सैन्य स्वस्थच उभें असतें. नंतर हळूहळू सर्व बाजूंनीं उसासे ऐकूं येतात. एका बाजूला एक हुंदका येतो. हुंदक्यांमागून हुंदके सुरू होतात. शेवटीं रडण्यांत पर्यवसान होतें. सर्वांच्याच डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागतात. अनिर्बंध रडणें चालू होतें. बराच वेळ हें असें चालू असतें. कांहीं वेळानें भर ओसरतो. पुन्हा भीषण स्तब्धता अथांग पसरते. अलेक्झांडरही ओलावलेले डोळे पुसतो. इतक्यांत कोइनोस जड पावलांनीं, डोळे पुशीत पुढें येतो. बादशाहाजवळ जातो. डोक्यावरचा मुकुट काढून बादशाहाच्या पायांशीं ठेवतो व हळूहळू पण निश्चयानें बोलूं लागतो.

* *

कोइनोस : महाराज, आपणाशीं आजन्म राजनिष्ठ असलेला आपला ह्या बंदा आपल्यासमोर बोलण्याचें धाडस करीत आहे. क्षमा असावी. स्वतःचे विचार सांगण्यासाठीं नव्हे तर ह्या असंख्य सैनिकांच्या मूक हृदयांत होत असलेली खळबळ आपल्या कानांपर्यंत पोचविण्यासाठीं मी बोलत आहें. महाराज, आजपर्यंत हे सारे सैनिक आपला प्रत्येक शब्द वरच्यावर झेलण्यासाठीं अहमहमिकेनें पुढें येत असत. ह्यापुढेंही त्यांची उत्सुकता कायम राहील. (सैनिकांकडून साथ मिळते. ' होय महाराज, होय ' असें कांहीं ओरडतात.) महाराज, ह्या बीस नदीपलीकडे ते जाण्यास नाकबूल आहेत असें नव्हे; तर आतां एक पाऊलही पुढें टाकण्यास ते असमर्थ आहेत. त्यांचा अगदीं नाइलाज आहे. महाराज, आत्तांच आपण ऐकलेले ह्या सैनिकांचे हुंदके-उसासे त्यांच्या बंडखोर वृत्तीचे का निदर्शक आहेत ? त्यांच्या असहाय स्थितीचेच ते द्योतक नाहींत का ? (सर्व सैनिक माना खालीं घालतात.) महाराज, आज सतत आठ वर्षें कसल्याही कष्टांना न कंटाळतां आणि कोठल्याही संकटांना न जुमानतां हे सैनिक आपल्या मागोमाग हिंडत आहेत. महाराज, आपल्याबरोबर मॅसेडोनियाहून निघालेल्या शिपायांपैकीं किती शिपाई आपल्यासमोर हजर आहेत ह्याचा विचार करा. कितीएक: शिपाई रणांगणावर कामीं आले; कितीएक बर्फावादळांत मेले आणि कितीएक रोगराईला बळी पडले. महाराज, जे जिवंत आहेत त्यांची तरी काय गत आहे तें पाहा. पुष्कळसे वृद्धावस्थेच्या आधीन झाले आहेत; पुष्कळांच्या अंगावरले जखमांचे घाव अजून भरून निघाले नाहींत; आणि कित्येक नुसते हाडांचे सापळे बनले आहेत.

' बरोबर, अगदीं बरोबर. ' ' ठीक बोललास. ' ' ठीक. ' ' ठीक. ' ' शाबास कोइनोस ' वगैरे उद्गार सैनिकांमधून ऐकूं येतात.

महाराज, स्वतःचे घोडे किती सैनिकांजवळ शिल्लक आहेत ह्याची चौकशी करा. आहेत त्या घोड्यांना नाल तरी आहेत का पाहा. सर्वांचीं

* *

हत्यारें बोथट झालीं आहेत. चिलखतें गंजलीं आहेत. महाराज, कोणा कोणाला तर घालायला पुरेसे कपडेही नाहींत. जाडेंभरडें पांघरून पुष्कळसे सैनिक आपला निवारा करीत आहेत. महाराज, प्राच्य देशाच्या राजाचें सैन्य म्हणतात तितकें अफाट नसेल; पण आपल्या ह्या असल्या सैनिकांचा शत्रूपुढें काय टिकाव लागणार? (सैनिकांचे उद्गार, 'बरोबर, अगदीं बरोबर') महाराज, आपल्या दातृत्वाबद्दल सर्वांची खात्री आहे. पण आपण कितीही लूट दिलीत तरी ती बरोबर वाहून न्यावयाला माणसांना ताकद तर हवी ना? महाराज, आतां सर्वांना आपापल्या घरीं जाऊं द्या. बहुतेकांचें उणें पुरें आयुष्य येथेंच भरत आलें आहे. आतां निदान मरायला तरी आपल्या मुलुखांत जाऊं द्या त्यांना. महाराज, आमचे आईबाप आतां आमच्या मागें जिवंत असतील कीं नाहीं कोण जाणे! पण मरणापूर्वी निदान आमचीं मुलेंबाळें तरी आमच्या नजरेस पडूं द्यात हो.

सैनिकांच्या डोळ्यांतून अश्रु येतात. सर्वत्र उसासे, सुस्कारे ऐकूं येतात व पुन्हा स्तब्धता होते.

महाराज, आपण जवान आहांत. वाढत्या वयाबरोबर अधिक धाडस अंगीं येण्याचें अजून आपलें वय आहे. पण आम्ही दिवसेंदिवस क्षीण होत चाललों आहों. काळाच्या स्वाधीन होण्याचा आमचा काळ समीप येत आहे, ह्याचा महाराज, आपण विचार करावा. महाराज, आपणाला पूर्वेचा सारा प्रांत जिंकावयाचा आहे. प्रत्यक्ष उगवत्या सूर्याशीं सामना करण्याची आपली महत्त्वाकांक्षा आहे. महाराज, परमेश्वर आपणास चिरायु करो आणि आपली महत्त्वाकांक्षा परिपूर्ण होवो. महाराज, आपण हें आपलें राहिलेलें सैन्य घेऊन देशीं परत चला. आमच्या हाडांना तेथें विश्रांति द्या आणि आपणास हवें असेल तर नवें ताज्या दमाचें जवान सैन्य बरोबर घेऊन राहिलेला प्रदेश जिंकण्यास आपण पुन्हा परत या. (सैनिकांचे उद्गार, 'हो. अगदीं बरोबर, अगदीं बरोबर.') आणि महाराज, आम्हांसाठीं नाहीं तरी

* *

निदान स्वतःसाठीं तरी परत फिरण्याचा विचार करा. महाराज, आपल्याला भेटून बरींच वर्षें लोटल्यानें आपल्या मागें आपल्या मातेची काळजीनें काय अवस्था झाली असेल ह्याची नुसती कल्पना करा. महाराज, पूर्वी कोणींही जिंकला नव्हता तो हा सिंधुदेश जिंकणाऱ्या आपल्या शिकंदर पुत्राला प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहून तिला केवढी धन्यता वाटेल ह्याचा विचार करा. ऐका महाराज, ह्या मूक सैनिकांची हाक ऐका आणि मागें फिरण्यास आज्ञा द्या. सोडा आपला हट्ट. (सर्व सेना पुन्हा तटस्थ होते. सर्वांचे कान आणि डोळे बादशाहाकडे असतात. बादशाहावर कांहीं परिणाम झाला का ? बादशाहा ऐकेल का ? आपला हट्ट सोडील का ? सर्वांच्या मनांत ह्या प्रश्नांचें काहूर माजतें.)

अलेक्झांडर : (एकदम आवेशानें) नाहीं, मी माझा हट्ट सोडणार नाहीं. मी पुढें जाणार आणि प्राच्य देशाच्या विजयाचें तोरण माझ्या यशोमंदिराला लावणार. तुम्ही डरतां आहांत. ठीक आहे. भ्याडांचें येथें काम नाहीं. जा. तुम्ही परत जा. मॅसेडोनियाला आपापल्या घरीं परत जा आणि सांगा आपल्या लोकांना, सांगा माझ्या मातेला कीं, आम्ही मॅसेडोनियाचे शूर राजनिष्ठ सैनिक आमच्या बादशाहाला प्राच्यांच्या असंख्य सेनेच्या तोंडीं देऊन, त्यांच्या अक्राळविक्राळ हत्तींच्या पुढें सोडून, येथें विश्रांति घेण्यासाठीं परत आलों आहोंत. जा. मला तुमची पर्वा नाहीं. तुम्ही गेलांत तरी मजजवळ बॅक्ट्रियन आणि सोगडियन ह्यांचें भाडोत्री लष्कर आहे. त्याच्या जोरावर मी प्राच्यांवर स्वारी करीन. कोणी नसले तरी हरकत नाहीं. मी एकटाच त्यांच्यावर चाल करून जाईन. पूर्वसमुद्रा-पर्यंतची पृथ्वी पादाक्रान्त करीन तेव्हांच माझ्या जिवाला शांतता मिळेल. मी शूराचा बच्चा आहें. वीरश्रीला वरायला लावीन नाहीं तर रणांगणावर देह ठेवून अजरामर होईन. जा. मला कोणाचीही पर्वा नाहीं. मी पुढें जाणारच.

* *

रागारागानें आपल्या तंबूंत जातो. 'कोणीही माझ्या मागें येऊं नका, खबरदार!' असें म्हणत तंबूचा पडदा जोरानें ओढून घेतो. सैनिक दिङ्मूढ होतात. आश्चर्याचा धक्का ओसरल्यावर हळूहळू चुळबुळ सुरू होते. त्याचें पर्यवसान, लोक नाराज होतात. कांहीं तर बादशाहाबद्दल क्षुब्धतेनें बोलूं लागतात. बराच काळ लोटतो. बादशाहा पुन्हा बाहेर येतो. इतक्यांत युमेनेस प्रवेश करतो.

युमेनेस : (प्रणाम करून) महाराज, पुढें कूच करण्यास देवीचा प्रसाद मिळाला नाहीं. पुष्कळ बळि देऊन झाले.

अलेक्झांडर : चालता हो, मला कोणाचीही पर्वा नाहीं. (पुन्हा आंत जातो आणि कांहीं वेळानें शांत होऊन बाहेर येतो. शांतपणें सैनिकांस उद्देशून बोलूं लागतो.) सैनिक हो, तुमचा सर्वांचा आग्रहच आहे तर मला तुमच्या म्हणण्याला मान देणें प्राप्त आहे. (सैनिकांना आनंद होतो. हर्षाच्या ऊर्मीवर ऊर्मी उठतात. मोठमोठ्यानें आनंदाच्या आरोळ्या सुरू होतात. कांहींजण बादशाहाला दुवा देतात. 'शाबास, बादशाहा शाबास.' 'मायबाप बादशाहा धन्य आहेस.' 'गरिबांच्या दात्या, देव तुझं भलं करो.' वगैरे.)

अलेक्झांडर : (सर्वांना शांत करीत) आपण येथून मागें फिरूं. तुमच्या बरोबर मी आहेंच. (सैन्यांत पुन्हा दुप्पट उत्साहानें आनंदाच्या आरोळ्या ठोकल्या जातात.)

टोलेमी : (हर्षयुक्त आनंदानें) महाराज, झेलम नदीवर नावा तयार असतील. आपण तेथूनच सिंधुमार्गें खालीं उतरायचें ना ?

अलेक्झांडर : होय सेनापति, तसाच बेत कायम ठेव. येथून आल्या रस्त्यानें रावी आणि चिनाब नद्या ओलांडून सैन्याला परत घेऊन जा. आणि हें पाहा टोलेमी, परत जातांना वाटेंत सैनिकांना हवी तशी लुटालूट करण्याची मुभा असूं द्या. अलेक्झांडरच्या स्वारीतून परत जाणाऱ्या प्रत्येक पराक्रमी वीराजवळ त्याला वाहून नेतां येईल त्याहून अधिक लूट असली पाहिजे. (सैनिकांना हर्ष होतो. 'अलेक्झांडर बादशाह की जय', 'मॅसेडोनिया

* *

की जय', 'अलेक्झांडर बादशाहा चिरायु होवो' अशा घोषणा करीत सर्व सैनिक टोलेमी, युमेनेस ह्यांसह जाऊं लागतात. परंतु अलेक्झांडर युमेनेसला मागें बोलावतो.)

अलेक्झांडर : युमेनेस, तूं जरा थांब. माझें म्हणणें नीट समजावून घे.

युमेनेस : (प्रणाम करून) जी हुजूर.

अलेक्झांडर : आपण येथें ह्या बीस नदीपर्यंत आक्रमण करून आलों ह्याची साक्ष म्हणून येथें ह्या जागीं मोठमोठीं अजस्र स्मारकें उभीं करा. आपल्या छावणीची खूण म्हणून असंख्य बराकी आणि तबेले बांधून ठेवा. नेहमींपेक्षां दुप्पट आकाराच्या त्या बनवा. शिपायांच्या खाटाही दुप्पट मापाच्या तयार करा. घोड्यांचे लगाम, रिकिबी, खोगिरें इकडे तिकडे टाकून ठेवा. त्याही वस्तु मोठ्या असूं द्यात. भविष्यकाळीं जेव्हां येथले जंगली लोक हीं स्मारकें पाहाण्यासाठीं येथें येतील त्या वेळीं, अलेक्झांडर बादशाहाचे लोक व त्याचे घोडेही केवढे प्रचंड होते, असें म्हणत त्यांनीं तोंडांत बोटें घातलीं पाहिजेत.

युमेनेस : महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणें सर्व व्यवस्था करतों.

अलेक्झांडर : ताबडतोब कामाला लागा. जा.

युमेनेस प्रणाम करून निघून जातो.

अलेक्झांडर पूर्व दिशेकडे गुडघे टेकून मस्तक नम्र करून प्रार्थना करतो.

अलेक्झांडर : हे देवतांनो, तुमच्या कृपाप्रसादानें मी येथवर मजल मारीत आलों आहें. माझ्यापुढें जाण्याचें सामर्थ्य इतःपर कोणालाही देऊं नका. पराक्रमांत अलेक्झांडरला मागें टाकणारा वीर जगांत होऊं देऊं नका, एवढेंच तुमच्यापाशीं मागणें आहे.

असें म्हणून उठून पश्चिमेकडे तोंड करून मागें वळतो. पडद्यांत सैनिकांच्या 'अलेक्झांडर की जय' अशा घोषणा चालू असतात.

पडदा पडतो.

अंक तिसरा समाप्त

व्य क्ति वि ष य क मा हि ती

अभिसार — सिंधु नदीच्या उत्तरेकडल्या डोंगराळ मुलुखाला पूर्वी अभिसार हें नांव होतें. त्यावरून तेथल्या राजालाही अभिसार म्हणत असत.

अलेक्झांडर दि ग्रेट — मॅसेडोनियाचा राजा फिलिप ह्याचा हा मुलगा. ह्याचा जन्म इ. स. पू. ३५६ सालीं झाला. ह्याचें बालपणचें शिक्षण कडक अशा स्पार्टन पद्धतीच्या शिस्तींत झालें. नंतर वयाच्या तेराव्या वर्षी ह्याला ॲरिस्टॉटलच्या हवालीं करण्यांत आलें. ॲरिस्टॉटलनें चार वर्षें त्याला काव्य, वक्तृत्व, तत्त्वज्ञान, राजनीति, वगैरे विषयांचें शिक्षण दिलें. वयाच्या अठराव्या वर्षी त्यानें ग्रीसमधील इतर संस्थानांशीं युद्ध करून त्यांना मॅसेडोनियाचें नेतृत्व मान्य करावयास भाग पाडलें.

वयाच्या विसाव्या वर्षी, फिलिपच्या मृत्यूनंतर त्याच्या गादीवर बसला. त्या वेळीं त्याला चोहोंकडून शत्रूंशीं सामना करावा लागला. त्यांत यशस्वी होऊन दोन वर्षांत त्यानें पुन्हा ग्रीसमध्यें आपलें वर्चस्व स्थापिलें व लगेच पर्शियाविरुद्ध लढाईची तयारी केली. इ. स. पू. ३३४ सालीं त्यानें पूर्वेकडील देशांवर आक्रमण करण्यास प्रारंभ केला.

सीरिया, बाबिलोनिया, इजिप्त, वगैरे देश एकामागून एक काबीज करीत जाऊन त्यानें अखेर पर्शियाच्या राजाला पळ काढावयास लाविलें व स्वतः पर्शियाच्या अफाट साम्राज्याचा मालक बनला. नंतर हिरकानिया, बाक्ट्रिआना, अर्कोसिया, सोगडिआना, वगैरे देश हस्तगत करून त्यानें हिंदुकुश पर्वत

* *

ओलांडला व इ. स. पू. ३२६ सालच्या सुरुवातीस सिंधु नदी पार करून तो पंजाबांत आला.

पंजाबांत आल्यावर त्यानें तेथल्या लहानमोठ्या सर्व राजांशीं लढाया करून त्यांना आपलें स्वामित्व कबूल करावयास लाविलें व आक्रमण करीत बीस नदीपर्यंत येऊन पोहोंचला. त्यापलीकडे जाऊन मगध देशावर स्वारी करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती.

पण आतां घर सोडल्यास दहा वर्षांहून अधिक काळ लोटल्यामुळें व ठिकठिकाणच्या लढायांत पुष्कळ नुकसान व प्राणहानि झाली असल्यानें त्याच्या सैनिकांनीं पुढें जाण्याचें नाकारलें, तेव्हां त्याला बीस नदीवरूनच माघारीं फिरणें भाग पडलें.

तेथून तो झेलम नदीकडे परत येऊन तीवरून तो सिंधु नदीच्या मुखापर्यंत आला. नंतर त्यानें कांहीं सैन्य जलमार्गानें देशीं परत धाडिलें व बाकीचें सैन्य घेऊन तो गेड्रोसियाच्या वाळवंटांतून कारमानियांत गेला. वाळवंटांत त्याच्या सैन्याचे हालहाल झाले व अगणित सैनिक अन्नपाण्याविना मृत्युमुखीं पडले.

कारमानियांत थोडी विश्रांति घेऊन तो बाबिलोनिया शहरीं आला. तेथें त्यानें आपली राजधानी करण्याचा विचार केला व त्या दृष्टीनें कामास सुरुवात करण्याबद्दलचे त्यानें हुकूम सोडले. पण बाबिलोनियांत आल्यानंतर थोड्याच दिवसांनीं त्याला ताप येऊं लागला आणि त्यांतच मद्यपानाचा त्यानें अतिरेक केल्यामुळें परिणामीं त्याला मृत्यु आला. त्या वेळीं त्याचें वय अवघें तेहतीस वर्षांचें होतें.

त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या सेनापतींनीं आपसांत लढाया करून त्याचें राज्य वांटून घेतलें.

पाश्चात्य इतिहासांत अलेक्झांडर हा 'अलेक्झांडर दि ग्रेट' ह्या नांवानें ओळखला जातो. अलेक्झांडर ह्या शब्दापासून अरबी भाषेंत इस्कंदर व त्यापासून फारसी भाषेंत सिकंदर व त्यापासून मराठींत शिकंदर शब्द रूढ झाला. संस्कृत भाषेंत हा अलीकसुंदर ह्या नांवानें ओळखला जातो.

अष्टक—पुष्कलावतीचा राजा. पुष्कलावती ही पूर्वीच्या गांधार प्रांताची राजधानी होती.

* *

आटलोस — अलेक्झांडरच्या सैन्यांतील एक प्रमुख अधिकारी.

अंभी — सिंधु व झेलम ह्या नद्यांमधल्या सुपीक देशाचा राजा. ह्याची राजधानी तक्षशिला होती असें दिलें आहे. पाणिनीच्या गणपाठांत आंभ ह्या कुलाचा निर्देश आहे. पण त्याशिवाय इतर कोठेंही भारतीय वाङ्मयांत अंभीचा उल्लेख नाहीं. अंभीचें पौरस राजाशीं वैर होतें. तें साधण्यासाठीं त्यानें अलेक्झांडरला पौरसावर स्वारी करून त्याला जिंकण्याच्या कामीं साहाय्य केलें. अलेक्झांडरच्या स्वारीनंतर थोड्याच काळानें चंद्रगुप्तानें यवनांना सिंधु खोऱ्यांतून हाकून दिलें. त्याबरोबरच अलेक्झांडरशीं संगनमत करणाऱ्या अंभीचाही शेवट झाला.

ओनेसिक्रिटोस — अलेक्झांडरच्या स्वारीबरोबर आलेला एक ग्रीक इतिहासलेखक. हा डायोजिनिस (Diogenes the Cynic) ह्या ग्रीक तत्त्ववेत्त्याचा शिष्य होता. अलेक्झांडरनें भारतांत असतांना साधूंकडे जाऊन त्यांची माहिती मिळविण्याचें काम ह्याच्याकडे सोपविलें होतें. ओनेसिक्रिटोसनें अलेक्झांडरचा समग्र इतिहास लिहून ठेविला होता. पण त्यांत खऱ्यापेक्षां काल्पनिक भाग अधिक असल्यामुळें तो विश्वसनीय मानला जात नाहीं.

ॲरिस्टॉटल — (इ. स. पू. ३८४ ते ३२१) सुप्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता. हा अथेन्समध्यें प्लेटोजवळ तत्त्वज्ञान शिकत असतां अलेक्झांडरचा जन्म झाला. त्या वेळीं अलेक्झांडरच्या पित्यानें म्हणजे फिलिप राजानें ॲरिस्टॉटलला पत्र लिहिलें होतें. तें असें होतें —

> " फिलिपचे ॲरिस्टॉटलला प्रणाम.
>
> मला पुत्र झाल्याचें विदित व्हावें. तुम्ही आपल्या आयुष्याच्या भर उमेदींत आहांत, अशा वेळीं त्याचा जन्म झाला म्हणून मी देवाचे फार उपकार मानतों. कारण मला आशा आहे कीं, तुमच्या हाताखालीं शिकून तयार झाल्यावर तो आपणां दोघांचें नांव राखील आणि माझ्या विस्तीर्ण राज्याची धुरा सांभाळण्यास लायक ठरेल."

ह्यानंतर तेरा वर्षांनीं फिलिप राजानें अलेक्झांडरला ॲरिस्टॉटलच्या स्वाधीन केलें. ॲरिस्टॉटलनें त्याला राजधानीपासून दूर असलेल्या आपल्या गांवीं नेऊन तेथें त्याचें चार वर्षें शिक्षण केलें.

* *

ॲरिस्टॉटलला अलेक्झांडरकडून फार मान मिळत असे. त्याच्या प्राणिशास्त्र-विषयक संशोधनकार्याला मदत व्हावी म्हणून सर्व ठिकाणांहून जनावरांचे नमुने व इतर माहिती अलेक्झांडरनें त्याच्यासाठीं मुद्दाम आणवून दिली.

कालानोस — तक्षशिलेंतला एक साधु. ह्याचें खरें नांव काय होतें तें समजत नाहीं. पण हा ‘ कल्याण कल्याण ’ असा सर्वांना आशीर्वाद देत असे. म्हणून कालानोस हें नांव ग्रीकांनीं त्याला दिलें असावें असें वाटतें. कालानोसचा उल्लेख भारतीय वाङ्मयांत कोठेंच नाहीं. ग्रीक लेखकांनीं मात्र बऱ्याच ठिकाणीं त्याची माहिती दिली आहे.

अलेक्झांडर आपल्या देशीं परत जाण्यासाठीं निघाला तेव्हां कालानोस त्याच्या बरोबर होता. ते सूसा ह्या गांवीं पोचल्यावर कालानोसची प्रकृति बिघडली. आतां जगण्यांत अर्थ नाहीं असें मनाशीं ठरवून त्यानें अग्निकाष्ठें भक्षण करण्याचा निश्चय केला. अलेक्झांडरनें त्याला परावृत्त करण्याचा बराच प्रयत्न केला. पण कालानोसचा निश्चय ढळला नाहीं. तेव्हां त्याच्या सांगण्या-प्रमाणें त्याच्यासाठीं चिता रचून देण्यांत आली व त्या चितेमध्यें कालानोसनें स्वतःला जिवंत जाळून घेतलें.

ह्या प्रसंगाचें हृदयस्पर्शी वर्णन बऱ्याच ग्रीक ग्रंथांतून आढळून येतें. अलेक्झांडरचे हजारों सैनिक तें दृश्य पाहाण्यासाठीं जमले होते. कालानोस चितेवर चढला त्या वेळीं त्याची मुद्रा अत्यंत शांत व गंभीर होती. चिता पेटविली गेली तेव्हां असंख्य तुताऱ्यांच्या निनादानें त्याला सलामी देण्यांत आली आणि साऱ्या सैनिकांनीं चोहोंबाजूंनीं त्याचा जयजयकार केला. अग्नीच्या ज्वाळा त्याच्या शरीराला वेढूं लागल्या. तरीपण त्या साधूच्या तोंडून हूं कीं चूं निघालें नाहीं कीं त्याचें नुसतें ओठ देखील हाललेलें दिसलें नाहीं.

मृत्यूला मुळींही न भितां एक माणूस इतक्या शांतपणें स्वखुशीनें त्याच्या स्वाधीन होत आहे हें दृश्य पाहून सारे ग्रीक लोक आश्चर्यानें स्तंभित झाले. मानव देह नश्वर असल्यामुळें त्याच्या मोहपाशांत गुरफटून जाऊं नये हें तत्त्वज्ञान भारतीयांच्या रोमरोमीं भिनलेलें असतें हें त्या ग्रीकांना काय ठाऊक !

त्या वेळच्या एका विलक्षण घटनेचें वर्णन कांहीं ग्रीक लेखकांनीं केलें आहे, तें असें — चितेवर चढण्यापूर्वी कालानोसनें अलेक्झांडरच्या सर्व सेनापतींचा

* *

निरोप घेतला. पण अलेक्झांडरला मात्र तो जवळ जाऊन भेटला नाहीं. हें पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें. आणि ह्याचें कारण काय, म्हणून एकानें कालानोसला विचारलें असतां त्यानें उत्तर दिलें कीं, 'लौकरच आपण अलेक्झांडरला बाबिलोन शहरीं भेटणार आहोंत.'

ह्या प्रकारानंतर लौकरच अलेक्झांडर बाबिलोन शहरीं पोचला आणि तेथेंच त्याला मृत्यु आला. त्या वेळीं मात्र सर्वांना एकदम कालानोस साधूची आठवण झाली आणि कालानोसला अलेक्झांडरच्या मृत्यूचें भविष्य ठाऊक होतें हें त्यांच्या लक्षांत आलें.

कालिस्थेनेस—ॲरिस्टॉटलचा एक नातेवाईक. अलेक्झांडरबरोबरच ह्याचें ॲरिस्टॉटलच्या हाताखालीं शिक्षण झालें होतें. गुरूच्या सांगण्यावरून अलेक्झांडरनें त्याला आपल्याबरोबर स्वारीवर नेलें होतें. पण कालिस्थेनेस निर्भीड व स्पष्टवक्ता असल्यानें तो नेहमीं अलेक्झांडरच्या वागणुकीवर टीका करी. त्यामुळें अलेक्झांडर त्याच्यावर चिडत असे. अखेर अलेक्झांडरनें त्याला बंदिवासांत टाकलें व भारतांत असतांना त्याचा मृत्यु झाला असें कांहीं इतिहासकार लिहितात. पण टोलेमी हा लेखक म्हणतों कीं, कालिस्थेनेसचे हालहाल करण्यांत येऊन त्याला सुळावर चढविण्यांत आलें.

कालिस्थेनेसनें कांहीं ग्रंथ लिहिले. त्यांत अलेक्झांडरच्या स्वारीचीही हकीकत लिहिली गेली आहे. पण त्याच्या लिखाणाला फारशी किंमत दिली जात नाहीं.

कोइनोस—अलेक्झांडरच्या पदरीं असलेला एक अतिशय लायक सेनापति. बीस नदीपर्यंत पोचल्यावर जेव्हां अलेक्झांडरचें सैन्य पुढें जाण्यास कंटाळलें, त्या वेळीं ह्यानेंच पुढें येऊन अलेक्झांडरपुढें त्यांचें म्हणणें ठेविलें आणि अलेक्झांडरला परत फिरावयास लाविलें. त्यानंतर लवकरच सिंधु नदीवरून अलेक्झांडरचें सैन्य परत जात असतां कोइनोस आजारी पडला व त्यांतच त्याचा अंत झाला.

क्राटेरोस—अलेक्झांडरचा एक उत्तम सेनापति.

चारेस—अलेक्झांडरच्या स्वारींतील एक अधिकारी. ह्याच्याकडे परिचायकाचें (Court usher) काम होतें. ह्यानें अलेक्झांडरच्या लढाया व

* *

त्यांचें खाजगी जीवन ह्यांबद्दलच्या अनेक आठवणी लिहून ठेविल्या. अलेक्झांडरच्या इतिहासकारांना त्यांचा बराच उपयोग झाला.

चाणक्य—हे मूळचे तक्षशिलेचे रहिवासी. विद्वत्तेबद्दल त्यांची फार ख्याति होती. मगधदेशांत सर्व ठिकाणचे विद्वान् एकत्र जमत असत म्हणून ते तेथें गेले. पण तेथील राजा धननंदा ह्यानें त्यांचा अपमान केल्याकारणानें त्यांनीं तो देश सोडला. परत जातांना त्यांनीं चंद्रगुप्ताला आपल्या बरोबर तक्षशिलेस नेलें. तेथें त्यांनीं त्याला उत्तम शिक्षण देवविलें व पुढें त्याच्या करवीं नंदाचा पराभव करविला.

ह्यांनीं सुप्रसिद्ध "कौटिलीय अर्थशास्त्र" हा राजनीतिविषयक ग्रंथ लिहिला, त्यावरून त्या काळच्या राज्यकारभाराच्या पद्धतीविषयीं बरीच चांगली माहिती मिळूं शकते. त्यांत अगदीं बारीक सारीक मुद्द्यांबद्दलचेंही विवेचन केलेलें आहे तें वाचून कौतुक वाटतें. इतकीं वर्षें झालीं तरी तो ग्रंथ आजच्या परिस्थितींतही विद्वानांना मार्गदर्शक होतो हें त्याच्या मौलिकतेचें गमक आहे.

चंद्रगुप्त—ग्रीक इतिहासकारांनीं ह्याचा Sandrokottos (संद्रोकोटोस) ह्या नांवानें उल्लेख केलेला आहे. चंद्रगुप्ताचा जन्म शाक्य जातींतील मौर्य घराण्यांत झाला होता. त्याच्याबद्दलची पाली ग्रंथांतून असलेली माहिती बरीच मनोरंजक आहे. लहानपणीं त्याला एका गुराख्यानें वाढविलें. एकदा तो गुरें चारीत असतां चाणाक्ष व राजकारणकुशल म्हणून प्रख्यात असलेल्या चाणक्यांच्या नजरेस पडला. त्यांनीं त्याला आपल्याबरोबर नेऊन तेथें त्याचें युद्धकला व इतर शास्त्रें ह्यांचें उत्तम प्रकारें शिक्षण करविलें.

मोठा झाल्यावर चंद्रगुप्तानें प्रथम ग्रीकांना पंजाबांतून हाकलून लाविलें. नंतर मगध देशावर स्वारी करून धननंदाचा पराभव केला व इ. स. पू. ३१५ सालीं पाटलिपुत्रांत म्हणजे हल्लींच्या पाटणा शहरीं आपली राजधानी स्थापून सिंधु व गंगा ह्या दोन्ही नद्यांनीं व्यापलेल्या विस्तीर्ण प्रदेशाचें एकछत्री राज्य बनविलें.

ह्यानंतर सुमारें दहा वर्षांनीं सेल्युकोस निकाटोर ह्या सीरियाच्या ग्रीक राजानें हिंदुस्थानवर स्वारी करण्याचा प्रयत्न केला. पण चंद्रगुप्ताचें सामर्थ्य लक्षांत आल्याबरोबर त्यानें युद्धाचा बेत रहित केला व सिंधु नदीच्या पश्चिमेकडचा

* *

हिंदुकुश पर्वतापर्यंत आपल्या ताब्यांत असलेला सारा मुलुख चंद्रगुप्ताच्या हवालीं करून त्यानें त्याच्याशीं स्नेहसंबंध जोडला. अशा तऱ्हेनें लढाई न करितां सेल्युकोस आपल्या देशीं परत गेला व नंतर त्यानें मेगास्थेनेस नांवाच्या आपल्या मित्राला चंद्रगुप्ताच्या दरबारीं आपला वकील म्हणून पाठविलें होतें.

चाणक्यांनीं घालून दिलेल्या शिस्तीनुसार चंद्रगुप्तानें उत्तम प्रकारें राज्य केलें. सुप्रसिद्ध सम्राट् अशोक हा ह्याचा नातू होय.

टेसियास—ग्रीक भाषेंत भारताबद्दलची विविध प्रकारची माहिती स्वतंत्र पुस्तकरूपानें देणारा हा पहिला लेखक. टेसियास पार्शियन सम्राटाच्या पदरीं राजवैद्य म्हणून अठरा वर्षें (इ. स. पू. ४१६ ते ३९८) राहिला होता. त्या वेळीं पर्शियन लोकांचें भारताशीं व्यापारी दळणवळण बरेंच होतें; म्हणून टेसियासला पर्शियाचे दरबारीं असतांना भारताबद्दलची बरीच माहिती गोळा करतां आली. अर्थातच ती सर्व ऐकीव होती.

टेसियासनें भारतांतले वेगवेगळे चमत्कारिक प्राणी, पक्षी, मासे, तद्वत् झाडें, वनस्पति, नद्या, डोंगर, रानटी माणसें, वगैरेसंबंधीं माहिती लिहून ठेविली आहे. त्यांतील बराचसा भाग चमत्कारिक व अशक्य कोटींतला वाटण्यासारखा असल्यामुळें टेसियासला थापाड्या म्हणून संबोधिलें जातें. हेरेडोटोसप्रमाणें त्यानेंही सोनें खणून काढणाऱ्या मुंग्यांची माहिती दिली आहे. तसेंच मार्टिखोरा नांवाच्या एका नरभक्षक हिंस्र पशूचें वर्णन केलें आहे.

टेसियास दीर्घोद्योगी होता. धंद्यानें वैद्य असतांही त्याचा लेखनाचा व्यासंग दांडगा होता. त्यानें पर्शियाचा समग्र इतिहास लिहिला; त्याचीं तेवीस पुस्तकें झालीं. ह्यांखेरीज त्यानें अनेक ग्रंथ लिहिले. त्यांत भारतावरील माहितीचा एक होता. त्याचें नांव Indika of Ktesias. आज मूळ ग्रंथ उपलब्ध नाहीं, पण त्यावरून घेतलेले उतारे अनेक ग्रीक लेखकांच्या ग्रंथांतून पाहावयास सापडतात.

टोलेमी—अलेक्झांडरचा सर्वोत्कृष्ट सेनापति. अलेक्झांडरच्या स्वारींत ह्यानें बऱ्याच महत्त्वाच्या लढाया स्वतंत्ररीत्या जिंकल्या. ह्याला अलेक्झांडरचा उजवा हात म्हटलें तरी चालेल. ह्याचें शिक्षण अलेक्झांडरबरोबरच ॲरिस्टॉटलच्या हाताखालीं झालें होतें असें म्हणतात. तो राज्यकारभारांतही निपुण होता. अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर टोलेमी इजिप्तचा राजा झाला आणि चाळीस

* *

वर्षें त्यानें तेथें राज्य केलें. त्याच्या कारकीर्दींत इजिप्त देशाची फार भरभराट झाली. टोलेमीनें अलेक्झांडरच्या स्वारीच्या वेळच्या पुष्कळ आठवणी लिहून ठेविल्या होत्या. त्यांचा इतिहासकारांना फार उपयोग झाला.

डिओग्नेटोस — (बेटोन पाहा.)

डेरियस — पर्शियाचा सम्राट्. अलेक्झांडरनें ह्याचा पराभव करून ह्याला पळावयास लावलें. अखेर ह्याच्या मित्रांनींच ह्याचा खून केला.

मंद्निस — तक्षशिलेंतला एक साधु. ह्याचा शिष्यगण फार मोठा होता. अलेक्झांडरनें त्याला बोलविण्यासाठीं मुद्दाम आपला एक अधिकारी त्याच्याकडे धाडला असतांना त्यानें बादशाहाच्या भेटीस जाण्याचें नाकारलें. तें ऐकून, ‘ आपण कितीतरी देश पादाक्रान्त केले असतां अखेर एका नंग्या साधूनें आपणास खालीं पाहावयास लाविलें ’ असे उद्गार अलेक्झांडरच्या तोंडून निघाले असें कांहीं इतिहासकारांनीं म्हटलें आहे.

मंदनिसलाच कांहीं ग्रीक लेखक दंदमिस असेंही म्हणतात. मात्र मंदनिस अगर दंदमिस ह्या नांवाच्या साधूचा भारतीय वाङ्मयात कोठेंही उल्लेख आढळून येत नाहीं.

नंद् — नंद घराण्याचा शेवटचा राजा. धननंद, महापद्म, हिरण्यगुप्त ह्या नांवांनींही संस्कृत ग्रंथांतून ह्याचा उल्लेख आहे. हा लोभी, क्रूर व नीच वृत्तीचा असल्यामुळें प्रजा त्याला अत्यंत कंटाळली होती. चाणक्यांनीं चंद्रगुप्ताकडून त्यांचा पराभव करवून प्रजेला त्याच्या त्रासांतून सोडविलें.

पौरस — झेलम आणि चिनाब ह्या नद्यांमधल्या सुपीक देशाचा बलाढ्य राजा. पौर अथवा पौरव ह्या संस्कृत शब्दापासून पौरस शब्द झाला असावा. ग्रीक इतिहासकारांनीं ह्याची पुष्कळ माहिती दिली आहे. पण प्राचीन भारतीय वाङ्मयांत ह्याचा कोठेंहीं उल्लेख आलेला नाहीं.

पौरसानें अलेक्झांडरशीं निकराची लढाई खेळून त्याला प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. पण अलेक्झांडरला घरभेद्या अंभीचें साहाय्य असल्यानें पौरसाचा अखेर नाइलाज झाला.

* *

फिलिप—अलेक्झांडरच्या सैन्यांतला एक अधिकारी. सिंधु खोऱ्यांत सत्राप म्हणून ह्याची नेमणूक झाली होती. अलेक्झांडरची पाठ फिरल्याबरोबर त्याच्याच भाडोत्री सैन्यानें ह्याला ठार मारिलें.

बेटोन—डिओग्नेटोस लाणि बेटोन हे दोघे अलेक्झांडरच्या स्वारीबरोबर असलेले गणिती. ह्यांच्याकडे, सैन्यानें किती मजल मारली ह्याची मोजणी करून त्याची नोंद ठेवण्याचें काम असें. बेटोननें 'Stages of Alexander's marches' ह्या नांवाचा एक ग्रंथ लिहून ठेविला होता.

भागल—रावी आणि बीस ह्या नद्यांमधल्या प्रदेशाचा राजा. ग्रीक लेखकांनीं ह्याचें नांव 'Phegelas' असें दिलें आहे.

मेगास्थेनेस—सीरियाचा राजा सेल्यूकोस निकाटोर ह्यानें आपला प्रतिनिधी म्हणून मेगास्थेनेस ह्याला चंद्रगुप्ताच्या दरबारीं सुमारें इ. स. पू. ३०२ सालीं धाडलें होतें.

मेगास्थेनेस पाटलीपुत्रांत बराच काळ राहिला होता. जात्या अत्यंत हुशार व चौकस वृत्तीचा असल्यामुळें त्यानें स्वतः प्रत्यक्ष पाहून तसेंच इतर लोकांना विचारून भारताबद्दलची बरीचशी माहिती गोळा केली. ही सर्व माहिती त्यानें आपल्या 'Indika' नामक ग्रंथांत हिहून ठेविली होती.

दुर्दैवानें 'इंडिका' आज उपलब्ध नाहीं. तरीपण मेगास्थेनेसच्या पश्चात् बऱ्याच ग्रीक लेखकांनीं त्यांतील घेतलेले उतारे आज वेगवेगळ्या ग्रंथांतून पाहावयास सापडतात. भारतांतील लोक, त्यांचीं शहरें व राहाणी, त्यांच्या चालीरीति, त्यांचे स्वभाव, त्यांची राज्यव्यस्था व समाजव्यवस्था, त्यांचे कायदेकानू, तसेंच भारतांतील विविध प्रकारचे प्राणी, झाडें, नद्या, पर्वत, रानटी जाती अशा तऱ्हेच्या हरतऱ्हेच्या विषयांवरील माहिती त्यावरून आपणास मिळूं शकते.

ह्या माहितीवरून इ. स. पू. चौथ्या शतकाच्या अखेरचें भारताचें सर्वांगीण चित्र आपल्या डोळ्यांपुढें स्पष्ट उभें राहूं शकतें. ही माहिती विश्वसनीय व अधिकारी पुरुषानें लिहिलेली असल्यामुळें प्राचीन भारतीय संस्कृतीची ओळख पटवून घेण्याच्या कामीं अभ्यासूंस तिचा फार उपयोग होण्यासारखा आहे.

* *

युमेनेस—अलेक्झांडरचा प्रायव्हेट सेक्रेटरी. बादशहाची रोजनिशी लिहिण्याचें काम ह्याच्याकडे होतें. रोजच्या रोज बादशहाचे व्यवहार नमूद करावे लागत असत. इतिहासकारांना ह्या रोजनिशीचा फार उपयोग झाला.

शशिगुप्त—स्वतःचा देश सोडून परदेशीं हा बॅक्ट्रियानाच्या सत्रापाच्या नोकरींत शिरला. अलेक्झांडरनें बॅक्ट्रियाना जिंकल्यावर शशिगुप्त अलेक्झांडरच्या सैन्यांत दाखल झाला. सिंधु नदीच्या पश्चिम किनाऱ्यावरील उत्तरेचा मुलुख जिंकल्यावर अलेक्झांडरनें तेथें आपलें सैन्य ठेविलें. त्याचा ताबा शशिगुप्ताकडे देण्यांत आला होता. अलेक्झांडरला भारताबद्दलची बरीचशी माहिती शशिगुप्ता-कडून मिळाली असली पाहिजे. ग्रीक इतिहासांत ह्यांचें नांव ‘ Sisikottos ’ असें आहे.

सौभूति—बीस नदीच्या पश्चिम किनाऱ्यावरील मुलुखाचा राजा. ह्याच्या राज्यपद्धतिबद्दल ग्रीक लेखकांनीं फार प्रशंसा केली आहे. त्याचें नांव त्यांनीं ‘ Sophytes ’ असें दिलें आहे.

संजय — हा पुष्कलावतीच्या राजाच्या पदरीं असतांना तेथून फरारी झाला व अंभीच्या नोकरींत राहिला. अलेक्झांडरनें त्याला पुष्कलावती जिंकल्यावर तेथील राजा केलें. ग्रीक लेखक ह्याचें नांव ‘Sanggaios’ असें देतात.

हेफेस्टिओन—अलेक्झांडरचा एक सेनापति. लहानपणीं अलेक्झांडर-बरोबर वाढलेला. अलेक्झांडरचा त्याच्यावर अत्यंत लोभ असे.

हेरोडोटोस—(इ. स. पू. ४८४ ते ४३१) ग्रीक लोकांत इतिहास-लेखनाला ह्यानें सुरवात केली म्हणून ह्याला इतिहासाचा जनक म्हणून संबोधिलें जातें. त्याच्या लेखनांत भारताबद्दलचा उल्लेख अगदीं त्रोटक आहे. पर्शियन साम्राज्याचा एक अगदीं पूर्वेकडला प्रांत एवढीच भारताबद्दलची माहिती त्याला असावी असें दिसतें. पर्शियन सम्राटाला भारताकडून फार मोठी खंडणी सोन्याच्या रूपानें मिळते व तें सोनें मुंग्यांनीं जमिनींतून खणून काढलेलें असतें असें त्यानें लिहिलें आहे!

अनुक्रम
विभाग
क्रमांक २५९८
नों. दि.

विविध माहिती

अश्वक—ग्रीक इतिहासकारांनीं Aspasioi (अस्पासियो) ह्या नांवानें ज्या लोकांचा उल्लेख केलेला आहे ते हे महाभारतांतील अश्वक लोक असावेत. त्यांची वस्ती काबूल व सिंधु ह्या दोन नद्यांमधल्या उत्तरेच्या भागांत असे. उत्तम घोड्यांबद्दल ह्यांच्या मुलुखाची प्रसिद्धि होती व त्यावरूनच त्यांना अश्वक हें नांव पडलें असावें.

कठ—ग्रीक इतिहासांत Kathaioi (कठायो) ह्या नांवानें ह्या लोकांचा निर्देश केलेला आहे. हे बहुतेक रावी नदीच्या पूर्वेकडचे लोक असावेत. अत्यंत शूर असा त्यांचा लौकिक होता. कठ हा शब्द क्षत्रिय ह्या शब्दापासून निघालेला असावा असें कांहीं विद्वानांचें मत आहे.

कापूस—अलेक्झांडरच्या स्वारीपूर्वी ग्रीक लोकांनीं कापूस पाहिलेला नव्हता असें त्यांच्या इतिहासांतील उल्लेखांवरून दिसतें. भारतांत त्यापूर्वी फार पुरातन काळापासून कापसाचें कापड बनविलें जात असे. ऋग्वेदांत एके ठिकाणीं कोष्टयांच्या बायका कापसाचें सूत आडवें उभें विणीत आहेत अशा आशयाचा निर्देश आहे.

गांगदेश—गंगा नदीच्या मुखाजवळचा प्रांत म्हणजे हल्लींचा पश्चिम बंगाल. हा पूर्वीचा गांगदेश असला पाहिजे. ह्याची राजधानी Parthalis (पार्थालिस) (हल्लींचें बरद्वान) होती. हें फार समृद्ध व बलाढ्य राज्य होतें असें मेगास्थेनेसनें म्हटलें आहे. ग्रीकांनीं ह्याचें नांव Gangaridai असें दिलें आहे.

* *

नदी—प्राचीन कालापासून भारतीयांच्या अंतःकरणांत नदीबद्दल नितान्त आदराच्या भावना आहेत. संस्कृत व्याकरणकार पाणिनींनीं "नदीमातृको देशः" असें म्हटलें आहे. त्यावरून नदीबद्दल भारतीयांच्या अंतःकरणांत मातृत्वाची भावना होती हें स्पष्ट होतें.

पंचनद्या—पंजाबांतील नद्यांचीं ग्रीक इतिहासकारांनीं दिलेलीं नांवें व त्यांचीं तत्कालीन संस्कृत ग्रंथांतील नांवें पुढीलप्रमाणें आहेत—

झेलम—Hydaspes ह्युडास्पेस–वितस्ता, (दूरवर पसरलेली)

चिनाब—Akesines आकेसिनेस–असिक्नी, (श्यामवर्णी)

रावी—Hydraotes ह्युाड्राओटेस–ऐरावती.

बीस—Hyphasis ह्युफासिस–विपाशा (पाशरहित)

सतलज—Hesidrus:हेसिद्रुस–शतद्र (शेंकडों प्रवाह असलेली)

प्राच्यदेश—गंगानदीच्या पूर्वेकडचा प्रांत. बीस नदीच्या पश्चिमेस राहाणारे म्हणजे पंजाबचे लोक ह्या पूर्वेच्या प्रांताला प्राच्य देश असें म्हणत असत. ग्रीक लेखकांनीं ह्याला Prasioi अगर Parsii असें नांव दिलें आहे.

भविष्यकथन—आरिअन नामक ग्रीक लेखकानें (इ. स. १५० च्या सुमारास) मेगास्थेनेसच्या ग्रंथाचा आधार घेऊन लिहिलेल्या भारताच्या वर्णनांत भविष्यकथनाबद्दल पुढीलप्रमाणें लिहिलें आहे–

"They predict about such matters as the seasons of the year and any calamity which may befall the state; but the private fortunes of the individuals they do not care to predict"

"ऋतुमान आणि देशावर येणारीं संकटें अशा तऱ्हेच्या विषयांबद्दल ते भविष्यकथन करतात. पण कोणाही व्यक्तीच्या खाजगी बाबींच्या संबंधीचें भविष्य ते कधींही सांगत नाहींत."

यवन—पूर्वी ग्रीकांना Ionians (आयोनिअन्स) (आयोनियाचे रहिवासी) असें म्हणत असत. त्यावरून संस्कृतांत यवन असा शब्द झाला. म्हणजे मुळांत यवन म्हणजे आयोनिअन्स अथवा ग्रीक. पण नंतरच्या काळांत एकंदर सर्वच परकीयांना यवन असें म्हणण्याचा भारतांत प्रघात पडला.

* * * * * * * * * * * * * : * * * * * * *

सर्पदंश—सर्पदंशावर भारतीयांजवळ रामबाण उपाय होते हें आरिअन ह्या ग्रीक इतिहासकाराच्या पुढील उताऱ्यावरून दिसून येतें—

"But no cure of the bite of the Indian snake has been found out by the Greek physicians, though the Indians, it is certain, can cure those who have been bitten. And Nearchos adds that Alexander had all the most skilful of the Indians in the healing art collected around him and had caused proclamation to be made throughout the camp that if anyone were bitten he should repair to the royal tent."

"ग्रीक वैद्यांना ह्या सर्पदंशावर कोणतेंही औषध सापडलें नाहीं; परंतु हें निश्चित आहे कीं भारतीय लोक सर्पदंश झालेल्या माणसांना बरे करूं शकतात. 'निअरखोस' ह्यानें लिहिलें आहे कीं अलेक्झांडर बादशहानें सर्पदंशावरील औषधें माहीत असलेलीं भारतांतील सर्वोत्तम माणसें आपल्या भोवतीं गोळा केलीं होतीं आणि कोणासही सर्पदंश झाला असल्यास त्यानें बादशहाच्या तंबूवर यावें अशी दवंडी पिटविली होती."

सिंधुदेश—अलेक्झांडरच्या स्वारीपूर्वी ग्रीक लोकांना सिंधु नदीच्या पश्चिमेकडील प्रांताचीच तेवढी माहिती होती. त्या प्रांताला, सिंधु ह्या शब्दापासून इंदु व त्यापासून इंडिआ हें नांव त्यांनीं दिलेलें होतें. अलेक्झांडरच्या स्वारीच्या वेळीं त्यांना सिंधु नदीच्या पूर्वेकडल्या बीस नदीपर्यंतच्या प्रांताची माहिती झाली व त्यानंतर मग त्याच्या आणखी पूर्वेकडल्या मगध, गांग, वगैरे मुलुखाची माहिती मिळाली. ह्या सर्व प्रांताला ते मुळांत सिंधु नदीच्या लगतच्या प्रांताला त्यांनीं दिलेलें नांव जें इंडिआ, त्या नांवानेंच संबोधूं लागले. कालान्तरानें सर्वच भारतवर्ष पाश्चात्यांच्या ओळखीचा झाला, त्यालाही त्यांनीं इंडिआ हेंच नांव कायम केलें. एखाद्या बारक्याशा प्रांताच्या नांवावरून साऱ्या देशाला ओळखणें असा हा प्रकार झाला.

अलेक्झांडरच्या स्वारीला Alexander's invasion of India म्हणजे 'अलेक्झांडरची हिंदुस्थानावरील स्वारी' असें म्हणण्याचा परिपाठ आहे. वास्तविक अलेक्झांडर फक्त बीस नदीपर्यंत येऊं शकला व तेथूनच त्याला

* * * * * * ** * * * * * * * * * * * * * * * * * *

माघारीं फिरावें लागलें; ह्यावरून त्याच्या स्वारीला हिंदुस्थानावरील स्वारी असें म्हणणें चुकीचें आहे हें सहज लक्षांत येईल.

खरें म्हणजे Hopkins ह्या अमेरिकन विद्वानानें आपल्या Ethics of India ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें Alexander did not even get into the real India of that day (अलेक्झांडर हा तत्कालीन खऱ्या भारतापर्यंत आला देखील नव्हता,) असें स्पष्ट होतें. E. B. Havell ह्या इंग्रज इतिहासलेखकानें तर ह्या अलेक्झांडरच्या स्वारीला Alexander raid into the Punjab (अलेक्झांडरचा पंजाबावरील दरोडा,) असेंच म्हटलें आहे आणि वस्तुतः तें बरोबर आहे असें म्हणणें प्राप्त आहे.

स्मारकें—अलेक्झांडरनें आपल्या स्वारीची स्मृति कायम राहावी म्हणून बीस नदीच्या कांठीं बारा टोलेजंग स्मारकें उभारल्याचा उल्लेख ग्रीक इतिहासकारांनीं केलेला आहे. पण ह्या स्मारकांचा आज कोठेंही मागमूससुद्धा लागत नाहीं.

त्याच काळीं भारतीयांच्या स्मारकें उभारण्याबद्दल काय कल्पना होत्या हें अलेक्झांडरच्या स्वारीनंतर अवघ्या वीस पंचवीस वर्षांनीं लिहिलेल्या मेगास्थेनेसच्या पुढील उताऱ्यावरून दिसून येतें—

"The Indians do not raise monuments to the dead, but consider the virtues which men have displayed in life and the songs in which their praises are celebrated sufficient to preserve their memory after death."

"भारतांतील लोक मृतांचीं स्मारकें उभारीत नाहींत. जिवंत असतांना दिसून आलेले त्यांचें सद्गुण व त्यांच्या स्तुतींनीं भरलेलीं गाणीं हीं त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या स्मृति कायम ठेवण्यासाठीं पुरेशीं आहेत असें त्यांना वाटतें."

अथेना—ग्रीक लोकांची, ज्ञान आणि कला यांची अधिष्ठात्री देवता.

इलियड—सुप्रसिद्ध ग्रीक कवि होमर याचें महाकाव्य.

झुस—ग्रीक लोकांच्या देवतांचा राजा.

IRBK-0106432